दैनिक

अहिल्यानगर | पुणे | छत्रपती संभाजीनगर | बीड | धाराशिव | नाशिक येथून दररोज प्रसिध्द

# राष्ट्र सह्याद्री

संपादक : काकासाहेब नवले I RNI No. MAHMAR/2019/82605 I वर्ष ७ वे I पाने ८ I मुल्य रू. ४.०० I अंक २४७ I शनिवार २० जून २०२६

I पोस्टल परवाना : G-2/Rashtra Shyadri/RNP/2025-26 I www.rashtrasahyadri.com



'सहजयोग'

भाग ८८

## मानवी उत्क्रांती

सहज योगाचे नाव तुम्ही लोकांनी ऐकले आहे. यावर कबीरदासांनी खूप लिहिले आहे, नानकजींनी खूप लिहिले आहे. श्रीकृष्णानेही याचे खूप कौतुक केले आहे. शंकराचार्यांनीही सहज बद्दल म्हटले आहे की, ना योगाने, ना सांख्य दर्शनाने, ना इतर कोणत्याही गोष्टीने हे होऊ शकत नाही; हे तर सहजच होऊ शकते'ग्रेस'ने म्हणजे भगवंताच्या कृपेने.पण मनुष्य ही गोष्ट विचार करण्यात असमर्थ ठरतो की, ही कृपा नक्की कशी होईल? ही गोष्ट कशा प्रकारे घडून येईल? ज्यामुळे ही मर्यादित बुद्धी त्या असीमाशी (अनंतात) जाऊन जोडली जाईल. ज्यामुळे मनुष्याचे हे मर्यादित बनलेले चित्त त्या असीमामध्ये एकरूप होईल. अनादी काळापासून हाच प्रश्न मानवाच्या मनात घोळत राहिला आहे. जर असे म्हटले की हे वरूनच (कृपेने) घडणारे आहे, तर लोक विचार करतात की मग त्यासाठी काय केले पाहिजे? हे अगदी असेच समजून घ्या, की जर एका बीजाला अंकुरायचे असेल, तर एक माळी स्वतःच त्याला जमिनीत लावतो, त्यावर पाणीही घालतो, त्याचे संगोपनही करतो आणि त्याला मोठेही करतो. त्याच प्रकारे तुमचेही आजपर्यंत जे काही झाले आहे, (ते त्यानेच केले आहे). आज तुम्ही एका लहानशा जिवापासून मनुष्य रूपात इथे बसलेले आहात, जी तुमची उत्क्रांती झाली आहे, जो तुमचा 'इव्होल्युशन' (विकास) झाला आहे, तो देखील त्याच परमात्म्याने केला आहे. आणि तुम्हाला याच्या पुढे जायचे आहे, ते देखील तोच करणार आहे.जिथे कोणत्याही चांगल्या माणसाचे जगणे कठीण होऊन बसते; अशा परिस्थितीतही जर कोणी परमात्म्याची आठवण जरी काढली, तर ती खूप मोठी तपश्चर्या आहे.त्याचाच परिणाम म्हणून आज सहजयोग तुमच्या समोर उभा आहे. 'सहज' चा अर्थ आहे सोपे'सह' म्हणजे तुमच्या सोबत आणि 'ज' म्हणजे जन्मलेले. प्रत्येक मनुष्यामध्ये ही शक्ती आहे, हा अधिकार आहे, हा त्याचा जन्मसिद्ध अधिकार आहे की त्याने हे प्राप्त करावे.

०१ एप्रिल १९७६, दिल्ली अधिक माहितीसाठी www.sahajayogamumbai.org 8871519191

सौजन्य : निर्मला धाम आश्रम, आरडगाव राहुरी

## महत्त्वाचे..

### १५ ऑगस्टनंतर अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांवर कारवाई!

मुंबई : राज्यातील अमराठी रिक्षा आणि टॅक्सी चालकांना मराठी भाषेचे ज्ञान मिळावे, तसेच प्रवाशांशी होणारा दैनंदिन संवाद अधिक सुलभ व्हावा यासाठी राज्याच्या परिवहन विभागाने एक धोरणात्मक निर्णय घेतला आहे. १ जून ते १५ ऑगस्ट २०२६ या अडीच महिन्यांच्या कालावधीत सर्व अमराठी रिक्षा-टॅक्सी चालकांनी चार तासांचा 'मराठी भाषा संवाद पाठ्यक्रम' पूर्ण करणे अनिवार्य करण्यात आले आहे. या मुदतीनंतर अधिकृत प्रमाणपत्र नसलेल्या चालकांवर आरटीओ आणि परिवहन विभागाकडून कडक कायदेशीर कारवाई करण्यात येणार आहे. परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांच्या मार्गदर्शनाखाली हा म हत्त्वाचा उपक्रम राबविला जात आहे. या प्रशिक्षणाचा दर्जा उत्तम राहावा यासाठी शासनाने महाराष्ट्र राज्य मराठी भाषा विभाग, कोकण मराठी साहित्य परिषद, मुंबई मराठी साहित्य संघ या संस्थांची अधिकृत आणि तज्ज्ञ संस्थांची नियुक्ती केली आहे. परिवहन विभागाने एका प्रसिद्धीपत्रकाद्वारे स्पष्ट केले आहे की, १५ ऑगस्ट २०२६ नंतर अधिकृत प्रमाणपत्र नसलेल्या कोणत्याही अमराठी चालकाला रिक्षा किंवा टॅक्सी चालवताना आढळल्यास, नियमानुसार दंडात्मक व कडक कायदेशीर कारवाई केली जाईल.

# मी पक्षप्रमुख पद सोडायला तयार

## शिवसेना गद्दारांच्या हाती देणार नाही : उद्धव ठाकरे

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**मुंबई :** शिवसेनेच्या ६० व्या स्थापना दिनी पक्षातील खासदारांच्या संभाव्य फुटीच्या चर्चांनी निर्माण झालेल्या राजकीय वादळाच्या पार्श्वभूमीवर पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांनी भावनिक आणि आक्रमक भाषण करत पक्षातील नाराजांना तसेच सत्ताधारी भाजप-शिंदे गटाला थेट आव्हान दिले. जर शिवसैनिकांना माझ्यावर विश्वास नसेल तर मी पक्षप्रमुख पद सोडायला तयार आहे; पण सोन्यासारखी शिवसेना चोर, दरोडेखोर आणि गद्दारांच्या हातात जाऊ देणार नाही, असे ठाम वक्तव्य करत ठाकरेंनी कार्यकर्त्यांना भावनिक साद घातली.

मुंबईतील स्थापना दिनाच्या मेळाव्यात बोलताना ठाकरेंनी पक्षातील कथित बंड, सहा खासदारांच्या संभाव्य फुटीच्या चर्चा आणि भाजपवर जोरदार हल्लाबोल केला. माझ्याच माणसाने माझ्यावर बोट दाखवले तर मी एक क्षणही त्या पदावर राहणार नाही. म्हणूनच मुख्यमंत्रीपद सोडले, 'वर्षा' सोडून 'मातोश्री'वर आलो. मला सत्तेची हाव नाही, असे सांगत त्यांनी नेतृत्वापेक्षा शिवसैनिकांचा विश्वास अधिक महत्त्वाचा असल्याचे स्पष्ट केले.

पक्षातील अस्थिरतेच्या चर्चांना उत्तर देताना ठाकरे म्हणाले, मी खचणारा नाही, पळणारा नाही. अनेक संकटे आणि वादळे पाहिली आहेत. शिवसैनिकांचा विश्वास असेपर्यंत जबाबदारी स्वीकारत राहीन. मात्र विश्वास उरला नाही, त्या दिवशी पद सोडण्यास मागेपुढे पाहणार नाही.

भाषणादरम्यान ठाकरेंनी आपल्या कुटुंबाचा सामाजिक वारसा अधोरेखित केला. प्लेगच्या साथीच्या काळात त्यांचे पणजोबा सीताराम ठाकरे यांनी मृतदेह वाहून नेण्याचे काम करताना प्राण गमावल्याचा उल्लेख करून, आमच्या घराण्याने सम ाजासाठी बलिदान दिले आहे. त्यामुळे आमच्या निष्ठेवर प्रश्न उपस्थित करणाऱ्यांनी इतिहास पाहावा, असा टोला त्यांनी लगावला.

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकांमध्ये राष्ट्रीय नेतृत्वाच्या सहभागावर टीका करताना ठाकरेंनी पंतप्रधानांवर अप्रत्यक्ष निशाणा साधला. दूध संघाच्या निवडणुकीपासून प्रत्येक ठिकाणी पंतप्रधानांना प्रचारासाठी यावे लागते, मग स्थानिक नेतृत्व कुठे आहे? असा सवाल त्यांनी उपस्थित केला.

मुख्यमंत्रीपदाच्या कार्यकाळातील निर्णयांचा उल्लेख करताना ठाकरेंनी मराठवाड्यातील पुरस्थिती, शेतकरी कर्जमुक्ती, शिवभोजन (पान ४ वर)

### शिवसैनिकच पक्षप्रमुख व्हावा

ठाकरेंनी शिवसैनिकांसमोर अनपेक्षित प्रस्ताव ठेवत, तुमच्यापैकी एखादा निष्ठावान शिवसैनिक पुढे येऊ द्या. तो पक्षप्रमुख झाला तर मला आनंदच होईल. पण भेसळयुक्त रक्ताचे, लाचार आणि गद्दार लोक शिवसेनेचे नेतृत्व करू शकत नाहीत, असे सांगितले. त्यांच्या या विधानानंतर उपस्थित शिवसैनिकांनी पद सोडू नका अशा घोषणा देत त्यांना पाठिंबा दर्शविला.



## पिक्चर अभी बाकी है..!

### ऑपरेशन टायगरची चर्चा : बंडखोर खासदारांवर एकनाथ शिंदेंचं सूचक भाष्य

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री



**मुंबई :** ये तो सिर्फ ट्रेलर है, पिक्चर अभी बाकी है, अशा सूचक शब्दांत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांनी ऑपरेशन टायगरवर भाष्य केले. माझ्या समोर बसलेले शिवसैनिक हीच माझी संपत्ती आहे. व्यासपीठावरील बसलेले सगळे नेते, मंत्री, आमदार, खासदार हेच माझं ऐश्वर्य आहे, असे शिंदे म्हणाले. आज बऱ्याच जणांच्या नजरा आपल्याकडे लागल्या आहेत. मी नेमकं काय बोलणार, व्यासपीठावर कोण येणार, काय होणार, याची सर्वांना उत्सुकता लागली आहे. पण आज हा टायगर तुमच्या समोर उभा आहे. ये तो सिर्फ पिक्चर है, ट्रेलर अभी बाकी है, असे सूचक विधान त्यांनी केले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेचा वर्धापनदिन सोहळा गोरेगावच्या नेस्को सेंटरमध्ये संपन्न झाला. सेनेच्या वर्धापन दिनापूर्वी उद्धव ठाकरेंच्या शिवसेनेच्या ९ पैकी ६ खासदारांनी त्यांची साथ सोडली. हे ६ खासदार शिंदेसेनेच्या वाटेवर आहेत. या ऑपरेशन टायगरबद्दल शिंदे नेमकं काय बोलणार याकडे सगळ्यांचं लक्ष लागलं होतं. ठाकरेंची साथ सोडलेल्या ६ खासदारांच्या पक्षप्रवेशाची घोषणा शिंदे करणार का, याकडेही राजकीय वर्तुळाचं लक्ष होतं.

माझ्यासोबत शिवसेनेचे ४० आमदार आले. मी ते ६० केले. आज शिवसेनेचे ६० आमदार आहेत. शिवसेना राज्यातील दुसरा क्रमांकाचा पक्ष आहे. आज बाळासाहेब ठाकरे यांना आनंद होत असेल. ते स्वर्गातून आपल्याकडे पाहत असतील आणि आशीर्वाद देत असतील. बाळासाहेब केवळ नावात असून चालत नाही. तर ते कामात आणि विचारातही असावे लागतात. शिवसेना जमिनीचा तुकडा नाही. तो काळजाचा तुकडा आहे, अशा शब्दांत शिंदे यांनी उद्धव ठाकरे यांनी अप्रत्यक्षपणे टीका केली.

काल परवापासून काही कुत्रे रोज भुंकत आहेत. (पान ४ वर)




छत्रपती संभाजीनगर : माजी केंद्रीय अर्थराज्यमंत्री खासदार डॉ. भागवत कराड यांचा राष्ट्र सह्याद्री माध्यम समूहाच्या वतीने सत्कार करताना संपादक करण नवले, संसद प्रतिनिधी डॉ. सतीश खर्डे. दैनिक राष्ट्र सह्याद्री अंकाचे वाचन करून त्यांनी उत्तम गुणवत्तेसाठी सर्व प्रतिनिधींचे यावेळी कौतुक केले.

## भिशीचे लाखो रुपये अडकले; आर्थिक विवंचनेतून तरुणाचे टोकाचे पाऊल

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी :** स्वतःच्या कष्टाने संसार उभा करण्याचे स्वप्न पाहणाऱ्या ३५ वर्षीय तरुणाला आर्थिक विवंचनेने इतके ग्रासले की, अखेर त्याने जीवनयात्राच संपविण्याचा निर्णय घेतला. पाथर्डी तालुक्यातील निवडुंगे येथील बाळासाहेब कुंडलिक ढवळे यांनी विष प्राशन करून आत्महत्या केल्याची हृदयद्रावक घटना घडली असून, या घटनेमुळे संपूर्ण परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.

कुटुंबाच्या भविष्यासाठी आणि आर्थिक स्थैर्यासाठी भिशी व इतर व्यवहारांमध्ये सहभागी झालेल्या बाळासाहेब यांचे लाखो रुपये अडकल्याने ते मोठ्या आर्थिक संकटात सापडल्याचे सांगितले जाते. या तणावातून त्यांनी आत्महत्येपूर्वी एक व्हिडिओ तयार करून आपली व्यथा मांडली. त्या व्हिडिओम ध्ये त्यांनी काही व्यक्तींवर गंभीर आरोप करत, भिशीचे पैसे थकल्याने आपल्यावर आत्महत्येची वेळ आल्याचा दावा केला आहे.

मंगळवारी सायंकाळी विष प्राशन केल्यानंतर त्यांना उपचारासाठी शेवगाव येथे दाखल करण्यात आले. मात्र प्रकृती गंभीर झाल्याने पुढील उपचारासाठी अहिल्यानगरला नेत असताना वाटेतच त्यांची प्राणज्योत म ालवली. त्यांच्या निधनाने कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला आहे. या घटनेनंतर हिंदुत्ववादी संघटनेचे नेते तथा मढीचे सरपंच संजय मरकड, किरण अकोलकर आणि बाळासाहेब गीते यांनी या प्रकरणी दोषींवर तत्काळ गुन्हे दाखल करून आरोपींना अटक करावी, अशी मागणी केली आहे. दरम्यान, मृत्यू पूर्वीच्या व्हिडिओमुळे प्रकरणाला गंभीर वळण मिळाले असून, नातेवाईक आणि विविध संघटनांनी दोषींवर कठोर कारवाईची मागणी केली आहे. महेश ढवळे यांच्या फिर्यादीवरून पाथर्डी पोलीस ठाण्यात आत्महत्येस प्रवृत्त केल्याप्रकरणी गुन्हा दाखल करण्यात आला असून, पोलिसांकडून पुढील तपास सुरू आहे.

## पाथर्डीत तरुण शेतकऱ्याचा मारहाणीत मृत्यू : चौघांना अटक

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**पाथर्डी :** शहराजवळील देवीचे धामणगाव येथील एक ४५ वर्षीय तरुण शेतकऱ्याचा मारहाणीत मृत्यू झाल्याची खळबळ जनक घटना घडली. किरण अप्पासाहेब काकडे असे या मृत तरुण शेतकऱ्याचे नाव आहे. रात्रीच्या वेळी रुग्णालयातून घराकडे येत असताना अज्ञात इस्म ानी केलेल्या मारहाणीत त्यांचा मृत्यू झाला. याबाबत मृताच्या पत्नीने पाथर्डी पोलीस ठाण्यात गेलेल्या तक्रारीवरून अज्ञात इसमाविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दरम्यान पोलिसांनी तांत्रिक विश्लेषणाच्या आधारे चौघा संशयित तरुणांना अटक केली आहे. त्यांना न्यायालयासमोर हजर केले असता चौघांना पोलीस कोठडी देण्यात आली. या मारहाणीचे नेमके कारण अद्यापही समजू शकले नाही. या घटनेमुळे पाथर्डी शहरासह परिसरात एकच खळबळ उडाली आहे.

याबाबत अधिक माहिती अशी की, धामणगाव येथील किरण काकडे हे शेती (पान ४ वर)

## कॉकरोच जनता पार्टीचे आज पुन्हा जंतर मंतरवर आंदोलन

प्रतिनिधी I राष्ट्र सह्याद्री

**नवी दिल्ली :** नीट परीक्षेची प्रश्नपत्रिका फुटल्याची जबाबदारी निश्चित करत शिक्षण मंत्री धर्मेंद्र प्रधान यांचा राजीनामा घेतला जावा, अशा मागणीसाठी कॉकरोच जनता पार्टीकडून (सीजेपी) शनिवारी जंतर मंतरवर पुन्हा आंदोलन केले जाणार आहे. दरम्यान प्रश्नपत्रिका फुटल्यामुळे आतापर्यंत ११ विद्यार्थ्यांचा मृत्यू झाला असून या विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना प्रत्येकी एक कोटी रुपयांची आर्थिक मदत दिली जावी, अशा मागणीचे पत्र सीजेपीचे संस्थापक अभिजित दिपके यांनी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांना लिहिले (पान ४ वर)

**दीपके यांनी लिहिले पंतप्रधानांना पत्र**

# घुले बंधूंचा सहकारात दबदबा कायम

## गडाख-राजळेंची 'बिनविरोध' मोहीम थोड्यावर अडली! ज्ञानेश्वर कारखाना पूर्ण बिनविरोध

- मुळा व वृद्धेश्वरमध्ये मोजक्या जागांसाठी मतदान
- जिल्ह्यातील सहकार राजकारणाची नवी समीकरणे चर्चेत

करण नवले I राष्ट्र सह्याद्री

**अहिल्यानगर :** जिल्ह्यातील सहकार क्षेत्रातील सर्वाधिक प्रतिष्ठेच्या मानल्या जाणाऱ्या ज्ञानेश्वर, मुळा आणि वृद्धेश्वर सहकारी साखर कारखान्यांच्या निवडणुकांमध्ये अर्ज माघारीनंतर चित्र स्पष्ट झाले असून, यंदा सर्वाधिक राजकीय यश माजी आमदार नरेंद्र घुले व चंद्रशेखर घुले यांच्या नेतृत्वाखालील गटाला मिळाल्याचे दिसून आले आहे. नेवासा तालुक्यातील लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या सर्व २१ जागा बिनविरोध निवडून आणण्यात घुले बंधूंना यश आले. दुसरीकडे माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या मुळा कारखान्यात १८ जागा बिनविरोध झाल्या असल्या तरी तीन जागांसाठी मतदान होणार आहे. तर पाथर्डी तालुक्यातील श्री वृद्धेश्वर कारखान्यात आम दार मोनिका राजळे यांच्या गटाने १७ जागा बिनविरोध जिंकल्या (पान ४ वर)

**कारखानानिहाय चित्र**

| कारखाना | एकूण जागा | बिनविरोध | निवडणूक |
|---|---|---|---|
| ज्ञानेश्वर | २१ | २१ | नाही |
| मुळा | २१ | १८ | ३ जागा |
| वृद्धेश्वर | १९ | १७ | २ जागा |

### 'ज्ञानेश्वर'मध्ये घुले बंधूंचा निर्विवाद विजय





लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळ निवडणुकीत सर्व २१ जागांवर उमेदवार बिनविरोध निवडून आले. शेवगाव, शहरटाकळी, कुकाणा, नेवासा, वडाळा, ढोरजळगाव गटांसह महिला, अनुसूचित जाती-जमाती, भटके-विमुक्त, नाम ाप्रवर्ग तसेच उत्पादक व बिगर उत्पादक संस्थांच्या सर्व जागांवर एकमत झाले. कारखाना निवडणूक पूर्णपणे बिनविरोध करण्यात यश मिळाल्याने माजी आमदार नरेंद्र घुले आणि चंद्रशेखर घुले यांच्या संघटन कौशल्याची पुन्हा एकदा चर्चा सुरू झाली आहे. विरोधकांना कोणतीही जागा निवडणुकीत आणता आली नाही, हे घुले गटाच्या मजबूत पकडीचे द्योतक मानले जात आहे.

### 'मुळा'मध्ये गडाखांचे वर्चस्व; तरीही तीन जागांवर लढत



सोनई येथील मुळा सहकारी साखर कारखान्याच्या निवडणुकीत माजी मंत्री शंकरराव गडाख यांच्या गटाने २१ पैकी १८ जागा बिनविरोध निवडून आणत आपले वर्चस्व कायम राखले. मात्र, करजगाव गटातील दोन जागा आणि महिला प्रतिनिधीची एक जागा अशा एकूण तीन जागांसाठी मतदान होणार आहे. निवडणुकीपूर्वी गडाख विरोधी गटाकडून सर्व जागांवर ताकदीने लढण्याचे दावे करण्यात आले होते. मात्र प्रत्यक्षात बहुतांश ठिकाणी उमेदवार उभे राहू शकले नाहीत. त्यामुळे विरोधकांना केवळ तीन जागांपुरती मर्यादित लढत द्यावी लागत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे. तरीही कारखाना पूर्ण बिनविरोध करण्यात गडाख गटाला यश न मिळाल्याने विरोधकांनी काही प्रमाणात राजकीय अस्तित्व दाखवून दिल्याचे मानले जात आहे.

### 'वृद्धेश्वर'मध्ये राजळे गटाला धक्का



आदिनाथनगर येथील श्री वृद्धेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या १९ जागांच्या निवडणुकीत १७ जागा बिनविरोध निवडून आणण्यात आमदार मोनिका राजळे यांच्या नेतृत्वाखालील सत्ताधारी गटाला यश मिळाले. मात्र कासार पिंपळगाव गटातील दोन जागांसाठी तीन उमेदवार रिंगणात राहिल्याने मतदान अटळ आहे. सत्ताधारी गटाचे आप्पासाहेब दादाबा राजळे आणि उद्धव रघुनाथ वाघ यांच्याविरुद्ध विरोधी गटाचे शिवशंकर अर्जुन राजळे मैदानात उतरले आहेत. निवडणूक बिनविरोध करण्यासाठी शेवटच्या क्षणापर्यंत प्रयत्न झाले, मात्र ते निष्फळ ठरले. त्यामुळे अनेक वर्षांची बिनविरोध निवडीची परंपरा यावेळी खंडित झाली आहे.

# NEET पेपर फुटीप्रकरणी टेलिग्रामवर बंदी जखम मांडीला आणि मलम शेंडीला!

नीट-यूजी पेपरफुटीच्या प्रकरणाने देशातील शिक्षण व्यवस्थेवरील विश्वासाला मोठा तडा गेला आहे. लाखो विद्यार्थ्यांच्या आयुष्याशी संबंधित असलेल्या परीक्षेची गोपनीयता राखण्यात सरकार, राष्ट्रीय परीक्षा संस्था (एनटीए) आणि संबंधित यंत्रणा अपयशी ठरल्या. मात्र या अपयशाची जबाबदारी स्वीकारून मूळ दोषींवर कठोर कारवाई करण्याऐवजी सरकारने टेलिग्राम या मेसेजिंग ॲपवर तात्पुरती बंदी घालण्याचा मार्ग स्वीकारला आहे. दिल्ली उच्च न्यायालयाने सरकारच्या निर्णयाला तात्पुरती मान्यता दिली असली, तरी त्यामुळे या निर्णयाची उपयुक्तता किंवा नैतिकता सिद्ध होत नाही. उलट ''जखम मांडीला आणि मलम शेंडीला'' या म्हणीचीच आठवण या संपूर्ण प्रकरणामुळे येते.

प्रश्न असा आहे की, नीटचा पेपर फुटला तो टेलिग्राममुळे की यंत्रणांच्या निष्काळजीपणामुळे? जर प्रश्नपत्रिका सुरक्षित होत्या, वाहतूक आणि वितरण प्रक्रिया अभेद्य होती, अधिकाऱ्यांची जबाबदारी निश्चित होती, तर पेपर बाहेर कसा आला? आणि जर तो बाहेर आलाच असेल, तर त्यासाठी जबाबदार कोण? या प्रश्नांची ठोस उत्तरे सरकारने अद्याप दिलेली नाहीत. मात्र दोषी शोधण्याऐवजी एक संपूर्ण डिजिटल प्लॅटफॉर्म बंद करण्याचा निर्णय घेण्यात आला.

टेलिग्राम हे केवळ चॅटिंगचे ॲप नाही. लाखो विद्यार्थी ते अभ्यासासाठी वापरतात. विविध स्पर्धा परीक्षांच्या नोट्स, प्रश्नसंच, चर्चासत्रे, मार्गदर्शन वर्ग, करिअरविषयक माहिती आणि शैक्षणिक साहित्य या माध्यमातून उपलब्ध होते. काही गुन्हेगारांनी त्याचा गैरवापर केला म्हणून संपूर्ण प्लॅटफॉर्मवर बंदी घालणे म्हणजे महामार्गावर अपघात होतात म्हणून संपूर्ण महामार्ग बंद करण्यासारखे आहे. गुन्हेगारांना पकडण्याऐवजी सामान्य नागरिकांनाच शिक्षा देण्याचा हा प्रकार वाटतो.

सरकारचे म्हणणे असे आहे की, टेलिग्रामवरील गोपनीयता आणि अनामिकतेच्या सुविधांमुळे पेपरफुटी, सायबर गुन्हे, आर्थिक फसवणूक आणि दहशतवादी कारवायांना खतपाणी मिळते. हा मुद्दा पूर्णपणे चुकीचा नाही. जगभरातील अनेक तपास संस्थांनी टेलिग्रामच्या काही वैशिष्ट्यांबाबत चिंता व्यक्त केली आहे. परंतु त्याच वेळी व्हॉट्सॲप, सिग्नल, डिस्कॉर्ड, एक्स, फेसबुक आणि इतर अनेक माध्यमांचाही गैरवापर होतो. मग केवळ टेलिग्रामच लक्ष्य का?




वास्तविक पाहता प्रश्न तंत्रज्ञानाचा नाही, तर अंमलबजावणीचा आहे. सरकारकडे माहिती तंत्रज्ञान कायदा आहे, सायबर गुन्हे शाखा आहेत, तपास यंत्रणा आहेत, डिजिटल फॉरेन्सिक साधने आहेत. विशिष्ट चॅनेल्स, ग्रुप्स किंवा बॉट्सवर कारवाई करण्याची क्षमता उपलब्ध असताना संपूर्ण प्लॅटफॉर्मवर निर्बंध लादणे हा सोपा पण वरवरचा उपाय आहे. त्यामुळे मूळ समस्या सुटत नाही.

दिल्ली उच्च न्यायालयानेही सुनावणीदरम्यान याच मुद्द्यावर प्रश्न उपस्थित केला होता. काही विद्यार्थ्यांच्या परीक्षेसाठी १५ कोटी वापरकर्त्यांना त्रास देणे कितपत योग्य आहे, अशी विचारणा न्यायालयाने केली होती. हा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. लोकशाहीत कोणतीही मर्यादा ही आवश्यक, प्रमाणबद्ध आणि तर्कसंगत असली पाहिजे. अन्यथा ती अधिकारांचा अतिरेक ठरते.

या प्रकरणात आणखी एक गंभीर बाब म्हणजे सरकारच्या अपयशाचे राजकीय व्यवस्थापन. पेपरफुटी रोखण्यात झालेले अपयश, परीक्षेचे रद्दीकरण, विद्यार्थ्यांमध्ये निर्माण झालेला संताप आणि एनटीएवरील प्रश्नचिन्हे यामुळे सरकारची प्रतिमा डागाळली. अशा वेळी दोषी अधिकाऱ्यांवर कारवाई, प्रणालीतील दोषांचे निराकरण आणि पारदर्शक चौकशी याऐवजी टेलिग्रामला खलनायक ठरवले जात आहे का, हा प्रश्न विचारणे आवश्यक आहे.

पेपर फुटतो तेव्हा तो एखाद्या मोबाइल ॲपमधून जन्म घेत नाही. तो कोणाच्या तरी हातून बाहेर पडतो. त्यासाठी प्रश्नपत्रिका छापणारी यंत्रणा, वाहतूक व्यवस्था, परीक्षा केंद्रे, अधिकारी, मध्यस्थ आणि भ्रष्ट साखळी जबाबदार असते. ही साखळी मोडण्याऐवजी केवळ माहिती प्रसारित करणाऱ्या माध्यमावर कारवाई केल्यास मूळ गुन्हेगार मोकाट राहण्याची शक्यता वाढते. एखाद्या चोरीनंतर चोराला पकडण्याऐवजी रस्त्यावरचे दिवे बंद करण्यासारखा हा प्रकार आहे.

टेलिग्रामचे संस्थापक पावेल ड्युरोव्ह यांनी सरकारच्या भूमिकेवर प्रश्न उपस्थित केले आहेत. विरोधी पक्षांनीही बंदीला विरोध केला आहे. त्यांच्या सर्व दाव्यांशी सहमत होण्याची गरज नाही. पण त्यातून एक व्यापक प्रश्न नक्कीच समोर येतो डिजिटल माध्यमांवरील नियंत्रण आणि अभिव्यक्ती स्वातंत्र्य यातील समतोल कसा राखायचा?

आज टेलिग्रामवर तात्पुरती बंदी आहे. उद्या दुसऱ्या कोणत्या प्लॅटफॉर्मवर निर्बंध लादले जातील? प्रत्येक वेळी एखाद्या गैरप्रकारासाठी संपूर्ण माध्यमालाच दोषी ठरवण्याची प्रवृत्ती वाढली, तर त्याचा परिणाम मुक्त डिजिटल वातावरणावर होणार नाही




का? लोकशाहीत सरकारला अधिकार असतात, पण त्याचबरोबर संयम आणि उत्तरदायित्वाची जबाबदारीही असते.

नीट पेपरफुटी हा केवळ परीक्षा व्यवस्थेचा प्रश्न नाही. तो प्रशासनिक प्रामाणिकपणा, संस्थांची विश्वासार्हता आणि लाखो विद्यार्थ्यांच्या भविष्याचा प्रश्न आहे. त्यामुळे सरकारने टेलिग्रामवर बंदी घालून स्वतःची जबाबदारी संपली असे समजू नये. पेपर फुटला कसा, कोणामुळे फुटला, त्यातून कोणी आर्थिक लाभ घेतला आणि भविष्यात अशी घटना पुन्हा होणार नाही यासाठी कोणती कायमस्वरूपी व्यवस्था उभारली जाणार, याची उत्तरे देशाला हवी आहेत.

अन्यथा इतिहास या निर्णयाची नोंद एका प्रभावी उपाययोजनेपेक्षा अपयश झाकण्याच्या प्रयत्नाप्रमाणे करेल. कारण जखम मांडीला असताना मलम शेंडीला लावून वेदना कमी होत नाहीत; उलट मूळ जखम अधिक चिघळत जाते.

# ऊसाला चांगला भाव आणि वेळेत पेमेंट देण्याचे योग्य नियोजन : नरेंद्र घुले

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**नेवासा** :गळीतास आलेल्या उसाला चांगला भाव आणि वेळेत पेमेंट देण्याचे योग्य नियोजन करण्यात येईल अशी ग्वाही लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष माजी आमदार नरेंद्र घुले पाटील यांनी दिली.

नेवासा तालुक्यातील भेंडा येथील लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याचे अध्यक्ष माजी आमदार नरेंद्र घुले पाटील यांचे अभिष्टचिंतन व कारखाना संचालक मंडळ बिनविरोध निवडणुकीचे शिल्पकार माजी आ.चंद्रशेखर घुले पाटील यांचा ज्ञानेश्वर उद्योग समूह,कामगार संघटना व विविध संस्थाचे वतीने आयोजित सत्कार समारंभात श्री.घुले बोलत होते.

कारखान्याचे उपाध्यक्ष माजी आमदार पांडुरंग अभंग, तज्ञ संचालक डॉ. क्षितिज घुले पाटील, संचालक काकासाहेब नरवडे,बबनराव भुसारी, अशोकराव मिसाळ, पंडितराव भोसले, डॉ.नारायण म्हस्के, जनार्दन शेळके , दादासाहेब कोकणे, जनार्दन कदम, प्रसाद पटारे, मच्छिंद्र म्हस्के, रामनाथ राजपुरे, गोरक्षनाथ भेंडेकर, दत्तात्रय काळे, बाळासाहेब खरड, संतोष पावसे, विकास नन्नवरे, अमोल अभंग,अड. हिम्मतसिंह देशमुख,रविंद्र नवले, कार्यकारी संचालक अनिल शेवाळे, जनरल मॅनेजर रवींद्र मोटे व्यासपीठावर उपस्थित होते.

नरेंद्र घुले पुढे म्हणाले की संघटनेवर विश्वास ठेवून अर्ज मागे घेतलेल्या सहकार्यांमुळे हे निवडणूक बिनविरोध झाली. सर्वांना बरोबर घेऊन त्यांच्या सूचना व कल्पना विचारात घेऊन मार्गक्रमण करू. संपूर्ण आशिया खंडात एल नीनोचे संकट आहे,या नैसर्गिक अडचणीतून मार्ग काढत ऊस उत्पादन वाढीसाठी अधिक प्रयत्नांची गरज आहे.

पांडुरंग अभंग, काकासाहेब नरवडे,अनिल शेवाळे यांनी ही मनोगत व्यक्त करून घुलेंना शुभेच्छा दिल्या.

माजी संचालक जनार्दन पटारे, बाळासाहेब नवले, विष्णूपंत जगदाळे, अजित मुरकुटे, डॉ. शिवाजी शिंदे, अशोक वायकर, नामदेव निकम, बबनराव धस, तांत्रिक सल्लागार एम. एस. मुरकुटे, एस.डी. चौधरी,महेंद्र पवार, मुख्य अभियंता राहुल पाटील, मुख्य शेतकी अधिकारी सुरेश आहेर,नंदकिशोर पाटील, प्रशासकीय अधिकारी कल्याण म्हस्के,कामगार अधिकारी बाळासाहेब डोहाळे, लीगल ऑफिसर सुनील शिंदे, कामगार संघटनेचे सचिव संभाजी माळवदे,अण्णासाहेब गर्जे, संजय राऊत, अंकुश दाभाडे,अरविंद ठाणगे,संदीप फुलारी, किसन यादव, कुमार नवले, सोपान महापुर, हरीभाऊ नवले, प्राचार्य डॉ.शिरीष लांडगे, उपप्राचार्य भारत वाबळे, आदी यावेळी उपस्थित होते. कामगार संचालक सुखदेव फुलारी यांनी सूत्रसंचालन केले. जनरल मॅनेजर रवींद्र मोटे यांनी आभार मानले.

# टाकळीमियातील जिल्हा परिषद जुंदरे वस्तीवरील शाळेत नवागतांचे स्वागत

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** तालुक्यातील टाकळीमिया येथील जिल्हा परिषद प्राथमिक जुंदरे वस्तीवरील शाळेत नवागतांचे स्वागत करण्यात येऊन प्रवेशोत्सव सोहळा मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी इयत्ता पहिली मध्ये दाखल झालेल्या विद्यार्थ्यांचे औक्षण करून त्यांच्या पावलांचे ठसे घेण्यात आले. तसेच त्यांना गुलाब पुष्प आणि चॉकलेट भेट देण्यात आले. यावेळी शालेय मुलांना शासनाच्यावतीने गणवेश व पाठ्यपुस्तकाचे वाटप मान्यवरांच्या हस्ते करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक श्री. चौधरी यांनी प्रास्ताविक पर भाषणात शाळेचा पट वाढवण्यासाठी सर्वांनी मिळून प्रयत्न करावेत असे सांगितले. यावेळी पंचायत समितीचे माजी सभापती सुरेश निमसे, शासकीय निरीक्षक पंचायत समिती बांधकाम विभागाचे अभियंता किरण लांडे, ग्रामपंचायत सदस्य सुनील शिंदे, गिरीश निमसे, शिवाजी माने, शिक्षिका खेडकर आदींसह पालक, ग्रामस्थ उपस्थित होते.



# वाढीव घरपट्टी विरोधात कोपरगावात सोमवारी राष्ट्रवादीचे धरणे आंदोलन

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** : कोपरगाव नगरपरिषदेने केलेल्या अवाजवी वाढीव घरपट्टी व नगरपरिषदेच्या इतर चुकीच्या निर्णयांविरोधात राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या वतीने आ. आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवारी (दि.२२) रोजी सकाळी १० वा. श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथे धरणे आंदोलन करण्यात येणार असल्याची माहिती कोपरगाव राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने देण्यात आली आहे.

कोपरगाव नगरपरिषद प्रशासनाकडून नगरपरिषद हद्दीतील नागरिकांना कोणतीही पूर्वसूचना न देता त्यांच्यावर वाढीव दराने घरपट्टी (मालमत्ता कर) आकारण्यात आल्याच्या अधिकृत पावत्या नागरिकांना देण्यात आल्या आहे. या संदर्भात हजारो नागरिकांनी नगरपालिकेत आणि आ. आशुतोष काळे संपर्क कार्यालयात मोठ्या प्रमाणावर हरकती नोंदविल्या आहे. मात्र नगरपरिषदेकडून करवाढी बाबत कोणताही पुनर्विचार होण्याचे संकेत दिसत नसून नागरिकांनी नोंदविलेल्या हरकतींवर काय कारवाई करणार याचे नगरपरिषदे कडून कोणतेही स्पष्टीकरण देण्यात आले नाही. ज्या नागरिकांच्या जीवावर तुम्ही सत्तेत आलात त्याच नागरिकांवर अन्यायकारक अवाजवी वाढीव घरपट्टी (मालमत्ता कर) आकारत असून नागरिकांना विचारात न घेता मनमानी पद्धतीने कारभार करीत आहेत.

या वाढीव कर पट्टीमध्ये मालमत्तांचे चुकीचे वर्गीकरण, कर निर्धारणातील त्रुटी, आकारणीत विसंगती आढळून आल्या असून या संदर्भात नागरिकांना पुरेशी माहिती देण्यात आलेली नाही. राष्ट्रवादी पक्षाच्या नगरसेवकांनी नगरपरिषद उपमुख्याधिकारी मनोजकुमार पापडीवाल यांना लेखी निवेदन देऊन तातडीने कर वाढी संदर्भात सर्वसाधारण सभा घेण्याची मागणी केली होती. मात्र अद्याप या संदर्भात पालिकेकडून कोणतीही कारवाई होतांना दिसत नसल्याने कोपरगावकरांच्या हितासाठी राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने आ. आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली सोमवारी (दि.२२) रोजी सकाळी १० वाजल्यापासून कोपरगाव शहरातील श्री छत्रपती शिवाजी महाराज स्मारक येथे धरणे आंदोलन करण्यात येणार आहे. या धरणे आंदोलनात कोपरगावकरांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे असे आवाहन कोपरगाव शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या वतीने करण्यात आले आहे.

# कोपरगाव शहर राष्ट्रवादीची कोअर कमिटी जाहीर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोळपेवाडी** :- कोपरगाव शहरातील राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाच्या संघटनात्मक बांधणीला अधिक बळकटी देण्यासाठी आमदार आशुतोष काळे यांच्या मार्गदर्शनाखाली कोपरगाव शहर राष्ट्रवादी काँग्रेसची कोअर कमिटी जाहीर करण्यात आली आहे. पक्षाची संघटना अधिक सक्षम करून सामाजिक उपक्रम प्रभावीपणे राबविणे तसेच सर्वसामान्य नागरीकांच्या अडीअडचणी तातडीने सुटाव्यात या उद्देशाने या कोअर कमिटीची स्थापना करण्यात आली आहे.

कोअर कमिटीमध्ये शहरातील अनुभवी पदाधिकारी, ज्येष्ठ कार्यकर्ते तसेच युवा नेतृत्वाला संधी देण्यात आली आहे. या माध्यमातून पक्षाचे संघटन अधिक मजबूत होण्यास



मदत होणार आहे. कोपरगाव शहर राष्ट्रवादी काँग्रेसच्या या नव्या कोअरकमिटीमुळे पक्षाची संघटनात्मक ताकद अधिक वाढणार असून शहरातील विविध प्रश्न सोडविण्यासाठी अधिक प्रभावीपणे काम करता येणार आहे.या कोअर कमिटीमध्ये सुनील गंगुले, दिनार कुदळे, हाजीमेहमूद सय्यद, मंदार पहाडे, कृष्णा आढाव, विरेन बोरावके, बाळासाहेब रुईकर, रमेश गवळी, इम्तियाज अत्तार, शैलेश साबळे, विजय त्रिभुवन, सचिन गवारे, राजेंद्र वाकचौरे, फकीरमामू कुरेशी या अनुभवी कार्यकर्त्यांचा समावेश करण्यात आला आहे.माजी आमदार अशोकराव काळे व आमदार आशुतोष काळे यांनी सर्व कोअर कमिटीच्या सदस्यांचे अभिनंदन करून शुभेच्छा दिल्या आहे.आपल्यावर दिलेल्या जबाबदाऱ्या प्रामाणिकपणे पार पाडून पक्ष बळकटीसाठी प्रयत्न करून नागरिकांच्या समस्या सोडविण्यासाठी सर्वांनी तळागाळातील कार्यकर्त्यांना सोबत घेवून समन्वयाने काम करावे असे आवाहन केले. कोअर कमिटीच्या निवडी नंतर कार्यकर्त्यांमध्ये उत्साहाचे वातावरण पसरले असून पक्षाच्या आगामी कार्यक्रमांमध्ये अधिक जोमाने सहभाग घेण्याचा निर्धार सर्व पदाधिकाऱ्यांनी व्यक्त करून आमदार आशुतोष काळे यांच्या पाठीशी शहरातील अधिकचे पाठबळ उभे करण्याचा सर्व पदाधिकाऱ्यांनी यावेळी निश्चय केला.

# विद्यार्थ्यांची खाजगी शिक्षण संस्थाकडून होणारी लुट थांबवा : गोपाल जोशी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**बेलापूर** : श्रीरामपूर तालुक्यामध्ये अनेक अशा खाजगी शिक्षण संस्थाकडून विद्यार्थी व पालक यांची मोठ्या प्रमाणावर आर्थिक लुट केली जात आहेत.यात काहीतर शैक्षणिक संस्था विद्यार्थ्यांना आणि पालकांना मानसिक त्रास देत असल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. आर्थिक व मानसिक त्रास देणाऱ्या संस्थेकडून होणारी लुट त्वरित थांबवा,

अशी, मागणी सिद्धीविनायक मंचाचे अध्यक्ष गोपाल जोशी यांनी मुंबई येथे राज्याचे शालेय शिक्षण मंत्री दादाजी भुसे यांच्याकडे समक्ष भेटून घेऊन माहिती दिली.यावर कडक कारवाई करावी, विनंती केली.

सिद्धीविनायक मंचाचे अध्यक्ष जोशी यांनी प्रसिद्धी दिलेल्या पत्रकात म्हटले आहे की, संस्थेकडून सक्तीचा बडगा उठला असून शालेय गणवेश, पुस्तके, दप्तरे, बुट, क्रीडा,अशा सर्व शैक्षणिक वस्तू घेण्याचा आग्रह केला जात आहेत.जुने पुस्तके,न घेण्याचे आग्रह करतात तसेच काही शिक्षण संस्थांची वार्षिक फी सुद्धा पालकांच्या आवक्याबाहेर आहेत.अनेक शिक्षण संस्थाची शिक्षक बाहेर खाजगी क्लासेस घेतात, त्यातून विद्यार्थ्यांना दम देण्याचा काहीसा घडलेला आहे.त्यावर कोणी बोलण्यास तयार होत नाहीत. आमच्याकडे क्लासेस लावावेत, आम्ही तुम्हाला प्रश्न पात्रिका पुरवू ( खचझ ) च्या नावाखाली विद्यार्थी संख्या वाढवली जाते तसेच, या गोष्टीकडे तालुका शिक्षण अधिकारी कुठल्याही प्रकार लक्ष घालत नसल्याने शिक्षण संस्थांवर कोणाचा वचक राहिला नाही. त्यामुळे आपणाहून स्वःतहा पालक व शिक्षण अधिकाऱ्याची बैठक तोडगा काढावा आणि तक्राराची बाबीची सखोल चौकशी करून संस्थावर कठोर कारवाई करून मान्यता रद्द करावी, अशी मागणी जोशी यांनी केली.

# सर्वपक्षीय आंदोलनाला अखेर यश साईनगर पुणे फास्ट पॅसेंजर रोज सुरु

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : कोरोना महामारीमुळे रेल्वे प्रशासनाने मनमाड पुणे पुणे मनमाड पॅसेंजर बंद करण्यात आल्या होत्या. त्याच अनुषंगाने श्रीरामपूर - शिर्डी राहुरी अहिल्यानगर आदी लोकांची गैरसोय निर्माण झाली होती, त्यामुळे रिपब्लिकन पार्टी ऑफ इंडियाचे जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष त्रिभुवन यांच्या नेतृत्वाखाली रेल्वे सोलापूर डिव्हिजनचे डी आर एम यांना रिपाई भाजप शिवसेना राष्ट्रवादी काँग्रेस मनसे विविध पक्ष संघटनेच्या वतीने निवेदने दिली. त्या निवेदनाची दाखल घेऊन रेल्वेमंत्री वैष्णवी आश्विन यांनी श्रीरामपूरकरांची मागणी मान्य करून साईनगर ते पुणे फास्ट पॅसेंजर १७ जून रोजी दुपारी तीन वाजता पुणे येथे गाडीला हिरवा झेंडा दाखवा गाडी सुरू करण्यात आली. श्रीरामपूर येथे सायंकाळी ७ वाजता रिपाईच्या जिल्हा कार्याध्यक्ष सुभाष त्रिभुवन, रेल्वे स्टेशन मास्तर एम पी पांडे, मर्चंट असोसिएशनचे अध्यक्ष प्रवीण गुलाटी, ह भ प संतोष महाराज पटारे, मर्चंट असोसिएशनचे संचालक गौतम उपाध्ये, मर्चंट असोसिएशनचे संचालक पुरुषोत्तम झंवर, बाळासाहेब खाबिया, शरद नवले, राष्ट्रीय जनसेवा पार्टीचे जिल्हाध्यक्ष तेजस गायकवाड, किशोर फुणगे, शिवसेना तालुकाध्यक्ष संतोष डहाळे, रासपाचे जिल्हाध्यक्ष अमोल साबणे, माजी नगरसेवक मुख्तार शहा, ख्रिस्ती विकास परिषदेचे जिल्हाध्यक्ष दीपक कदम, काँग्रेस पक्षाचे सुरेश ठुबे, रॉकी लोंढे, इंनियात आत्तार, संजय पिटेकर तसेच टीसी कर्मचारी तसेच प्रशासनाच्या वतीने स्वागत करून रेल्वे इंजिनला हार घालून हिरवा झेंडा दाखवून रेल्वे सुरू केली आहे. पुणे,अहिल्यानगर आणि साईनगर शिर्डी परिसरातील लाखो प्रवासी, विद्यार्थी, व्यावसायिक तसेच साईबाबांच्या दर्शनासाठी येणाऱ्या भाविकांसाठी महत्त्वपूर्ण ठरणार आहे.

# आ . बोंढारकर यांची जि . प . बिरोबा बन शाळेस सपत्नीक भेट

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : शिवसेनेचे नांदेड दक्षिण विधानसभा मतदारसंघाचे आमदार आनंदराव तिडके बोंढारकर यांनी शिर्डीतील बिरोबा देवस्थानला आपल्या परिवारासह भेट दिली.

आ. बोंढारकर यांनी येथील जागृत देवस्थान बिरोबा महाराज मंदीरास भेट दर्शनाचा लाभ घेतला. तेथे त्यांचे स्वागत साई संस्थानचे माजी सुरक्षा अधिकारी कैलास शेजवळ, भाजपा प्रांतिक सदस्य नानासाहेब शिंदे ,संगीता नरोडे यांनी त्यांचे स्वागत केले .

यावेळी आ . बोंढारकर म्हणाले की, मी साई बाबा चा निस्सीम भक्त असून नित्यनेमाने साईंच्या दर्शनासाठी शिर्डीला येत असतो


आज शिर्डी तील जागृत देवस्थान बिरोबा महाराज यांच्या दर्शनाचा योग आला. दर्शनाने अतिशय मनःशांती मिळाली बरेच दिवसांपासून बिरोबा महाराजांचे दर्शन घेण्याची इच्छा आज पूर्ण झाली. दर्शनानंतर शेजारीच असणाऱ्या जिल्हा परिषदेच्या प्राथमीक शाळेस भेट देण्याचा योग आला तेथील शिक्षकांनी स्वागत केले व सत्कार केला यावेळी ते म्हणाले की, या शाळेस अचानक भेट झाली . शाळेने केलेले आदरातीथ्य पाहून मी भारावून गेलो असून शाळेतील विद्यार्थ्यांनी शिक्षण घेवून मोठे व्हावे . शासन स्तरावर जि प शाळेचे गुणवता वाढीसाठी मोठे प्रयत्न करत असल्याचे त्यांनी यावेळी सांगितले.



# जेईई मेनमध्ये यश; दीक्षा अहिरेची व्हीएनआयटी नागपूरमध्ये निवड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : आत्मा मालिक ज्युनिअर कॉलेजची विद्यार्थिनी दीक्षा राहुल अहिरे हिने जेईई मेन परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत नागपूर येथील प्रतिष्ठित तळीींशिीींरअॅर्र छरींळेपरश्र खपीींळींीींश ेष ढशलहपेश्रेसू (तछखढ) मध्ये प्रवेश मिळविला आहे. तिची इलेक्ट्रिकल अँड इलेक्ट्रॉनिक्स अभियांत्रिकी (बी.टेक.) या चार वर्षांच्या पदवी अभ्यासक्रमासाठी निवड झाली आहे.



दीक्षाला होम स्टेट कोटा अंतर्गत एससी-पीडब्ल्यूडी प्रवर्गातून प्रवेशाची संधी मिळाली. तिने जेईई मेन परीक्षेत एससी-पीडब्ल्यूडी अखिल भारतीय क्रमांक १७५, सीआरएल-पीडब्ल्यूडी क्रमांक २,३९५, एससी क्रमांक ७९,८४३ तसेच सीआरएल क्रमांक ९,०१,७०३ प्राप्त करून आपली गुणवत्ता सिद्ध केली.

तिच्या या यशामुळे आत्मा मालिक ज्युनिअर कॉलेजच्या शैक्षणिक गुणवत्तेला पुन्हा एकदा अधोरेखित करण्यात यश आले आहे. दीक्षाच्या मेहनतीबरोबरच संस्थेच्या मार्गदर्शनाचा मोठा वाटा असल्याचे मानले जात आहे.

या यशाबद्दल संस्थेचे अध्यक्ष नंदकुमार सूर्यवंशी, उपाध्यक्ष बाळासाहेब गोरडे, सरचिटणीस हनुमंतराव भोंगळे, कोषाध्यक्ष विठ्ठलराव होन, विश्वस्त प्रकाश गिरमे व प्रदीपकुमार भंडारी, शालेय व्यवस्थापक सुधाकर मलिक, वसतिगृह व्यवस्थापक साईनाथ वर्पे व मीरा पटेल, प्राचार्य नामदेव डांगे तसेच विभागप्रमुख विष्णूवर्धन महांकाली व प्रवीण उगले यांनी तिचे अभिनंदन करून पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

# अभय योजनेच्या लाभापासून कोपरगावकर वंचित; आमदारांवर सोनवणे यांची टीका

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**कोपरगाव** : राज्य शासनाच्या नगरविकास विभागामार्फत नगरपरिषद, नगरपालिका व नगरपंचायत क्षेत्रातील नागरिकांसाठी राबविण्यात आलेल्या अभय योजनेचा लाभ कोपरगाव शहरातील नागरिकांना मिळवून देण्यात स्थानिक आमदार आशुतोष काळे अपयशी ठरल्याचा आरोप माजी नगराध्यक्ष राजेंद्र सोनवणे यांनी केला आहे.



सोनवणे यांनी प्रसिद्धीपत्रकाद्वारे म्हटले आहे की, कोपरगाव शहरातील सुमारे १८ हजार ६२८ मालमत्ताधारकांवर शास्तीचा अतिरिक्त आर्थिक बोजा पडला असून याचा फटका सामान्य नागरिक, व्यापारी, नोकरदार आणि मध्यमवर्गीय कुटुंबांना बसत आहे. राज्यातील श्रीगोंदा, सिन्नर, सासवड, जेजुरी, चाकण, शिरूर, शिरपूर, पाचोरा आणि गडहिंग्लज आदी नगरपरिषद क्षेत्रांमध्ये स्थानिक आमदारांनी पुढाकार घेऊन नागरिकांना शंभर टक्के शास्तीमाफीचा लाभ मिळवून दिला. मात्र कोपरगावमध्ये याबाबत कोणतीही ठोस कार्यवाही करण्यात आली नसल्याचा आरोप त्यांनी केला.

नगरविकास विभागाने अभय योजनेच्या माध्यमातून नागरिकांना दिलासा देण्याची संधी उपलब्ध करून दिली असतानाही त्याचा लाभ कोपरगावला मिळवून देण्यासाठी आवश्यक पाठपुरावा करण्यात आला नाही, असेही सोनवणे म्हणाले. लोकप्रतिनिधींनी नागरिकांच्या प्रश्नांसाठी शासन दरबारी सातत्याने प्रयत्न करणे अपेक्षित असते. मात्र या प्रकरणात झालेल्या दुर्लक्षामुळे नागरिकांवर अतिरिक्त आर्थिक भार पडल्याचे त्यांनी नमूद केले.

# आत्महत्याग्रस्त शेतकऱ्यांना आर्थिक मदत किमान पाच लाखांची मदत द्या : प्रसाद तनपुरे

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**



**राहुरी** : राज्यातील कर्मचाऱ्यांच्या र्जबाजारीपणामुळे होणा-या आत्महत्यांच्या घटनांमध्ये सातत्याने वाढ होत आहेत. शेतकरी आत्महत्या ही एक गंभीर सामाजिक व आर्थिक समस्या झालेली आहे. आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या कुटुंबीयांना शासनाकडून एक लाख रूपयांची आर्थिक मदत देण्यात येते. आर्थिक मदतीच्या एक लाख रूपयांच्या मर्यादेमध्ये सन २००१ पासून अद्यापपर्यंत कुठलीही वाढ करण्यात आलेली नाही. आत्महत्याग्रस्त शेतकरी हे बहुतांश अत्यल्प भूधारक असतात. परंतू त्यांना देण्यात येणारी आर्थिक मदत अत्यंत अल्प असल्यामुळे यामध्ये वाढ करण्याची मागणी सातत्याने होत आहे. तसेच ही मदत देताना होणारा विलंब टाळण्यासाठी याबाबतचा जिल्हानिहाय आढावा जिल्हाधिका-यांनी प्रत्येक महिन्यामध्ये घेणे आवश्यक आहे, ज्यामुळे प्रलंबीत प्रकरणांचा निपटारा तातडीने होऊ शकेल. आत्महत्याग्रस्त शेतक-यांच्या कुटुंबीयांना शासनाकडून देण्यात येणा-या आर्थिक मदतीची रक्कम किमान ५ लाख रूपये करण्याबाबत योग्य तेकार्यवाहीचे आदेश व्हावेत अशी मागणी माजी खासदार प्रसाद तनपुरे यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांना लेखी निवेदनाद्वारे केली आहे.

हे पत्र **मालक, मुद्रक, प्रकाशक काकासाहेब बाबासाहेब नवले** यांनी त्यांच्या साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड करिता, प्लॉट नं. २० ए, इंदिरानगर, शिरसगाव, श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र) ४१३ ७०९ इंडिया येथे छापून साईवेद प्रकाशन प्रायव्हेट लिमिटेड, दै. राष्ट्र सह्याद्री कार्यालय, मिनी स्टेडियम कॉम्प्लेक्स, पहिला मजला, नवीन कोर्टाशेजारी, श्रीरामपूर, जि.अहिल्यानगर, पिन नं. ४१३७०९, जिल्हा कार्यालय -कोहिनूर प्लाझा, दूसरा मजला, पत्रकार चौक, नगर-मनमाड रोड, अहिल्यानगर, महाराष्ट्र, इंडिया येथे प्रकाशित केले, संपादक : करण बाबासाहेब नवले RNI No. MAHMAR/2019/82605 www.rashtrasahyadri.com
owner "publisher & Printer **Kakasaheb Babasaheb Nawale** To be Printed At Saved Prakashan Private Limited 2d, plot n. 20 A, Indiranagar, Shirasgaon, Shrirampur, Dist. Ahilyanagar, 413709 (Maharashtra) India & published At Saived Prakashan Private Limited Daily Rashtra Sahyadri Office, Mini Stedium Complex, First Floor. Near New Court, Shrirampur. Dist. Ahilyanagar, Maharashtra 413 709, India Editor: **Karan Babasaheb Nawale**" RNI No MAHMAR/2014/82605 www.rashtrasahyadri.com, EmalID- rashtrasahyadri@gmail.com. Mo. 7774001818 (पोस्टल परवाना No:G-2/Rashtra Shyadri / RNP/2025-26 )

# डिजिटल बँकिंगकडे प्रवरा बँकेची दमदार झेप!

## प्रवरा पे मोबाईल बँकिंग व UPI सेवेचा जल्लोषात शुभारंभ

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**प्रवरानगर** : ग्रामीण सहकार क्षेत्रात डिजिटल परिवर्तनाचा नवा अध्याय लिहित प्रवरा सहकारी बँक, लोणी यांनी प्रवरा पे मोबाईल बँकिंग प व यु.पी.आय पेमेंट सेवा ग्राहकांच्या सेवेत दाखल केली. जलसंपदा तथा पालकमंत्री ना. डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांच्या हस्ते या आधुनिक डिजिटल सुविधेचा उत्साहात शुभारंभ करण्यात आला.




ग्राहकांना अधिक जलद, सुरक्षित, पारदर्शक आणि सुलभ बँकिंग अनुभव देण्याच्या उद्देशाने सुरू करण्यात आलेली ही सेवा सहकार क्षेत्रासाठी महत्त्वाचा टप्पा मानली जात आहे. आता प्रवरा बँकेच्या ग्राहकांना मोबाईलद्वारे निधी हस्तांतरण, खात्याची माहिती, व्यवहार व्यवस्थापन आणि यु. पी. आय पेमेंट सुविधा सहज उपलब्ध होणार आहे.

यावेळी बोलताना मान्यवरांनी सांगितले की, सहकारी बँकिंग क्षेत्रात ग्राहक व ठेवीदारांनी दाखवलेल्या विश्वासाच्या जोरावर प्रवरा सहकारी बँकेने उल्लेखनीय प्रगती साधली आहे. उत्कृष्ट सेवा, आधुनिक तंत्रज्ञानाचा स्वीकार आणि पारदर्शक कारभारामुळे बँकेने स्वतःची वेगळी ओळख निर्माण केली आहे.

देशात पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली डिजिटल व्यवहारांना मोठी चालना मिळाल्यामुळे आर्थिक व्यवहार अधिक सुलभ, सुरक्षित आणि पारदर्शक झाले असून डिजिटल अर्थव्यवस्थेला बळकटी मिळत असल्याचे यावेळी नमूद करण्यात आले. तसेच केंद्रीय सहकार मंत्री अमित शाह यांच्या मार्गदर्शनाखाली सहकार क्षेत्राला नवे बळ मिळाल्याने सहकारी बँकांच्या विकासाला वेग मिळत असल्याचे सांगण्यात आले. प्रवरा पे सारख्या आधुनिक सेवांमुळे ग्राहकांना दर्जेदार बँकिंग सेवा मिळेल आणि सहकार क्षेत्राच्या आधुनिकीकरणाला नवी दिशा मिळेल, असा विश्वास मान्यवरांनी व्यक्त केला.

या शुभारंभ सोहळ्यास माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के, भाजप प्रदेश उपाध्यक्ष डॉ. सुजय दादा विखे, प्रवरा बँकेचे चेअरमन डॉ. भास्करराव खर्डे, व्हा. चेअरमन मच्छिंद्र थेटे तसेच विविध संस्थांचे पदाधिकारी, संचालक, सभासद व कर्मचारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

## द•ख•ल

### मुळा कारखान्याच्या संचालकपदी वसंत कुसळकर यांची निवड



**सोनई** : नेवासा तालुक्यातील मुळा सहकारी साखर कारखान्याच्या नवनिर्वाचित संचालकपदी युवा कार्यकर्ते वसंतराव चिमाजी कुसळकर यांची एकमताने बिनविरोध निवड झाली. या निवडीबद्दल युवा कार्यकर्ते बाबाराजे कुसळकर, व्यावसायिक संतोष चपळे, आदींनी त्यांचे पुष्पगुच्छ देऊन अभिनंदन केले. कुसळकर म्हणाले की, माजी मंत्री शंकररावजी गडाख यांच्या विचारसरणीतून कारखान्याच्या व शेतकऱ्यांच्या हिताच्या निर्णयाला भक्कम बळ देऊ अशी प्रतिक्रिया दिली.

### परवेज सय्यद यांचे एमपीएससीत यश; अन्न व औषध प्रशासन विभागात निवड



**चांदा** : नेवासा तालुक्यातील रस्तापूर येथील परवेज दिलशाद सय्यद यांनी महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या (एमपीएससी) २०२५-२६ स्पर्धा परीक्षेत उल्लेखनीय यश संपादन करत अन्न व औषध प्रशासन विभागात निरीक्षकपदी निवड मिळवली आहे. त्यांच्या या यशामुळे रस्तापूरसह परिसरात आनंदाचे वातावरण आहे. परवेज सय्यद यांचे प्राथमिक शिक्षण रस्तापूर येथील जिल्हा परिषद शाळेत, तर माध्यमिक शिक्षण स्थानिक हायस्कूलमध्ये झाले. त्यानंतर चांदा, प्रवरानगर आणि पंजाब येथे त्यांनी उच्च शिक्षण पूर्ण केले. अतिशय प्रतिकूल आर्थिक परिस्थितीत शिक्षण घेत त्यांनी जिद्द, चिकाटी आणि कठोर परिश्रमांच्या बळावर हे यश मिळवले. परवेज हे रस्तापूरचे माजी सरपंच नौशाद सय्यद यांचे पुतणे असून टँक ड्रायव्हर दिलशाद सय्यद यांचे सुपुत्र आहेत. त्यांच्या यशाबद्दल रस्तापूर व परिसरातून अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

### यशराज घाडगे देशात ४७ वा; 'सीए' परीक्षेत यश



**पुणतांबा** : परिसरातील मातुलठाण येथील रहिवासी असलेल्या यशराज अरविंद घाडगे याने चार्टर्ड अकाउंटंट (सीए) अंतिम परीक्षेत पहिल्याच प्रयत्नात उत्तुंग यश संपादन केले आहे. यशराजने थेट ऑल इंडिया रँक (AIR) ४७ वा मिळवून पुणतांब्यासह संपूर्ण पंचक्रोशीच्या शिरपेचात मानाचा तुरा रोवला आहे. यापूर्वी 'सीए फाउंडेशन' परीक्षेतही त्याने भारतात दुसरा (AIR 2) क्रमांक पटकावून आपल्या बुद्धिमत्तेची चुणूक दाखवून दिली होती. आता सीए अंतिम परीक्षेतही तोच दबदबा कायम राखत त्याने पहिल्याच प्रयत्नात हे यश खेचून आणले आहे. यशराज हा मातुलठाण येथील आदर्श शेतकरी गंगाधर दामोदर घाडगे, श्रीरामपूर न्यायालयातील ज्येष्ठ वकील बाबासाहेब दामोदर घाडगे आणि पुणे येथील प्रसिद्ध सीए बाळासाहेब दामोदर घाडगे यांचा तो नातू असून, नामवंत टॅक्स कन्सल्टंट अरविंद घाडगे यांचा तो सुपुत्र आहे.

### क्षितिजा शिंदेची एलएलबी सीएटी परीक्षेत घवघवीत यश



**सोनई** : महाराष्ट्र शासनाच्या सीईटी सेलद्वारे एम.ए.एच एलएलबी. ५ वर्ष (सीईटी २०२६) परीक्षेचा निकाल १६ जून २०२६ रोजी जाहीर झाला. या निकालात नेवासा तालुक्यातील सुरेगाव(गंगा)येथील व सध्या छत्रपती संभाजीनगर येथे वास्तव्यास असलेल्या क्षितिजा संदीप शिंदे हिने पहिल्याच प्रयत्नात ९९.२३ पर्सेंटाइल गुण मिळवून घवघवीत यश संपादन करून गावाचे नाव राज्यात उजळवले आहे. क्षितिजाचे वडील संदीप शिंदे(पी.एस.आय) व आई विद्या शिंदे(ए.पी.आय.) यांच्या मार्गदर्शनाखाली तिने हे यश संपादन केले आहे. तिच्या या यशाबद्दल संपूर्ण सुरेगाव परिसरात आनंदाचे वातावरण आहे.

# वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी पाण्याचा काटकसरीने वापर करावा : ना. डॉ. राधाकृष्ण विखे पाटील

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी** : भविष्यातील वाढते जलदुर्भिक्ष लक्षात घेता प्रत्येक नागरिकाने, विशेषतः वसतिगृहातील विद्यार्थ्यांनी पाण्याचा नियोजनबद्ध व काटकसरीने वापर करणे ही काळाची गरज असल्याचे प्रतिपादन राज्याचे जलसंपदा मंत्री तथा जिल्ह्याचे पालकमंत्री डॉ. राधाकृष्ण विखे पाटील यांनी केले.

लोणी (हसनापूर) येथे नवनिर्मित आदिवासी मुलांचे शासकीय वसतिगृह तसेच जिल्हा ग्रंथालयाच्या डिजिटल उपकेंद्राच्या इमारतीच्या लोकार्पणप्रसंगी ते बोलत होते. यावेळी माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील, शालिनीताई विखे पाटील, ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर, सहआयुक्त स्वप्निल साबळे, प्रकल्प अधिकारी देवकन्या बोकडे आदी उपस्थित होते.

डॉ. विखे पाटील म्हणाले की, राज्यातील तिसरे डिजिटल ग्रंथालय उपकेंद्र लोणी-हसनापूर परिसरासाठी मानबिंदू ठरणार असून स्पर्धा परीक्षेची तयारी करणाऱ्या विद्यार्थ्यांसाठी ते अत्यंत उपयुक्त ठरेल. या प्रकल्पासाठी जिल्हा नियोजन मंडळातून पाच कोटी रुपयांचा निधी उपलब्ध करून देण्यात आला आहे. येथे आधुनिक तंत्रज्ञानासह विविध सुविधा उभारण्यात येणार आहेत.

सध्या पावसाअभावी धरणांतील पाणीसाठा कमी होत असल्याने पिण्याच्या पाण्याचे नियोजन अधिक काळासाठी करावे लागत आहे. त्यामुळे वसतिगृहांमध्ये पाण्याचा अपव्यय टाळून जलपुनर्वापर व सांडपाणी प्रक्रिया यंत्रणा उभारण्याची गरज असल्याचे त्यांनी सांगितले. विद्यार्थ्यांच्या समस्या वेळेवर सोडविल्यास त्यांच्यावर आंदोलन करण्याची वेळ येणार नाही, असेही त्यांनी नमूद केले. विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी ५०० विद्यार्थ्यांच्या क्षमतेचे सभागृह तसेच सुसज्ज व्यायामशाळा उभारण्याची सूचना त्यांनी केली. आदिवासी समाजातील मुली शिक्षणात आघाडीवर असल्याबद्दल त्यांनी समाधान व्यक्त केले.

ग्रंथालय संचालक अशोक गाडेकर यांनी विद्यार्थ्यांना स्पर्धा परीक्षांसाठी आवश्यक पुस्तके, संगणक व डिजिटल साहित्य उपलब्ध होणार असल्याचे सांगितले. प्रास्ताविकात प्रकल्प अधिकारी देवकन्या बोकडे यांनी वसतिगृहाची क्षमता ७५ वरून १५० विद्यार्थ्यांपर्यंत वाढविल्याची माहिती दिली.

# बेलापूर येथील जामा मशिदीमागील रस्ता अतिक्रमणमुक्त करण्याची मागणी

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**श्रीरामपूर** : तालुक्यातील बेलापूर येथील मेनरोड ते नगर रोडला जोडणारा जामा मशिदीमागील महत्त्वाचा रस्ता तातडीने अतिक्रमणमुक्त करावा, अशी मागणी सिद्धिविनायक युवामंचचे अध्यक्ष गोपाल जोशी यांनी महसूल मंत्री चंद्रशेखर बावनकुळे यांच्याकडे निवेदनाद्वारे केली आहे. सिद्धिविनायक युवा मंचाचे अध्यक्ष गोपाल जोशी यांनी दिलेल्या निवेदनात नमूद केले आहे की, संबंधित रस्ता नगररचना विभागाच्या नकाशानुसार २५ फूट रुंद असून तो बेलापूरमधील दोन प्रमुख मार्गांना जोडणारा महत्त्वाचा दुवा आहे.

या संदर्भात यापूर्वीही जिल्हा प्रशासन आणि संबंधित अधिकाऱ्यांकडे अनेकदा पाठपुरावा करण्यात आला असून अतिक्रमण हटविण्याबाबत आदेशही देण्यात आले होते.

मात्र, स्थानिक स्तरावर कोणतीही ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप निवेदनात करण्यात आला आहे. सदर रस्ता बाजारपेठ व व्यावसायिक भागाला जोडणारा असल्याने भविष्यातील वाहतूक व्यवस्था आणि परिसराच्या विकासाच्या दृष्टीने त्याचे अतिक्रमण त्वरित हटविणे आवश्यक असल्याचे निवेदनात नमूद करण्यात आले आहे.नागरिकांच्या सोयीसाठी तसेच वाहतुकीची कोंडी टाळण्यासाठी प्रशासनाने लवकरात लवकर कारवाई करावी, अशी मागणी सिद्धिविनायक युवा मंचाने केली.

# निंभेरे गावात बिबट्याची दहशत; ग्रामस्थ भयभित

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**


**झरेकाठी** : राहुरी तालुक्यातील निंभेरे येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेजवळ दोन बिबट्यांचे दर्शन झाल्याने परिसरात भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे. ह. भ. प. मनोहर महाराज सिनारे व ह भ प संदेश महाराज सिनारे हे सकाळी प्रवास करत असताना त्यांच्या गाडीसमोर अचानक आल्याने सिनारे थोडक्यात वाचले. या अनपेक्षित घटनेमुळे काही काळ परिसरात एकच कळबळ उडाली विशेषता; शाळेजवळ बिबट्याच्या वावर आढळल्याने विद्यार्थ्यांच्या सुरक्षितेबाबत ग्रामस्थांमध्ये चिंता व्यक्त केली जात आहे. नागरिकांनी सतर्कता बाळगण्यास सुरुवात केली असून लहान मुलांना एकटे बाहेर न पाठवण्याची आव्हान करण्यात येत आहे.दरम्यान, निंभेरे येथील ग्रामस्थांनी वनविभागडी तातडीने कारवाई करण्याची मागणी केली आहे.बिबट्यांना जोरबंद करून नागरिकांना दिलासा द्यावा अशी ठाम भूमिका ग्रामस्थांनी घेतली आहे.

# पावसाने ओढ दिल्याने बळीराजाची चिंता वाढली

## मुसळवाडी तलावातील पाणी साठा ३५ टक्क्यांवर

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** : राहुरी तालुक्यातील पूर्व भागातील सुमारे २० ते २५ गावांना जलसंजीवनी देणाऱ्या मुसळवाडी तलावाची जलसाठवण क्षमता १८९ एमसीएफटी आहे, परंतू सध्या या तलावात अवघा ६७ दशलक्ष घनफूट म्हणजेच ३५ टक्के जलसाठा शिल्लक असल्याची माहिती देवळाली प्रवरा पाटबंधारे उप अभियंता अच्युत गीते व मुसळवाडी पाटबंधारेच्या शाखाधिकारी अश्विनी पटारे यांनी दिली आहे. गेल्या वर्षी निसर्गाच्या कृपेने मुळा धरण व भंडारदरा धरण हे पूर्ण क्षमतेने म्हणजेच शंभर टक्के भरली होती.



यामुळे पाटबंधारे विभागाने मुळा व भंडारदरा धरणातून मुसळवाडी तलाव शंभर टक्के भरला होता. मुसळवाडी तलाव भरल्यानंतर पाटबंधारे विभागाच्या वतीने वर्षभर पाट पाण्याचे योग्य नियोजन करण्यात आले होते. मुसळवाडी तलावात पाणी साठले होते. यामुळे वर्षभर पिकांचे नियोजन या भागात योग्य पद्धतीने केले गेले होते. मुसळवाडी तलावातून सुमारे २० ते २५ गावांमधील नागरिकांना वर्षभर पिण्याचे पाणी पुरविण्यात आले. मुसळवाडीतून पाणीपुरवठा करणाऱ्या मुसळवाडीसह नऊ गावांना प्रादेशिक पाणीपुरवठा योजनेद्वारे पिण्यासाठी पाणीपुरवठा केला जातो. टाकळीमिया, मोरेवाडी, लाख, दरडगाव, जातप, त्रिंबकपूर, महाडूक सेंटर, माहेगाव, मालुंजे खुर्द, महालगाव, खुडसरगाव, पाथरे खुर्द, शेनवडगाव, कोपरे, वांजुळपोई, तिळापूर, बोरीफाटा, मांजरी आदी गावांचा यामध्ये समावेश आहे.

पावसाने ओढ दिल्यामुळे कपाशी लागवड, सोयाबीन पेरणी रखडली आहे. जून महिना संपत आला तरीही पाऊस न पडल्याने शेतकऱ्यांच्या खरिप हंगामातील कपाशी लागवडी व सोयाबीन पिकाच्या पेरण्या रखडल्या आहेत. यामुळे बळी राजाच्या चिंतातूर नजरा आता पावसासाठी आकाशाकडे लागल्या आहेत. जून महिना संपत आला तरी, कुठेही पाऊस झाला नाही आणि मुसळवाडी तलाव लाभ क्षेत्रात सुद्धा पाऊस पडला नाही. त्यातच कडक उन्हामुळे जलसाठ्यात बाष्पीभवनामुळे मोठी घट झाली आहे. सध्या मृत साठा २ टक्के व गाळ अंदाजे ५ टक्के गृहित धरल्यास या तलावात २८ टक्के म्हणजे केवळ ६३ एमसीएफटी पाणी शिल्लक राहिले आहे. परिणामी तलाव तळ गाठण्याच्या स्थितीत आहे.

सध्या अल निनोच्या प्रभावामुळे मान्सूनचे आगमन लांबल्याने बळीराजा चिंतीत आहे. सध्याचा उपलब्ध पाणीसाठा लक्षात घेता जिल्हाधिकारी पंकज आशिया यांच्या आदेशानुसार पिण्याच्या पाण्यासाठी साठा राखीव ठेवण्यात आला आहे. तलावातील जलसाठा ऑगस्टअखेर पुरणार असल्याचे पाटबंधारे विभागाच्या सूत्रांनी सांगितले आहे.

# एकनाथ शिंदे हेच हिंदुहृदसम्राट बाळासाहेब ठाकरे आणि शिवसेनेचे वारस : आ. खताळ



खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांच्या राजकीय वाटचालीला पाठिंबा देताना आमदार खताळ यांनी ठाम भूमिका मांडली. शिवसेनेचा एक जबाबदार कार्यकर्ता म्हणून ज्या ठिकाणी खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांना विरोध होईल, त्या ठिकाणी मी त्यांच्या पाठीमागे ढाल बनून उभा राहीन,

**श्री अमोल खताळ पाटील, आमदार संगमनेर विधानसभा**

शिर्डीचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे शिवसेना मुख्य नेते एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखाली शिवसेनेत सहभागी झाले या निषेधार्थ उद्धव बाळासाहेब ठाकरे गटाच्या कार्यकर्त्यांनी ज्या ठिकाणी त्यांचा निषेध केला त्याच ठिकाणी आपण शिवसेना स्थापना दिवस साजरा करू अशी मागणी शिवसैनिकांनी आमदार अमोल खताळ यांच्याकडे केली त्यांच्या मागणीचा विचार करून त्याच बस स्थानकावर आमदार अमोल खताळ पाटील यांच्या नेतृत्वाखाली त्याच ठिकाणी शिवसेना स्थापना दिवस साजरा करून जल्लोष साजरा केला

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**संगमनेर** : शिवसेनेचे मुख्य नेते तथा राज्याचे उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे हे सर्व सामान्य शिवसैनिकांना न्याय देण्याचे काम करत आहेत. हिंदूहृदयसम्राट शिवसेनाप्रमुख बाळासाहेब ठाकरे यांच्या विचारांचा वारसा पुढे नेण्याचे काम शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे हे करत सल्याचे गौरवोद्गार आमदार अमोल खताळ पाटील यांनी काढले.

संगमनेर येथील बसस्थानक येथे शिवसेना स्थापनादिनाच्या निमित्त संगमनेर शिवसेना महायुतीच्या वतीने आयोजित कार्यक्रमात बोलताना आ. खताळ म्हणाले की, लोकशाही व्यवस्थेत जनतेने निवडून दिलेल्या लोकप्रतिनिधींवर मतदारसंघाचा विकास कामे करण्याची मोठी जबाबदारी असते. विकासकामांना गती देण्यासाठी अनेकदा कठोर निर्णय घ्यावे लागतात. जनतेच्या हितासाठी आणि मतदारसंघाच्या प्रगतीसाठी सत्तेसोबत राहून विकासाची जबाबदारी स्वीकारणे आवश्यक असल्याचे आमदार खताळे यांनी सांगितले.

तुमच्यासोबत असलेले तुमचे सहा खासदार जर तुम्हाला सोडून गेले असतील, तर त्यामागे काही ना काही कारण असणारच. त्यामुळे उद्धव ठाकरे आणि संजय राऊत यांनी आपले खासदार आपल्याला का सोडून गेले याचे आत्मपरीक्षण करावे असा सल्ला आमदार अमोल खताळ यांनी दिला. शिवसेना स्थापना दिनानिमित्त झालेल्या या कार्यक्रमा तून संगमनेर तालुक्यात शिवसेना संघटना अधिक बळकट करण्याचा निर्धार व्यक्त करण्यात आला.

तसेच आगामी काळात पक्षवाढीसह जनतेच्या विकासासाठी एकजुटीने काम करण्याचे आवाहन आमदार अमोल खताळ यांनी केले.

**जाहिर नोटीस**

तमाम लोकांना विशेषतः नेवासा तालुक्यातील लोकांना या नोटीसीव्दारे कळविण्यात येते की,

आमचे अशिल श्री. सुदाम रामदास चव्हाण, रा. शिवपुर, ता. गंगापुर जि. छत्रपती संभाजीनगर यांनी मौजे गळनिंब, ता. नेवासा जि. अहिल्यानगर येथील गट नं. १२३/१, क्षेत्र ०१ हे ३० आर उदयकुमार ज्ञानेश्वर शेळके यांचे नावावरील क्षेत्र, तसेच गट नंबर १२३/२ क्षेत्र ०१ हे ३० आर ज्ञानेश्वर पांडुरंग शेळके यांचे नावावरील क्षेत्र, तसेच गट नंबर १२३/३ क्षेत्र ०१ हे ३० आर सुरज ज्ञानेश्वर शेळके वर नमुद तिन्ही मिळकतीची चर्तुसिमा पुर्वेस गट नंबर १२४, पश्चिमेस :- रस्ता, दक्षिणेसः शिव व रस्ता, उत्तरेसः गट नंबर १३२ असुन अशा चर्तुसिमापुर्वक मिळकतीचा खरेदी खताने विकत घेण्याचा सौदा केलेला आहे व खरेदी घेणार आहेत. सदर मिळकतीबाबत कोणाचाही खरेदी विक्री करारनामा, मृत्यूपत्र, लिज, साठेखत, भाडेपट्टा, इत्यादी स्वरुपाचा कोणत्याही प्रकारचा व्यवहार असल्यास त्वरीत नोटीस प्रसिध्द झाल्यापासुन १५ दिवसाच्या आत आमचे अशिलाशी कागदपत्र घेवुन संपर्क साधावा. १५ दिवसाच्या आत कोणत्याही प्रकारची हरकत, तक्रार न आल्यास आमचे अशिल सदरची मिळकत ही निर्वेध व निंजोखमी असे समजुन सदर मिळकतीचा खरेदीखताचा व्यवहार पुर्ण करतील. त्यानंतर कोणाचीही तक्रार, हरकत ऐकुन घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी. ही जाहिर नोटीस दिली असे.

नेवासा
दिनांक :-१९/०६/२०२६

**सुदाम रामदास चव्हाण**
**मोबा नं. ९६८९८६६२१२**

**ॲड. मुंगसे आर.एम.**
**नेवासा कोर्ट, ता. नेवासा**
**जि. अहिल्यानगर**
**मो. नं. ९८९०७४८७७२**

**चौकशीची जाहीर नोटीस**

जावक क्रमांक / २१००/२०२६
सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय
२रा मजला, मध्यवर्ती प्रशासकीय इमारत,
आकाशवाणी समोर, सावेडी, अहिल्यानगर
दिनांक १९/०६/२०१७

चौकशी अर्ज क्रमांक :- ६७२/२०२६

सार्वजनिक न्यासाचे नाव :- श्री. संत मुकंदास महाराज विठ्ठल सेवा ट्रस्ट, दाढ ब्रु, ता. राहात जि. अहिल्यानगर

अर्जदार :- श्री. भाऊराव यशवंत गाडेकर

सर्व संबंधित लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सहाय्यक धर्मादाय आयुक्त, अहिल्यानगर विभाग, अहिल्यानगर हे वर नमुद केलेल्या नोंदणी अर्ज यासंबंधी महाराष्ट्र सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम १९५० चे कलम १९ अन्वये खालील मुद्यांवर चौकशी करणार आहेत.

१) वर नमुद केलेला न्यास अस्तित्वात आहे काय? आणि सदरचा न्यास सार्वजनिक स्वरुपाचा आहे काय ? न्यासाची स्थावर मिळकत आहे काय?

अ) जंगम मिळकत :- ट्रस्ट नवीन असलेने ट्रस्टकडे जंग मिळकत नाही. तथापि रु.५०००/- मात्र असून ती आजरोजी
विश्वस्त निधीपत्र करुन ठेवणाराचे ताब्यात असे.

ब) स्थावर मिळकत (वर्णन):- मु.पो. दाढ ब्रु. ता. राहाता जि. अहिल्यानगर येथील ग्रा.पं.मि.नं. ३४८, अं.किं. रु.२०,००,०००/- असे

सदरच्या चौकशी प्रकरणामध्ये कोणास काही हरकत घ्यावयाची असेल अगर पुरावा देणेचा असेल त्यांनी त्यांची लेखी कैफीयत ही नोटीस प्रसिध्द झाल्या तारखेपासुन तीस दिवसांचे आत या कार्यालयाचे वरील पत्त्यावर मिळेल अशा रितीने पाठवावी. त्यानंतर आलेल्या कैफीयतीचा विचार केला जाणार नाही. तसेच वरील मुदतीत कैफीयत न आल्यास कोणास काही सांगावयाचे नाही असे समजुन चौकशी पुरी केली जाईल व अर्जाचे निकालाबाबत योग्य ते आदेश दिले जातील.

ही नोटीस माझे सहीनिशी व मा. सहा. धर्मादाय आयुक्त, अहिल्यानगर यांचे शिक्यानिशी आज दिनांक १९/०६/२०२६ रोजी दिली.

**न्याय**
**लिपीक सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय**
**अहिल्यानगर विभाग, अहिल्यानगर,**

शिक्का

**अधिक्षक**
**सार्वजनिक न्यास नोंदणी कार्यालय**
**अहिल्यानगर विभाग, अहिल्यानगर,**

# मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांची आश्वीला भेट

## धोकादायक पाण्याच्या टाकीचा प्रश्न मार्गी लावण्याचे निर्देश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**आश्वी** : अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी संगमनेर तालुक्यातील आश्वी बुद्रुक व आश्वी खुर्द गावांना भेट देत विविध विकासकामांचा सविस्तर आढावा घेतला. यावेळी त्यांनी ग्रामस्थांशी संवाद साधत शासनाच्या विविध योजनांची प्रभावी अंमलबजावणी करण्याच्या सूचना संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

गुरुवारी (दि. १८) झालेल्या या दौऱ्यात भंडारी यांनी आश्वी बुद्रुक ग्रामपंचायतीच्या सुधारित कर आकारणी पुस्तकाची पाहणी केली. तसेच ग्रामपंचायतीच्या कामकाजाबाबत समाधान व्यक्त करत स्वच्छता, जलजीवन मिशन अंतर्गत सुरू असलेल्या पाणीपुरवठा योजना, शिक्षण आणि विविध ग्रामविकास योजनांचा आढावा घेतला. विकासकामे करताना गुणवत्तेशी कोणतीही तडजोड न करता ती निर्धारित मुदतीत पूर्ण करावीत, तसेच शासनाच्या योजनांचा लाभ तळागाळातील पात्र लाभार्थ्यांपर्यंत पोहोचवावा, असे स्पष्ट निर्देश त्यांनी दिले. यावेळी ग्रामविकास अधिकारी व ग्रामपंचायत पदाधिकाऱ्यांनी घरकुल योजनेच्या अंमलबजावणीत वाळू उपलब्धतेचा प्रश्न गंभीर असल्याचे निदर्शनास आणून दिले.




त्यावर प्रशासनाच्या माध्यमातून सकारात्मक तोडगा काढण्याचे आश्वासन भंडारी यांनी दिले. दौऱ्यादरम्यान पंचायत समितीचे गटविकास अधिकारी प्रवीण सिनारे, सहाय्यक गटविकास अधिकारी राजेंद्र ठाकूर, विस्तार अधिकारी सदानंद डोखे, ग्रामपंचायत सचिव विजय अवारी यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

दरम्यान, आश्वी येथील नवकार ग्रुप व व्यापारी असोसिएशनच्या वतीने मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी रमेश चोपडा, समीर गांधी, संजय गांधी, सुशील भंडारी, प्रीतम गांधी, अविनाश गांधी, मंगेश चोपडा, योगेश रातडिया, विनीत गांधी, डॉ. समीर शेख, पंकज नाके, निलेश चोपडा, दीपक बोरा, गौतम गांधी, गौरव सांबरे, अभिजीत गांधी, संतोष भंडारी, विशाल वाकचौरे, सतीश गांधी, रोहित भंडारी, अमित भंडारी, नितीन गांधी, प्रकाश गांधी यांच्यासह ग्रामस्थ व व्यापारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### राष्ट्र सह्याद्रीच्या वृत्ताची दाखल...

आश्वी बुद्रुक येथील जुनी पाण्याची टाकी धोकादायक अवस्थेत असल्याबाबत 'राष्ट्रसह्याद्री'ने २९ मे २०२६ रोजी सचित्र वृत्त प्रसिद्ध केले होते. या वृत्ताची गंभीर दखल घेत मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी संबंधित अधिकाऱ्यांना तातडीने कार्यवाही करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यामुळे अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या या प्रश्नाच्या मार्गी लागण्याची आशा निर्माण झाली असून ग्रामस्थांनी समाधान व्यक्त केले आहे.

## पान १ वरुन

### घुले बंधूंचा सहकारात दबदबा कायम असल्या तरी दोन जागांसाठी निवडणूक टळू शकली नाही.

जिल्ह्यातील सहकार राजकारणात या तिन्ही कारखान्यांना विशेष महत्त्व आहे. या संस्थांमधून घडलेले अनेक नेते राज्याच्या राजकारणात मंत्रीपदांपर्यंत पोहोचले. ग्रामीण अर्थव्यवस्था, रोजगार, शिक्षण, बँकिंग, दूध व्यवसाय आणि सामाजिक विकासाच्या केंद्रस्थानी असलेल्या या कारखान्यांच्या निवडणुका म्हणजे आगामी स्थानिक स्वराज्य संस्थांच्या राजकीय दिशेचे संकेत मानले जातात. सहकारातील वर्चस्व कायम ठेवण्यात सर्व गटांना मोठ्या प्रमाणावर यश मिळाले असले तरी 'पूर्ण बिनविरोध'चा मान मात्र यंदा केवळ घुले बंधूंनीच पटकावला.

### मी पक्षप्रमुख पद सोडायला तयार

योजना आणि कोरोना काळातील कामांचा उल्लेख केला. संकटाच्या काळात आम्ही लोकांच्या पाठीशी उभे राहिलो. ते लोक विसरू नयेत, असेही ते म्हणाले. स्थापना दिनी केलेले हे भाषण आगामी राजकीय घडामोडींच्या पार्श्वभूमीवर उद्धव ठाकरे यांची निष्ठावान शिवसैनिकांना एकत्र ठेवण्याची रणनीती असल्याचे मानले जात असून, शिवसेनेतील संभाव्य फुटीविरोधातील हा सर्वात मोठा राजकीय संदेश मानला जात आहे. शिवसेना (उद्धव बाळासाहेब ठाकरे) पक्षातील नऊपैकी सहा खासदार वेगळा गट स्थापन करून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत जाण्याच्या चर्चांमुळे स्थापना दिनाचा कार्यक्रम विशेष चर्चेत राहिला. या पार्श्वभूमीवर ठाकरेंचे भाषण हे केवळ स्थापना दिनाचे नव्हते, तर पक्षातील संभाव्य बंडाविरुद्धचा राजकीय इशारा मानला जात आहे.

### पाथर्डीत तरुण शेतकऱ्याचा मारहाणीत मृत्यू : चौघांना अटक

व्यवसाय करीत होते. बुधवारी ते पाथर्डी येथील एका खासगी रुग्णालयात उपचारासाठी आले होते. उपचारानंतर रात्री ते पाथर्डी शहरातील शेवगाव रस्त्याच्या परिसरात आले असता, काही अज्ञात व्यक्तींनी त्यांना अडवून बेदम मारहाण केली. या हल्ल्यात ते गंभीर जखमी झाले. घटनेनंतर त्यांना पाथर्डी उपजिल्हा रुग्णालयात दाखल केले. मात्र, प्रकृती गंभीर असल्याने पुढील उपचारासाठी गुरुवारी अहिल्यानगर येथे उपचारासाठी नेत असतानाच त्यांचा मृत्यू झाला. या घटनेनंतर पाथर्डी पोलीस व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकांनी चार संशयित आरोपींना चौकशीसाठी ताब्यात घेतले. पोलिसांनी या सशंयितांना आज न्यायालयात हजर केले असता न्यायालयाने आरोपींना पोलिस कोठडी सुनावली. पोलिसांच्या चौकशीतून घटनेमागील नेमके कारण स्पष्ट होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. या घटनेभोवतीचे गूढ कायम असून, नागरिकांमध्ये विविध चर्चांना उधाण आले आहे. घटनेचा तपास सुरू असून, परिसरातील सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक पुरावे आणि संबंधित व्यक्तींची चौकशी करण्यात येत आहे. या प्रकरणाच्या तपासाकडे शहरासह संपूर्ण तालुक्याचे लक्ष लागले आहे.

### कॉकरोच जनता पार्टीचे आज पुन्हा जंतर मंतरवर आंदोलन

आहे.युवकांचे जीवन आणि मानसिक आरोग्यासाठी परीक्षा धोकादायक बनत चालल्या आहेत. नीटची प्रश्नपत्रिका फुटल्यामुळे मागील काही काळात ११ विद्यार्थ्यांनी आत्महत्या केल्या. यातील पाच आत्महत्या या गत ४८ तासात झाल्या आहेत. दुसऱ्यांदा होणाऱ्या परीक्षेच्या अनिश्चिततेच्या पार्श्वभूमीवर विद्यार्थ्यांची स्थिती आणखी खराब झाली आहे. आत्महत्या केलेल्या विद्यार्थ्यांच्या कुटुंबियांना आर्थिक मदत देणे गरजेचे आहे. कारण या परीक्षेच्या तयारीसाठी संबंधित कुटुंबियांनी आपल्या आयुष्यभराच्या बचतीमधील मोठी रक्कम खर्च केली होती. मुलांच्या मृत्यूनंतर ही कुटुंबे पूर्णपणे असहाय झाली आहेत, असे दिपके यांनी पंतप्रधानांना पाठवलेल्या पत्रात म्हटले आहे. मागील महिनाभरापासून आम्ही धर्मेंद्र प्रधान यांच्या राजीनाम्याच्या मागणीसाठी आंदोलन करीत आहोत. नेतृत्वाला जबाबदार धरले तर शिक्षण आणि परीक्षा प्रणालीवरील विद्यार्थ्यांचा विश्वास काही प्रमाणात परतेल. तसे झाले नाही तर स्थितीत फारसा फरक पडणार नसल्याचा संदेश समाजात जाईल. प्रधान यांना हटवले तर सरकारची प्रतिमा देखील सुधारेल, असे दिपके यांनी पत्राद्वारे सांगितले आहे. कॉकरोच जनता पार्टीकडून यापूर्वी ६ जून रोजी जंतर मंतरवर आंदोलन करण्यात आले होते. त्या आंदोलनाचा युवकांचा चांगला प्रतिसाद मिळाला होता.

### ऑपरेशन टायगरची चर्चा : बंडखोर खासदारांवर एकनाथ शिंदेंचं सूचक भाष्य

कुत्रे झुंडीनं येतात. वाघ एकटाच येतो. कुत्रे भोगतात, टायगर शिकार करतो. आमची शिवसेना बाळासाहेबांचे विचार, धर्मवीर बाळासाहेबांचे विचार पुढे घेऊन जात आहे. माझ्या पाठीशी कोणीही गॉडफादर नव्हता. पण कार्यकर्त्याला आमदार, खासदार, मंत्री, अगदी मुख्यमंत्रीदेखील होऊ शकतो. हीच शिवसेनेची किमया आहे आणि हे केवळ शिवसेनेतच होऊ शकतं. बाळासाहेब कायम म्हणायचे, शिवसैनिक हेच मोठं पद आहे. त्याला कोणीही हटवू शकत नाही. त्यामुळे शिवसैनिकाला जपलं पाहिजे. निवडणुकीत आवडता असलेला कार्यकर्ता नंतर नावडता होता कामा नये. कारण हेच कार्यकर्ते आपल्याला निवडून देत असतात, असे सल्ला त्यांनी उपस्थित नेत्यांना दिला.

# सरपंच नासेर पटेल यांचा वाढदिवस वृक्षारोपणाने साजरा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**गंगापूर :** आदर्श ग्रामपंचायत नारायणपूर (बु.)चे आदर्श सरपंच नासेर पटेल यांच्या ५५ व्या वाढदिवसानिमित्त गावकऱ्यांनी पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत आगळावेगळा उपक्रम राबविला.

सरपंचांच्या वाढदिवसानिमित्त स्मशानभूमी रोडकडे जाणाऱ्या मार्गालगत तब्बल ५५ आंब्याच्या वृक्षांची लागवड करण्यात आली. ''एक वाढदिवस – एक सामाजिक संदेश'' या संकल्पनेतून आयोजित करण्यात आलेल्या या उपक्रमाला गावातील नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. यावेळी गावातील नागरिक, सामाजिक कार्यकर्ते, विविध क्षेत्रातील मान्यवर, ग्रामपंचायत पदाधिकारी व कर्मचारी यांच्या हस्ते वृक्षारोपण करण्यात आले. उपस्थितांनी वृक्षांचे संगोपन करण्याचा संकल्प करत पर्यावरण संरक्षणासाठी प्रत्येकाने पुढाकार घेण्याचे आवाहन केले.




# पारदर्शक व चोख व्यवहारामुळे साई आदर्शने लोकांची मने जिंकली : काकासाहेब कोयटे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी :** चोख व्यवहार व लोकांचा विश्वास यामुळे शिवाजीराव कपाळे यांनी साई आदर्शच्या माध्यमातून लोकांची मने जिंकली त्यांनी संपादित केलेल्या विश्वासामुळे साई आदर्श ही संस्था आज इतरांना आदर्श ठरत असल्याचे मत महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनचे कार्याध्यक्ष काकासाहेब कोयटे यांनी व्यक्त केले. ही संस्था समाज उभा करण्याचे काम करत आहे. सर्वसामान्यांची पत निर्माण करण्याचे काम तसेच समाजाला आर्थिक दृष्ट्या सक्षम करण्याचा ध्यास साई आदर्श संस्थेचे संस्थापक शिवाजीराव कपाळे यांनी घेतला आहे. असे प्रतिपादन महाराष्ट्र राज्य पतसंस्था फेडरेशनचे माजी अध्यक्ष काकासाहेब कोयटे यांनी केले ते राशीन येथे साई आदर्श को-ऑपरेटिव्ह क्रेडिट सोसायटीच्या राशीन शाखेच्या उद्घाटन प्रसंगी बोलत होते. ते पुढे म्हणाले की, साई आदर्श पतसंस्थेने २०१ कोटीच्या ठेवींचा टप्पा पूर्ण केला आहे. संस्थापक

> सध्या महाराष्ट्र पर प्रांतातून मध्ये येणाऱ्या खाजगी कंपन्या डरे ३५ चे ४०% व्याजदराने पैसे वाटप केले जाते. या कंपनीडरे जनतेची लूट चालू आहे. तसेच राष्ट्रीयकृत बँकांमध्ये हजारो कोटींच्या ठेवी असून उद्योजकांना कर्ज उपलब्ध करून दिले जाते. हे उद्योजक दुसऱ्या देशात पळून जातात. त्यांच्यावरती सरकार कुठलीही कारवाई करत नाही. पतसंस्थेतील अपप्रवृत्तींना आम्ही कधीही पाठीशी घालणार नाही.
>
> **काका कोयटे**
> **मा. अध्यक्ष**
> **महाराष्ट्र राज्य, फेडरेशन पतसंस्था.**

### साई आदर्शचा २०१ कोटींच्या ठेवींचा टप्पा पूर्ण

शिवाजीराव कपाळे हे संपूर्ण महाराष्ट्रभर फिरत असतात. त्यांनी पतसंस्था चळवळीला जीवनदान दिले आहे कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी विश्वनाथ आंधळकर हे होते. यावेळी राशीनचे माजी उपसरपंच शाहूराजे राजेभोसले, माजी जि. प. सदस्य दादासाहेब कानगुडे, प्रकाश महाराज दंडे , नागेबाबाचे कडूभाऊ काळे , राम कानगुडे , भीमराव साळवे , नासिक विभाग फेडरेशनचे अध्यक्ष वसंत लोढा , ज्योती क्रांतीचे आदिनाथ हजारे, प्रवीण आंधळकर, उद्धव नेवसे, अल्लाउद्दीन काझी, बाळासाहेब तांबे, पोलीस उपाधीक्षक ईश्वर आंधळकर, सुनील काळे, पांडुरंग भंडारे, जिवराज मंडलेच्या, राहुल सोनमाळी, राजेंद्र देवगावकर, दत्ता गोसावी, रामकिसन साळवे, किशोर थोरात, अविनाश साबरे, प्रकाश बजाज, राजेंद्र राऊत, ॲड.उमेश देवकर, विक्रम मुटकुळे, शफी शेख, रंगनाथ घाडगे, चंद्रकांत कपाळे, मॅनेजर सचिन खडके व साई आदर्श परिवार, ग्रामस्थ, कर्मचारी वृंद मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे प्रस्ताविक संस्थापक शिवाजीराव कपाळे यांनी केले. तर स्वागत पतसंस्थाच्या चेअरमन संगीता कपाळे यांनी केले. सूत्रसंचालन विकी साळवे यांनी केले. आभार गुलाबराव सोनवणे यांनी मानले.




# मुर्शिदपूर येथे शेतकरी मेळावा उत्साहात

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**वैजापूर :** तालुक्यातील मुर्शिदपूर येथे तालुका कृषी विभाग व पाणी फाउंडेशन यांच्या संयुक्त विद्यमाने मेळावा घेण्यात आला

उपविभागीय कृषी अधिकारी आनंद गंजेवार व तालुका कृषी अधिकारी व्यंकट ठक्के, यांच्या मार्गदर्शनाखाली तालुक्यात अनेक गावांमध्ये कृषी विभागाच्या वतीने मार्गदर्शन मेळावे घेण्यात येत आहे.

या मेळाव्यात मंडळ कृषी अधिकारी माधव गांगुर्डे यांनी मुर्शतपुर येथील शिवतेज शेतकरी गटातील शेतकरी बांधवांना दशपर्णी अर्क तयार करणे विषयी मार्गदर्शन केले तसेच कृषी विभागाची ''कापूस उत्पादकता अभियान अंतर्गत कपास क्रांती'' योजनेची माहिती दिली यामध्ये कमी अंतरावरील कापूस लागवड सधन कापूस लागवड, एकात्मिक कापूस लागवड याविषयी सविस्तर माहिती देऊन गटाने ऑनलाईन नोंदणी करण्याविषयी मार्गदर्शन केले.

सहाय्यक कृषी अधिकारी मीना पंडित यांनी सोयाबीन उगवण क्षमता चाचणी प्रयोग व बीज प्रक्रिया प्रात्यक्षिकाची माहिती देऊन प्रात्यक्षिक करून दाखविले. यावेळी दशपर्णी अर्क तयार करण्यात आला कार्यक्रमासाठी शिवतेज गटाचे सदस्य कृष्णा जाधव, बाळासाहेब जाधव, पवन जाधव, ऋषिकेश जाधव, अर्जुन जाधव, महेश थोरात विठ्ठल नागुडे, रामेश्वर जाधव, सुनिता साळुंखे, पूर्वा साळुंखे, चंद्रकला जाधव, अभी कदम सह शेतकरी मोठ्या संख्येने उपस्थित होते.



# पुष्पगुच्छ देऊन ६0 विद्यार्थ्यांचा पहिलीत प्रवेश प्रवेश

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**राहुरी** राहुरी तालुक्यातील टाकळीमिया जिल्हा परिषद प्राथमिक शाळेमध्ये प्रवेशोत्सव शालेय मुलांना गुलाब पुष्प देऊन उत्साहात साजरा करण्यात आला. यावेळी नव्या शैक्षणिक वर्षाच्या पहिल्या दिवशी इयत्ता पहिलीच्या विद्यार्थ्यांना गुलाब पुष्प देऊन प्रवेश देण्यात आला. यावेळी ६० विद्यार्थ्यांनी पहिलीच्या वर्गात प्रवेश घेतला. यावेळी सर्व विद्यार्थ्यांना शासनाच्या वतीने मोफत पाठ्यपुस्तके, गणवेश व बूट, सॉक्स यांचे वितरण ग्रामस्थांच्या वतीने करण्यात आले. यावेळी विद्यार्थ्यांना बर्थडे कॅप घालून फुगे देऊन त्याचप्रमाणे गुलाब पुष्प व चॉकलेट देऊन विद्यार्थ्यांचे स्वागत करण्यात आले. यावेळी मुख्याध्यापक विजय कदम यांनी प्रास्ताविक भाषणात सांगितले की, विद्यार्थ्यांच्या जीवनातील पहिल्या शालेय दिवसाचे महत्त्व विशेष असे असून शिक्षण हीच उज्वल भविष्याची खरी गुरुकिल्ली असल्याचे सांगितले. यावेळी सरपंच लीलाताई गायकवाड, शासकीय निरीक्षक प्राथमिक आरोग्य केंद्राचे वैद्यकीय अधिकारी डॉ. प्रसाद मासाळ, डॉ. तनपुरे साखर कारखान्याचे संचालक सुरेश भानुदास करपे, बाळासाहेब जाधव, संदीप विधाटे, विजय तोडमल, नंदू जुंदरे, गणेश तोडमल, सतीश निमसे,शिक्षक अब्बास शेख, तुकाराम वायळ, नानासाहेब गाढे, अभिजीत कुलकर्णी, अमोल कदम, जयश्री शेळके, स्वाती पालवे, तुळजा भांड, सारिका सगळगिळे, आदींसह महिला पालक, ग्रामस्थ उपस्थित होते.

## निधन वार्ता

### राजस लबडे



**श्रीरामपूर:** ,शहरा नजीकच्या दत्तनगर येथील रहिवाशी राजस (सुरेखा) आप्पासाहेब लबडे (वय६५) वर्षे यांचे सोमवार दि. १५ जून रोजी अल्पशा आजाराने निधन झाले. त्यांच्या पश्चात पती, दोन मुले, सुना ,नातवंडे असा मोठा परिवार आहे. त्या डॉ. अप्पासाहेब लबडे यांच्या पत्नी होत.

### सौ. वसुधा गोंधळी



**श्रीरामपूर :** येथील डॉ. सौ.वसुधा राजेंद्र गोंधळी (वय -५५) यांचे अल्पश: आजाराने दुःखद निधन झाले.

सुप्रसिद्ध हृदयरोग तज्ञ डॉ. राजेंद्र गोंधळी यांच्या पत्नी, तसेच मुलगा डॉ.वरद गोंधळी व मुलगी डॉ. गायत्री विवेक लहाने यांच्या मातोश्री होत्या. त्यांच्या पश्चात पती, एक मुलगा, एक मुलगी, दिर, पुतणे, जावई असा परिवार आहे.

# आरक्षण उपवर्गीकरणाचा लढा कुणाच्या विरोधात नाही : सचिन साठे

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**




**राहुरी :** अनुसूचित जातींतील वंचित घटकांना न्याय मिळावा आणि आरक्षणाचा लाभ सर्व स्तरांपर्यंत पोहोचावा यासाठी आरक्षण उपवर्गीकरणाचा लढा सुरू असून तो कोणत्याही समाजाच्या विरोधात नसल्याचे प्रतिपादन साहित्यरत्न लोकशाहीर डॉ. अण्णाभाऊ साठे यांचे नातू सचिन साठे यांनी केले. पुणे ते मुंबई लाँग मार्चच्या निमित्ताने राहुरी येथे सकल मातंग समाजाच्या वतीने आयोजित प्रबोधन मेळाव्यात ते बोलत होते. सचिन साठे म्हणाले की, अनुसूचित जातींच्या आरक्षण उपवर्गीकरणाचा लढा १९६१ पासून सुरू असून अनेक महापुरुषांनी यासाठी संघर्ष केला आहे. सर्वोच्च न्यायालयाने राज्य सरकारला उपवर्गीकरणाबाबत स्पष्ट निर्देश दिले आहेत. तेलंगणा, कर्नाटक, पंजाब आणि तामिळनाडू या राज्यांमध्ये संविधानाच्या चौकटीत उपवर्गीकरण लागू करण्यात आले आहे. त्यामुळे महाराष्ट्रातही त्याची अंमलबजावणी व्हावी, अशी मागणी त्यांनी केली. राज्य सरकारने माजी न्यायमूर्ती बदर समितीचा अहवाल स्वीकारला असून आगामी पावसाळी अधिवेशनात उपवर्गीकरणाचा निर्णय घ्यावा, असेही त्यांनी सांगितले. तसेच २४ जून रोजी मुंबईतील आझाद मैदानावर होणाऱ्या आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी होण्याचे आवाहन त्यांनी समाजबांधवांना केले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी रविंद्र शेलार होते. नगराध्यक्ष भाऊसाहेब मोरे यांच्या हस्ते सचिन साठे यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी विविध मान्यवरांसह अहिल्यानगर जिल्ह्यातील सकल मातंग समाजाचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन निलेश जगधने यांनी केले, तर आभार ज्ञानेश्वर जगधने यांनी मानले.

# शिर्डीत शिवसेनेचा ६0 वा वर्धापनदिन उत्साहात साजरा

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**शिर्डी :** उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेचा ६० वा वर्धापनदिन शिर्डीत मोठ्या उत्साहात आणि जल्लोषात साजरा करण्यात आला. शिर्डी बसस्थानकासमोर आयोजित कार्यक्रमात शिवसैनिकांनी घोषणाबाजी करत पक्षाचा वर्धापनदिन साजरा केला.

या कार्यक्रमाला संगमनेरचे आमदार अमोल खताळ, माजी आमदार भाऊसाहेब कांबळे, जिल्हाध्यक्ष कमलाकर कोते यांच्यासह मोठ्या संख्येने शिवसैनिक उपस्थित होते. यावेळी बोलताना आमदार अमोल खताळ यांनी हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे यांनी ज्या विचारांवर शिवसेनेची स्थापना केली, त्याच विचारांचा वारसा पुढे नेण्याचे काम उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे करीत असल्याचे सांगितले.

खताळ यांनी यावेळी खासदार संजय राऊत यांच्यावर टीका करत शिवसेनेच्या अधोगतीसाठी त्यांना जबाबदार धरले. त्यांच्या वक्तव्यांमुळे आणि चुकीच्या राजकीय धोरणांमुळे पक्षाचे मोठे नुकसान झाल्याचा आरोप त्यांनी केला. तसेच उद्धव ठाकरे आणि त्यांच्या सहकाऱ्यांनी पक्षाच्या सध्याच्या स्थितीबाबत आत्मपरीक्षण करण्याची गरज असल्याचेही ते म्हणाले.

शिर्डीचे खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर निर्माण झालेल्या राजकीय परिस्थितीवरही खताळ यांनी भाष्य केले. मतदारसंघाच्या विकासासाठी काही वेळा




कठोर निर्णय घ्यावे लागतात आणि वाकचौरे यांनीही विकासाच्या दृष्टीने हा निर्णय घेतल्याचे त्यांनी सांगितले.

लोकशाहीत प्रत्येकाला आंदोलनाचा अधिकार असला तरी खासदारांच्या विरोधात आक्रमक भूमिका घेण्याचा प्रयत्न झाल्यास शिवसैनिक त्याला योग्य प्रत्युत्तर देतील, असा इशाराही त्यांनी दिला. दरम्यान, राज्यातील बदलत्या राजकीय घडामोडींमुळे जिल्ह्यातील राजकारणाला नवे वळण मिळाले असून या कार्यक्रमाची राजकीय वर्तुळात विशेष चर्चा रंगली.


## Change in name

I HAVE CHANGE MY OLD NAME SAHEER NAZIRBHAI SHAIKH( BEFORE NAME ) TO NEW NAME AS SAHEER NAJEER SHAIKH (AADHAR NO. 9704 3328 8327) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE SHRIRAMPUR PLACE: SHRIRAMPUR DATE : 18/06/2026

## Change in name

I AKBAR CHAND SHAIKH - declair that in my school certificate my name is **Shaikh akbar shaikh chand** and in my adhar card my name is **akbar chand Shaikh** both name is one person against adhar card No. 988432524199


# प्रवरेच्या कृषी महाविद्यालयाने केली १५० शेतकऱ्यांच्या जमिनीची मोफत आरोग्य तपासणी

**प्रतिनिधी | राष्ट्र सह्याद्री**

**लोणी:** लोकनेते पद्मभूषण लोकनेते डॉ. बाळासाहेब विखे पाटील प्रवरा ग्रामीण शिक्षण संस्थेच्या प्रवरा कृषी शास्त्र संस्थेअंतर्गत कार्यरत असलेल्या लोणी येथील कृषी महाविद्यालयाच्या वतीने प्रवरा परिसरातील १० गावांतील १५० शेतकऱ्यांच्या जमिनीची मोफत मृदा आरोग्य तपासणी करण्यात आली. या उपक्रमामुळे शेतकऱ्यांना त्यांच्या जमिनीच्या सुपीकतेची अचूक माहिती मिळणार असून पीकनिहाय खत व्यवस्थापनासाठी मार्गदर्शन होणार आहे.

ना.राधाकृष्ण विखे यांच्या ६७ व्या वाढदिवसानिमित्त हा उपक्रम राबविण्यात आला. संस्थेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. सुस्मिता विखे आणि कृषी संचालक डॉ. उत्तमराव कदम यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

ग्रामीण कृषी जागरूकता व कार्यानुभव कार्यक्रमांतर्गत अंतिम वर्षात शिक्षण घेणाऱ्या सुमारे ५० विद्यार्थ्यांनी आश्वी खुर्द, आश्वी बुद्रुक, उंबरी बाळापूर, ओझर खुर्द, ओझर बुद्रुक, पाथरे, सोनगाव, सात्रळ, राजुरी आणि खंडाळा या गावांमध्ये प्रत्यक्ष शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन मातीचे नमुने संकलित केले. हे नमुने कृषी क्षेत्रातील अग्रगण्य 'देहात' कंपनीच्या सहकार्याने कृषी महाविद्यालयाच्या मृदा शास्त्र विभागाच्या प्रयोगशाळेत तपासण्यात आले.

माती परीक्षणानंतर प्रत्येक नमुन्याचा सविस्तर अहवाल तयार करण्यात आला असून कृषीदूत व कृषिकन्या म्हणून कार्यरत असलेले विद्यार्थी हा अहवाल प्रत्यक्ष शेतकऱ्यांना समजावून सांगणार आहेत. तसेच मातीतील अन्नद्रव्यांची उपलब्धता, कमतरता आणि पीकनिहाय खत व्यवस्थापनाबाबत मार्गदर्शनही करणार आहेत.

या उपक्रमासाठी प्रभारी प्राचार्य प्रा. अमोल खडके, कार्यक्रम समन्वयक डॉ. रमेश जाधव, कार्यक्रम अधिकारी डॉ. विक्रम अनाप व प्रा. अक्षया वाळुंज, मृदा शास्त्र विभाग प्रमुख प्रा. प्रियंका दिघे तसेच देहात कंपनीचे महाव्यवस्थापक एच. आर. धनुष, डॉ. विशाल सोनवणे आणि दीपक देवडे यांनी विशेष मार्गदर्शन केले.

शेतकऱ्यांच्या जमिनीचे आरोग्य जपून उत्पादनवाढीसाठी वैज्ञानिक शेतीचा पाया मजबूत करण्याच्या दृष्टीने हा उपक्रम महत्त्वपूर्ण ठरत असल्याची भावना सहभागी शेतकऱ्यांनी व्यक्त केली.




सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## नशिबाची परिक्षा

शनिवार दि . २० जून २०२६

**मिलनम डे**

उदय-अस्त सिंगल ५-१-९ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १२९ १५६ ११० | २-६ | १२३ ३६७ ५५६ | जोड २४-८६-०३-९५-६७ |

**कल्याण**

उदय-अस्त सिंगल ९-४-५ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १९० ४६० २८० | ०-५ | १४० २३० ७८० | जोड ०१-२५-४३-७९-५८ |

**मुंबैम (मेन)**

उदय-अस्त सिंगल ४-७-९ मजबुत

| | | | |
|---|---|---|---|
| १३० १४९ ११२ | ४-२ | १३८ २४६ २२८ | जोड ४०-६२-७१-३९-२५ |

सदर शुभांक हे संख्याशास्त्र व ज्योतिष आधारीत आहे, कृपया दुरूपयोग करू नये. मो. ९९७५४७९८२६

## शुभ लाभ

| Date | Mon | Tue | Wed | Thu | Fri |
|---|---|---|---|---|---|
| 30/03/2026 to 03/04/2026 | 289 90 136 | 134 87 160 | 270 97 278 | 119 12 156 | 169 66 259 |
| 06/04/2026 to 13/04/2026 | 133 70 226 | 145 02 778 | 135 98 477 | 350 82 156 | 124 78 468 |
| 13/04/2026 to 20/04/2026 | 569 06 150 | 149 43 670 | 239 45 500 | 133 77 890 | 260 85 140 |
| 20/04/2026 to 27/04/2026 | 578 00 127 | 889 58 459 | 122 53 355 | 557 71 380 | 349 68 378 |
| 27/04/2026 to 04/05/2026 | 358 63 120 | 440 85 780 | 160 71 128 | 679 29 199 | 688 27 250 |
| 04/05/2026 to 11/05/2026 | 179 71 399 | 148 34 680 | 239 48 279 | 246 25 258 | 240 66 259 |
| 11/05/2026 to 18/05/2026 | 566 79 270 | 370 09 234 | 600 68 233 | 190 01 128 | 477 85 159 |
| 18/05/2026 to 25/05/2026 | 890 79 450 | 568 96 178 | 147 22 129 | 788 30 488 | 289 93 256 |
| 25/05/2026 to 01/06/2026 | 560 11 290 | 346 37 133 | 890 78 468 | 190 05 258 | 460 06 556 |
| 01/06/2026 to 08/06/2026 | 440 89 135 | 990 80 127 | 260 82 570 | 128 11 290 | 590 48 134 |
| 08/06/2026 to 15/06/2026 | 456 56 123 | 556 67 188 | 458 76 466 | 240 69 379 | 689 33 139 |
| 15/06/2026 to 19/06/2026 | 119 15 249 | 348 50 136 | 158 42 390 | 257 4 | |

## द•ख•ल

### डोंगरगण व भूतकरवाडी शाळेतील विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप



**अहिल्यानगर :** समाजाचे आपण काही देणे लागतो, या सामाजिक उत्तरदायित्वाच्या भावनेतून अहिल्यानगर येथील 'नगर जल्लोष ट्रस्ट' परिवाराच्या वतीने जिल्हा परिषद प्राथमिक शाळा डोंगरगण व श्री छत्रपती शिवाजी महाराज म न पा प्राथमिक शाळा भूतकरवाडी, अहिल्यानगर येथे विद्यार्थ्यांना शालेय साहित्याचे वाटप करण्यात आले. या उपक्रमांतर्गत शाळेतील इयत्ता पहिली ते चौथीच्या सर्व विद्यार्थ्यांना विविध प्रकारचे शालेय साहित्य प्रदान करण्यात आले. श्री छत्रपती शिवाजी महाराज म न पा प्राथमिक शाळा भूतकरवाडी येथील शाळेतील ४५ विद्यार्थ्यांना संस्थेचे लौकिक शिंगवी यांच्या वतीने शाळेचे नवीन बूट भेट देण्यात आले. तसेच शाळेच्या वतीने पर्यावरण संवर्धनाचा संदेश देत गुलाबाच्या पुष्परोपाचे भेटवस्तू स्वरूपात वितरण करून मान्यवरांचा आभारपूर्वक सत्कार करण्यात आला. यावेळी नगर जल्लोष ट्रस्टचे सल्लागार समिती प्रमुख सुहासभाई मुळे, किशोर शिंगवी, सागर बोगा, लौकिकशेठ शिंगवी, अक्षय आंबेकर, सतीश चिंता, दीपक गुंडू, स्तिमित राशीनकर, सुमित ईप्पलपेल्ली, भूपेंद्र चव्हाण,तसेच सौ पल्लवी बोगा, झिया तेजस कु. ओवी बोगा उपस्थित होते.

### अहिल्यानगर पोलिस दलाच्यावतीने शाळा, महाविद्यालयात संवाद मेळावा

**अहिल्यानगर :** पोलीस दल शहर उपविभागाच्यावतीने सुरक्षित विद्यार्थी आणि सुरक्षित कॅम्पस उद्दिष्ट साध्य करण्यासाठी उपविभागातील सर्व शाळा व महाविद्यालये यांच्या संवाद मेळाव्याचे आयोजन शनिवार सायंकाळी ५.०० वाजता पोलीस मुख्यालय मैदान येथे करण्यात आले. यावेळी शहर उपविभागाचे पोलीस उपअधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे यांनी दिली. या मेळाव्याअंतर्गत विद्यालयीन व महाविद्यालयीन विद्यार्थी व विद्यार्थिनींची सुरक्षा तसेच सुरक्षित शैक्षणिक वातावरण निर्माण करण्यासाठी आवश्यक उपाययोजनांबाबत जिल्हा पोलीस अधीक्षक मुम्मका सुदर्शन व अपर पोलिस अधीक्षक वैभव कलुबर्मे हे मार्गदर्शन करणार आहेत. या संवाद मेळाव्यास शाळा व महाविद्यालयांच्या प्रतिनिधींनी तसेच विद्यार्थी व शिक्षकांनी उपस्थित राहावे असे आवाहन शहर विभागाचे पोलीस उप अधीक्षक डॉ. दिलीप टिपरसे यांनी केले आहे.

### भांडण मिटवण्यास गेलेल्या चालकाला चौघांकडून मारहाण

**अहिल्यानगर :** मित्राच्या कौटुंबिक वादात मध्यस्थी करून भांडण मिटवण्याचा प्रयत्न करणाऱ्या एका चालकाला चौघांनी मिळून बेदम मारहाण केल्याची धक्कादायक घटना केडगाव येथील हॉटेल निशा पॅलेसजवळ घडली आहे. या मारहाणीत फिर्यादी तरुण गंभीर जखमी झाला असून, त्याच्यावर सिव्हील हॉस्पिटलमध्ये उपचार करण्यात आले आहेत. याप्रकरणी कोतवाली पोलीस ठाण्यात चौघांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, फिर्यादी निलेश ज्ञानदेव जाधव हे ड्रायव्हर म्हणून काम करतात. त्यांचे मित्र राम बिडवे यांच्या घरात काही दिवसांपूर्वी शेजाऱ्यांशी किरकोळ वाद झाला होता. निलेश जाधव यांनी मध्यस्थी करत हा वाद मिटवला होता. त्यानंतर आरोपींनी हा वाद कायमचा मिटवण्यासाठी निलेश जाधव यांना हॉटेल निशा पॅलेस येथे बोलावून घेतले. फिर्यादी निलेश जाधव तेथे गेले असता, आरोपी माऊली कोरडे याने 'तुला दुसऱ्याच्या भांडणात पडण्याचे काय कारण?' असे म्हणून शिवीगाळ सुरू केली. निलेश तेथून निघून जात असताना आरोपी माऊली कोरडे, अजित कोरडे आणि प्रल्हाद बिडवे यांनी त्यांना लाथाबुक्क्यांनी मारहाण करण्यास सुरुवात केली. तसेच आरोपी पांडुरंग लिपणे याने जमिनीवर पडलेल्या लाकडी काठीने निलेश यांच्या पाठीवर जबर वार केले. या मारहाणीदरम्यान माऊली कोरडे याने हातातील दगड निलेश यांच्या तोंडावर व ओठावर मारल्याने ते रक्तबंबाळ झाले. पोलिसांनी माऊली कोरडे, प्रल्हाद बिडवे, अजित कोरडे व पांडुरंग लिपणे यांच्याविरुद्ध गुन्हा नोंदवला. पोलीस पुढील तपास करत आहेत.

### ऑनलाइन गुंतवणुकीत लष्करी जवानाला लाखोंचा गंडा

**अहिल्यानगर :** नफ्याचे आमिष दाखवून एका व्यक्तीला व्यवसायात गुंतवणूक करण्यास प्रवृत्त करत तब्बल ५ लाख ९८ हजार ९९९ रुपयांची फसवणूक केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. या प्रकरणी अहिल्यानगर येथील सायबर पोलीस ठाण्यात तीन जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. मिळालेल्या माहितीनुसार, राजेश गुर्जर हे नगरच्या लष्करी मुख्यालयात कार्यरत आहेत. आरोपी विनीत व्ही. नवीन एस. आणि इलयाराजा ए. (सर्व रा.केरळ) यांनी संगनमत करून फिर्यादी राजेश गुर्जर यांना व्यवसायात गुंतवणूक केल्यास मोठा फायदा होईल असे खोटे आश्वासन दिले. त्यांच्या गोड बोलण्याला बळी पडून फिर्यादी यांनी नोव्हेंबर २०२५ मध्ये ५ लाख ९८ हजार ९९९ रुपये गुंतवले. मात्र, काही दिवस उलटूनही कोणताही नफा मिळाला नाही. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच फिर्यादी यांनी आरोपींकडे स्वतःचे पैसे परत मागितले. परंतु, आरोपींनी पैसे देण्यास साफ टाळाटाळ केली. याप्रकरणी फिर्यादी यांनी सुरुवातीला राजस्थान येथील पोलीस ठाण्यात तक्रार केली होती. तेथून शून्य क्रमांकाने सायबर पोलिस ठाण्यात गुन्हा नोंदवला. पो.नि. सागर ढिकले यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास सुरू आहे.

# महात्मा फुले चौकात स्व. अरुण काका जगताप यांच्या २० फुटी भव्य प्रतिमेचे अनावरण

## मित्रमंडळींकडून जुन्या आठवणींना उजाळा; काकांच्या कार्याचा गौरव



**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** महात्मा फुले चौक येथे जिल्ह्याचे ज्येष्ठ नेते, स्वर्गीय माजी आ. अरुण काका जगताप यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यासाठी अरुण काका जगताप ट्रस्ट मित्र मंडळाच्या वतीने त्यांच्या २० फुटी भव्य प्रतिमेचे अनावरण करण्यात आले. या सोहळ्यात काकांच्या कार्याचा गौरव करत मित्रमंडळींनी जुन्या आठवणींना उजाळा दिला.

यावेळी शहराचे आ. संग्राम जगताप, गुणे आयुर्वेद शिक्षण मंडळाचे अध्यक्ष सचिन जगताप, गणेश भोसले, राष्ट्रवादी काँग्रेस जिल्हाध्यक्ष संपत बारस्कर, भगवान फुलसौंदर, नगरसेवक विकी जगताप, प्रकाश भागानगरे, कुमारसिंह वाकळे, संजय चोपडा, सुंतीलाल कोठारी, राजेंद्र चोपडा, शिवाजी चव्हाण, प्रा. माणिकराव विधाते, बाळासाहेब पवार, नगरसेवक महेश तवले, बाबुशेठ नागरगोजे, अविनाश घुले, विपुलशेटीया, गोरख पडोळे, प्रकाश कराळे, जनक अहुजा, राजेश भंडारी, अजित जगताप, मंगेश खताळ, भाऊसाहेब पांडुळे, ज्ञानदेव पांडुळे, धर्मा कराडे, डॉ. विजयकुमार भंडारी, संतोष सूर्यवंशी, तुकाराम तावरे, वैभव जगताप, ज्ञानेश्वर रासकर, विशाल पवार, शिवाजी भंडारी, अनिल मुरकुटे, दत्ता पानसरे, विजय गव्हाळे, मोहित पंजाबी, नरेंद्र बाफना, भाऊ हुच्चे, कांता अष्टेकर, योगेश ठुबे, प्रा. अरविंद शिंदे, सत्यम गुंदेचा, मोहन कदम, शामराव भिंगारदिवे, लक्ष्मण पोकळे, राजेंद्र ओस्तवाल, सागर मुर्तडकर, अजिंक्य बोरकर मित्रपरिवार उपस्थित होता.

यावेळी मित्रमंडळींच्या वतीने मनोगत व्यक्त करताना सांगण्यात आले की, महात्मा फुले चौक आणि अरुण काका यांचे अतूट नाते होते. काकांना भेटण्यासाठी दररोज मोठ्या संख्येने नागरिक या ठिकाणी येत असत. त्यांच्या दृष्टीने गरीब-श्रीमंत, जात-पात असा कोणताही भेदभाव नव्हता. सर्व जातीधर्मातील लोकांना सोबत घेऊन त्यांनी जनतेचे प्रश्न सोडविण्याचे काम केले. नगर शहरावरील त्यांचे प्रेम कधीही कमी झाले नाही.

स्वतः व्यसनांपासून दूर राहून त्यांनी युवकांना व्यसनमुक्त जीवनाचा संदेश दिला. काका हे एक परीस होते, त्यांच्या सहवासात आलेल्या अनेकांचे जीवन सकारात्मक दिशेने बदलले. त्यांच्या विचारांमुळे आम्ही वाईट प्रवृत्तींपासून दूर राहिलो. कार्यकर्त्यांवर प्रेम करणारे आणि अडचणीच्या काळात धावून जाणारे नेतृत्व म्हणून त्यांची ओळख होती. आज ते आपल्यात नसले तरी त्यांचे विचार आणि कार्य आपल्यामध्ये जिवंत आहेत. ते समतावादी विचारांचे नेते होते. सर्व पक्षांतील नेत्यांशी त्यांचे स्नेहाचे संबंध होते. शहरात त्यांचा आदरयुक्त दरारा होता. त्यांनी माणसे पदाने नव्हे तर मनाने कमावली होती, अशा भावना यावेळी व्यक्त करण्यात आल्या.

यावेळी गणेश भोसले म्हणाले की, आ. संग्राम जगताप यांच्या माध्यमातून सारसनगर येथे उभारण्यात आलेल्या भव्य स्पोर्ट्स कॉम्प्लेक्सला स्वर्गीय माजी आ. अरुण काका जगताप यांचे नाव देण्याची मागणी करण्यात येणार आहे. या क्रीडा संकुलातून भविष्यात उत्कृष्ट खेळाडू घडतील. आंतरराष्ट्रीय दर्जाच्या सुविधा या ठिकाणी उपलब्ध करून देण्यात आल्या असून हे क्रीडा संकुल शहराच्या विकासात महत्त्वाची भूमिका बजावेल. यावेळी राजेंद्र चोपडा म्हणाले की, शहरातील आनंद ऋषी हॉस्पिटल उभारण्यात स्वर्गीय अरुण काका जगताप यांचे मोठे योगदान आहे. या प्रतिमेमुळे भावी पिढ्यांना त्यांच्या कार्याची आणि समाजसेवेची प्रेरणा मिळत राहील.

# बनावट बिलांद्वारे ४५ लाखांचा अपहार

## प्रशांत बल्लाळचा अटकपूर्व जामीन फेटाळला

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर : बनावट बिलांच्या आधारे तब्बल ४५ लाख रुपयांचा अपहार आणि आर्थिक फसवणूक केल्याच्या गंभीर आरोपाखालील मुख्य आरोपी प्रशांत राजाराम बल्लाळ याचा अटकपूर्व जामीन अर्ज जिल्हा व सत्र न्यायालयाने फेटाळून लावला आहे. १६ जून रोजी झालेल्या या निर्णयामुळे आरोपीच्या अटकेचा मार्ग मोकळा झाला असून प्रकरणातील तपासाला गती मिळण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.**

**बनावट कागदपत्रांच्या आधारे लाखो रुपयांची उकळपट्टी; आरोपीला दिलासा नाकारला**



तोफखाना पोलीस ठाण्यात दाखल गुन्हा क्रमांक २३९/२०२६ मध्ये आरोपी प्रशांत बल्लाळ व इतर तीन जणांविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या कलम ४२० आणि ३४ अन्वये गुन्हा नोंदविण्यात आला आहे. फिर्यादीच्या तक्रारीनुसार, मोठ्या प्रमाणात माल खरेदी-विक्रीच्या व्यवहारांमध्ये बनावट बिले आणि कागदपत्रांचा वापर करून ४५ लाख रुपयांची आर्थिक फसवणूक करण्यात आली. या प्रकरणात आरोपींनी संगनमताने फसवणुकीचा कट रचल्याचा आरोप आहे.

या गुन्ह्यातील इतर आरोपींचा शोध अद्याप सुरू असून, संपूर्ण कटाचा उलगडा करण्यासाठी आणि आर्थिक व्यवहारांची सखोल चौकशी करण्यासाठी मुख्य आरोपीची कोठडीत चौकशी आवश्यक असल्याचे तपास यंत्रणेकडून न्यायालयास सांगण्यात आले. अटकेच्या भीतीने प्रशांत बल्लाळ याने भारतीय नागरिक सुरक्षा संहिता (बीएनएसएस) २०२३ च्या कलम ४८२ अंतर्गत अटकपूर्व जामिनासाठी अर्ज दाखल केला होता.

या प्रकरणात सरकारच्या वतीने ड. मुसळे यांनी प्रभावी युक्तिवाद केला. फिर्यादी पक्षाच्या कायदेशीर सहाय्यासाठी ड. राजीव पाटील आणि ड. आशिष टाकळकर यांनी काम पाहिले. त्यांनी तपासादरम्यान पोलिसांना आवश्यक कायदेशीर मदत करून प्रकरणातील विविध बाबी न्यायालयासमोर मांडल्या.

सरकारी पक्षाने युक्तिवाद करताना आरोपीचा सुरुवातीपासूनच फसवणुकीचा हेतू असल्याचा दावा केला. बनावट बिले आणि कागदपत्रांच्या माध्यमातून मोठ्या रकमेची उकळपट्टी करण्यात आली असून, हा केवळ व्यावसायिक वाद नसून नियोजनपूर्वक करण्यात आलेला आर्थिक गुन्हा असल्याचे न्यायालयाच्या निदर्शनास आणून देण्यात आले.

दोन्ही पक्षांचा युक्तिवाद ऐकल्यानंतर जिल्हा व सत्र न्यायाधीश के. एस. कुलकर्णी यांनी प्रकरणातील तथ्ये, गुन्ह्याचे गांभीर्य आणि अपहाराची रक्कम लक्षात घेऊन आरोपीचा अटकपूर्व जामीन अर्ज नामंजूर केला. न्यायालयाने आपल्या आदेशात नमूद केले की, आरोपीने काही प्रमाणात माफी मागितली असली तरी त्यामुळे गुन्ह्याचे स्वरूप कमी होत नाही. बनावट कागदपत्रांच्या आधारे मोठी आर्थिक फसवणूक झाल्याचा प्रथमदर्शनी आरोप असून, या प्रकरणातील इतर आरोपींचा शोध घेणे आणि आर्थिक व्यवहारांचा तपास करणे अत्यावश्यक आहे.

बनावट कागदपत्रांच्या आधारे मोठी रक्कम उकळण्यात आल्याचा आरोप असून, गुन्ह्याचा तपास अद्याप अपूर्ण आहे. इतर आरोपींचा शोध घेणे बाकी असल्याने तपास यंत्रणेला आरोपीची सखोल चौकशी करण्याची आवश्यकता आहे, असे निरीक्षण न्यायालयाने नोंदवले. न्यायालयाच्या या निर्णयामुळे आरोपी प्रशांत बल्लाळ याचे धाबे दणाणले असून, त्याच्या अटकेची शक्यता वाढली आहे.



# शहराच्या मुख्य बाजारपेठेतील अतिक्रमणे हटवली

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**अहिल्यानगर :** महापालिकेच्या अतिक्रमण विरोधी विभागाने आज, शुक्रवारी कारवाई करीत बाजारपेठेतील गंजबाजार, मोची गल्ली, घासगल्ली याठिकाणची अतिक्रमणे हटविली. अचानकपणे केलेल्या या कारवाईमुळे अतिक्रमण धारकांची मोठी धावपळ उडाली. या कारवाईमुळे बाजारपेठेतील वाहतूक कोंडीचा प्रश्न काहीसा सुटण्यास मदत होणार आहे.

महापालिका अतिक्रमण विभागप्रमुख आदित्य बल्लाळ, अभियंता सुरेश इथापे यांच्या मार्गदर्शनाखाली अतिक्रमण विरोधी पथकातील कर्मचाऱ्यांनी ही कारवाई केली.

अचानक केलेल्या कारवाईमुळे विक्रेते, हातगाडीवाले यांची चांगलीच धांदल उडाली होती. या कारवाईत हातगाड्या काढण्यात आल्या आहेत. फळविक्रेत्यांचीही दुकाने हटविण्यात आली. या भागात वारंवार होणाऱ्या अतिक्रमणांमुळे वाहतूक कोंडी ही नित्याचीच बाब झाली आहे. शाळा नुकत्याच सुरू झाल्या आहेत. त्यामुळे शालेय विद्यार्थ्यांचे कपडे, शालेय साहित्य खरेदीसाठी बाजारपेठेत मोठी गर्दी होत आहे.

यामुळे कापडबाजार, गंजबाजारात मोठी वाहतूक कोंडी होत आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या अतिक्रमण विभागाने आज गंजबाजार, मोची गल्ली, घास गल्ली या भागात अतिक्रमण हटाव मोहिम राबविली. या कारवाईत रस्त्याच्या कडेला उभ्या केलेल्या हातगाड्या काढण्यात आल्या. त्यामुळे बाजारपेठेने काही प्रमाणात मोकळा श्वास घेतला.

# गुरु अर्जुन देवजींचे बलिदान दिनानिमित्त तारकपूरमध्ये अभिवादन

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** शीख धर्माचे पाचवे गुरु तथा मानवतेचे उपासक गुरु अर्जुन देवजी यांच्या शहिदी दिनानिमित्त तारकपूर परिसरात गुरु नानक देवजी (जीएनडी) ग्रुपच्या वतीने अभिवादन करण्यात आले. यानिमित्त नागरिकांसाठी लंगर तसेच थंडगार सरबताचे वाटप करण्यात आले. या उपक्रमाला नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. कार्यक्रमाचा शुभारंभ आ. संग्राम जगताप यांच्या हस्ते प्रसाद वाटप करून करण्यात आला.

शहिदी दिनानिमित्त आयोजित या कार्यक्रमात गुरु अर्जुन देवजी यांच्या कार्याचा आणि बलिदानाचा गौरवपूर्ण स्मरण करण्यात आले. शीख धर्मातील सेवा, समता, बंधुता आणि मानवतेचा संदेश समाजापर्यंत पोहोचविण्याचा प्रयत्न या उपक्रमातून करण्यात आला. यावेळी जनक आहुजा, नगरसेविका हरप्रीतकौर गंभीर, जीतू गंभीर, अजिंक्य बोरकर, जय भोसले, गजेंद्र भांडवलकर, मनीष खुराणा, अमन खुराणा, संजय आहुजा, करन आहुजा, बल्लू सचदेव, बबलू खोसला, किशोर कंत्रोड, गौरव कंत्रोड, गुनीत कंत्रोड, सागर कुमार, मनोज मनोचा, रोहित बत्रा, मॉन्टी तलवार, गिरीश खन्ना, विनीत कंत्रोड, गोलू गंभीर, खुश कंडुजा यांच्यासह अनेक मान्यवर व नागरिक उपस्थित होते.

## सैनिकांच्या कुटुंबांशी थेट संपर्क

# 'मिशन निरंतर मिलाप १.०'चा चौथा टप्पा सुरू

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** माजी सैनिक, वीरनारी तसेच शहीद जवानांच्या कुटुंबीयांच्या विविध समस्या आणि तक्रारींचे त्वरित निराकरण करण्याच्या उद्देशाने मेकॅनाइज्ड इन्फंट्री सेंटर अँड स्कूल, अहिल्यानगर यांच्या वतीने 'मिशन निरंतर मिलाप १.० - सेंट्रल ईस्ट झोन' या उपक्रमाच्या चौथ्या टप्प्याला प्रारंभ करण्यात आला. या मोहिमेच्या पथकाला १७ जून २०२६ रोजी मेजर जनरल आर. प्रेम राज (ड्च्, तड्च्), अतिरिक्त महासंचालक मेकॅनाइज्ड इन्फंट्री यांच्या हस्ते हिरवा कंदील दाखवून रवाना करण्यात आले.

लेफ्टनंट जनरल पी. एस. शेखावत चीफ ऑफ स्टाफ, मुख्यालय दक्षिण-पश्चिम कमांड व कर्नल ऑफ द रेजिमेंट यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे. माजी सैनिक, वीरनारी आणि त्यांच्या कुटुंबीयांशी थेट संपर्क साधून त्यांच्या दारापर्यंत पोहोचत विविध प्रश्नांचे निराकरण करणे हा या मोहिमेचा प्रमुख उद्देश आहे. मोहिमेच्या चौथ्या टप्प्यात दोन कनिष्ठ आयुक्त अधिकारी, चार बिगर आयुक्त अधिकारी तसेच मेकॅनाइज्ड इन्फंट्री रेजिमेंट आणि विविध बटालियनचे प्रतिनिधी सहभागी आहेत. हे पथक ओडिशा, पश्चिम बंगाल, बिहार, झारखंड आणि छत्तीसगड या राज्यांतील १६ जिल्ह्यांचा दौरा करून सुमारे ४,१२५ माजी सैनिक, वीरनारी आणि शहीद जवानांच्या कुटुंबीयांशी प्रत्यक्ष संवाद साधणार आहे. 'मिशन निरंतर मिलाप' हा केवळ प्रशासकीय उपक्रम नसून राष्ट्रसेवेसाठी आयुष्य अर्पण करणाऱ्या सैनिक आणि त्यांच्या कुटुंबीयांप्रती कृतज्ञता, संवेदनशीलता आणि बांधिलकी व्यक्त करणारा मानवी दृष्टिकोन आहे.

# ठाकरे शिवसेनेच्या गद्दार खासदारांनी आधी राजीनामे द्यावेत : काळे

## गाढवावरील प्रतिमांना जोडे मारत पायदळी तुडवले

**प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री**



**अहिल्यानगर :** शिवसेना या चार अक्षरांमुळे खासदारांना जनतेने पक्षप्रमुख उद्धव ठाकरे यांच्याकडे पाहत निवडून दिले. तुम्ही मात्र फितूर झालात. गद्दार निघालात. पन्नास खोके, सत्ता यापुढे तुम्ही जनता, शिवसेनेशी बेईमान झालात. हिम्मत असेल तर शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे खा. भाऊसाहेब वाकचौरे यांच्यासह सहाही खासदारांनी आधी आपल्या खासदारकीचा राजीनामा द्यावा. मग खुशाल ज्या पक्षात जाऊन शेण खायचे आहे ते खावं, असा संतप्त इशारा ठाकरे शिवसेनेचे महानगर प्रमुख किरण काळे यांनी दिला. हे 'ऑपरेशन टायगर' नसून 'ऑपरेशन गद्दार' आहे. फुटीर खासदार हे टायगर नाहीत. लबाड लांडगे आहेत, असा हल्लाबोल यावेळी काळेंनी केला.

यावेळी उपजिल्हाप्रमुख रावजी नांगरे, संजय झिंजे, दीपक भोसले, मनोज गुंदेचा, अनिस चुडीवाला, विलास उबाळे, प्रतीक बारसे, सुशांत म्हस्के, राम वाणी, राम झिने, चंद्रकांत उजागरे, उषा भगत, शारदा वाघमारे, मीना घाटगे, शैला लांडे, विकेश गुंदेचा, सागर चाबुकस्वार, सचिन नवघिरे, बाळासाहेब जरे, सुजय लांडे, ऋतुराज आमले, शंकर आव्हाड, गणेश आपरे, राम धोत्रे, आकाश अल्हाट, विकास भिंगारदिवे, विजय शिरसाट, स्वप्निल साठे, महावीर मुथा, किशोर कोतकर, आप्पा लांडगे, विनोद शिरसाट, जयराम आखाडे, धनंजय देशमुख आदींसह शिवसैनिक उपस्थित होते.

**फुटीर खासदारांवर राईट टू रिकॉल लागू करा :** पक्षाच्या चिन्हावर निवडून आलेले आणि पक्ष, जनतेशी बेईमानी करून फुटीर भूमिका घेणारे खासदार जनादेशाचा अपमान करीत आहेत. अशा लोकप्रतिनिधींना जनतेसमोर पुन्हा उत्तरदायी करण्यासाठी राईट टू रिकॉल कायदा देशात तातडीने लागू करण्याची गरज आहे. मतदारांचा विश्वासघात करणाऱ्यांना पाच वर्षे पूर्ण होण्या आधीच जनतेला परत बोलावण्याचा अधिकार मिळायला हवा, अशी भूमिका यावेळी किरण काळे यांनी मांडली.

**डीलिमिटेशन विधेयक मंजुरीचा घाट :** मागील संसदीय अधिवेशनामध्ये दोन तृतीयांश बहुमता अभावी डीलिमिटेशन विधेयक मंजुरी आणि त्या माध्यमातून देशाचे तुकडे पाडण्याचा सत्ताधाऱ्यांचा डाव फसला. सध्या देशावर ऊर्जा संकट आहे.

### जाहीर नोटीस

तमांम लोकांस या जाहीर नोटीसिद्वारे कळविण्यात येते की, खालील परिशिष्टामध्ये नमूद केलेली मिळकत हि विद्यमान योगिता रखमाजी खंडागळे रा. मिरी, ता. पाथर्डी, जि. अहिल्यानगर यांचे मालकी हक्क कब्जे वाहिवाटीची मिळकत आहे. वरील विद्यमान मालकांनी सदर मिळकत आमचे अशिलांस कायमखुष खरेदी हस्तांतर करून देण्याचे ठरविलेले असून त्या प्रमाणे व्यवहारही नक्की झालेला असून विसारपोटी अन्वये रक्कम स्वीकारलेली आहे. सदर मिळकत निर्वेध व निजोखमी, बिनबोजाची असल्याचा विश्वास व भरवसा विद्यमान मालकांनी आमच्या अशिलांना दिलेला आहे. यदाकदाचित सदर मिळकतीबाबत कोणाचीही, कोणतीही तक्रार अगर हरकत, गहान, दान, पोटगी, साठेखत, अव्वल जप्ती, मनाई हुकुम, करार, वहिवाट, बोजा, कर्ज अथवा इतर कोणताही हक्क, हितसंबंध अथवा अधिकार असल्यास हि नोटीस प्रसिध्द झाल्यापासून सात दिवसाच्या आत खालील दिलेल्या पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी समक्ष भेटून खात्री पटवून द्यावी अन्यथा आमचे अशील कायमखुश खरेदी करून सदर मिळकत हस्तांतर व्यवहार पूर्ण करतील मग कुणाचीही तक्रार चालणार नाही मुद्दामहून कोणाचीही फसवणूक होऊ नये म्हणून सदरची जाहीर नोटीस प्रसिद्धीस दिली आहे.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :-** १) जिल्हा अहिल्यानगर पोटतुकडी तालुका पाथर्डी पैकी मौजे मिरी येथील गट नं. ८१०/२ पैकी क्षेत्र ०२ हे ८३ आर संपूर्ण क्षेत्र हे विद्यमान मालक योगिता रखमाजी खंडागळे यांचे मालकीचे असून त्याचा आकार ३ रु.१५ पै. हि संपूर्ण मिळकत येणे प्रमाणे शेतजमीन मिळकत या मध्ये असलेले जल, तृण, काष्ट, पाषाण, निधी, निक्षेप व तदंगभूत वस्तुसाहित काहीएक राखून न ठेवीता जाण्यायेण्याच्या हक्कासाहित, पूर्वापार वाहिवाटीच्या हक्काने दरोबस्त.

तारीख :- २०/०६/२०२६
शेवगाव

शिक्का

**सही/-**
**ॲड. अजय अशोक मोहिते**
**दिवाणी व फौजदारी न्यायालय शेवगाव**
**मो.नं.९७३०१६६२९७, ७५१७५७६७५६**

प्रो.फी. जमा.रु.
पान.नं. दि. ०१/०१/२०२५

### सायटेशन नोटिस

**शेवगाव येथील तहसिलदार तथा तालुका कार्यकारी दंडाधिकारी शेवगाव यांचे कोर्टात**
चौ.अ.नं.०१/२०२५

अर्जदार
१. श्री. अहमद अब्दुल रहेमान सय्यद, रा. शेवगाव
सामनेवाला
सरकार

सदर अर्जदार हा मौजे शेवगाव येथील रहीवाशी आहे. सदर अर्जदार श्री. अहमद अब्दुल रहेमान सय्यद, रा. शेवगाव ता.शेवगाव जि.अहमदनगर यांची आत्या सुग्राबी दादाभाई शेख यांचा मृत्यू दि. ०४.०९.२०२१ मौजे शेवगाव ता. शेवगाव जि. अहमदनगर असा तहसिल कार्यालय शेवगाव अभिलेखपाल येथे जन्माचा दाखला मिळणे बाबत अर्जदार यांनी अर्ज केला असता अर्जदार यांना नोंदी आढळ होत नसल्याचे कळविण्यात आले आहे. जन्म मृत्यु नोंदणी रजिस्टरला नोंद करण्याचे राहुन गेलेले आहे. त्यामुळे अर्जदार यांची आत्याचा मृत्यु नोंदणी प्रमाणपत्र (जन्म दिनांक नोंदणी दाखला) मिळु शकत नाही. त्यामुळे सदर अर्जदार यांचे शासकीय योजने कामी तसेच वेगवेगळया ठिकाणी अडचणींना सामोरे जावे लागत आहे. अर्जदार यांच्या आत्याची जन्म नोंद पंचायत समिती कार्यालय, शेवगाव यांच्या जन्म मृत्यु नोंदणी रजिस्टरला नोंद घेवुन तसा दाखला मिळणे न्यायाचे व गरजेचे आहे. सदरचा दाखला हा शासकीय कामासाठी आवश्यक आहे. सदर अर्जदार याने पंचायत समिती कार्यालय शेवगाव येथे जावुन जन्म मृत्यु प्रमाणपत्राबाबत मागणी केली असता नोंद नसल्याने त्या कार्यालयात मृत्युची नोंद नसलेबाबत दि.१२.०१.२०२६ रोजीचा दाखला सदर अर्जदारास देण्यात आलेला जन्म / मृत्युच्या १ वर्षाच्या आत मध्ये जन्म-मृत्यु नोंदणी न झाल्यास केवळ तालुका दंडाधिकारी यांच्या आदेशानेच नोंद घेता येवु शकते. अशी माहिती अर्जदारास ग्रामपंचायत येथे देण्यात आली. अशा परिस्थीती मध्ये सदर अर्जदार आत्याचा मृत्यू नोंद जन्म-मृत्यु नोंदणी रजिस्टरला होणे न्यायाचे व जरुरीचे आहे त्याकरीता योग्य तो आदेश मिळणेसाठी प्रस्तुतचा अर्ज अर्जदाराने मे. कोर्टात दाखल केलेला आहे. त्यापेक्षा सदरहुन अर्जदाराचे सदरहु जन्म- मृत्यु नोंदीबाबत कोणास काही एक म्हणावयाचे असेल तर हया जाहीर नोटीसीच्या तारखेपासुन एक महिन्याचे आत दि. /०६/२०२६ पुर्वी त्याने हया कोर्टात हजर होवुन आपल्या हरकती कळवाव्यात. आणि हया लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहुन मुदतीत कोणी योग्य हरकत न दाखविल्या तर सदरहुन कोर्ट अर्जदार यांचे हक्काबदल लागलीच पुरावा घेऊन त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास जन्म - मृत्यु नोंद घेणेबाबत आदेश करतील. आज दि. /०६/ २०२६ रोजी माझ्या सही व शिक्यानिशी नोटीस दिले असे.

शिक्का

हुकमावरुन

**सही/-**
**तहसिलदार शेवगाव**
**तथा तालुका दंडाधिकारी, शेवगाव**

दखल

## छत्रपती शाहू महाराज यांच्या जयंतीनिमित्त सिंहगडावर स्वच्छता मोहिम

**पुणे** : छत्रपती शाहू महाराज यांच्या १५२ व्या जयंतीचे औचित्य साधून सारथी संस्थेच्यावतीने सिंहगड किल्ल्यावर स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. सारथीचे व्यवस्थापकीय संचालक महेश पाटील यांच्या संकल्पनेतून आयोजित या उपक्रमात सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठातील संशोधक विद्यार्थी तसेच सारथी पुणे विभागीय कार्यालयाचे उपव्यवस्थापकीय संचालक अनिल पवार व अधिकारी–कर्मचाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदविला. मोहिमेदरम्यान किल्ल्यावरील प्लास्टिक व इतर घनकचरा संकलित करून परिसर स्वच्छ करण्यात आला. ऐतिहासिक वारशाचे जतन, गड–किल्ल्यांचे संवर्धन आणि पर्यावरण संरक्षणाबाबत जनजागृती करण्याच्या उद्देशाने हा उपक्रम राबविण्यात आला. सामाजिक बांधिलकी जपत ऐतिहासिक व पर्यावरणीय संवर्धनासाठी योगदान देण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला. सहभागी विद्यार्थ्यांनी भविष्यातही अशा सामाजिक व पर्यावरणपूरक उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग घेण्याचा निर्धार व्यक्त केला, अशी माहिती सारथी विभागीय कार्यालयाच्यावतीने देण्यात आली आहे.



## लैंगिक अत्याचारप्रकरणी भोंदूबाबासह आठ जण अटकेत

**वाघोली, पुणे** : वाघोलीतील रेणुका पार्क, उबाळेनगर परिसरातील माऊली सदन आश्रमात एका महिलेवर लैंगिक अत्याचार केल्याप्रकरणी खराडी पोलिसांनी भोंदूबाबासह आठ जणांना अटक केली आहे. अंधश्रद्धेच्या नावाखाली सुरू असलेल्या कथित साम्राज्याचा पर्दाफाश करत पोलिसांनी महाराष्ट्र नरबळी व अघोरी प्रथा प्रतिबंधक कायद्यासह भारतीय न्याय संहितेच्या विविध गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे. अटक करण्यात आलेल्यांमध्ये पाच महिलांचाही समावेश आहे. या कारवाईनंतर भोंदूबाबाचे अनेक धक्कादायक प्रकार समोर येत आहेत. अटक करण्यात आलेल्यांमध्ये राधामोहन मिश्रा (वय ५९), स्वामी कमल नयन (वय ५८), कीर्ती हंसराज आहुजा (वय ३८), कनिका हंसराज आहुजा (वय ३४), खुशबू गजेंदर हुडिया (वय ३७), श्वेता अवधबिहारी मिश्रा (वय ३७), अमृता अवधबिहारी मिश्रा (वय ३२) आणि श्वेता संजय पांडे (वय २८, सर्व रा. माऊली सदन, रेणुका पार्क, उबाळेनगर) यांचा समावेश आहे. खराडी पोलीस ठाण्यात दाखल गुन्ह्यानुसार, राधामोहन मिश्रा याने सन २००१ ते २०२६ या कालावधीत स्वतःला दैवी शक्ती प्राप्त असल्याचे भासवून फिर्यादी महिला व तिच्या कुटुंबीयांचा विश्वास संपादन केला. श्रद्धेचा गैरफायदा घेत त्याने संबंधितांना मानसिकदृष्ट्या गुलाम बनवले. तसेच मारहाण, शिवीगाळ, धमक्या आणि अमानुष वागणूक देत महिलेवर वेळोवेळी लैंगिक अत्याचार केल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. या गुन्ह्यात मिश्रा याच्यासह त्याचे सात सहकारी सहभागी असल्याचेही तपासात समोर आले आहे. पोलिसांनी माऊली सदन येथे छापा टाकून मोठा मुद्देमाल जप्त केला. यामध्ये ८ लॅपटॉप, ९ मोबाईल फोन, १९ हार्डडिस्क, २० कॅसेट्स, १० डीव्हीडी, डीव्हीआर मशीन, सीपीयू, २३ पेनड्राईव्ह, ६ लाख ६० हजार रुपयांची रोख रक्कम तसेच सोने–चांदीचे दागिने असा एकूण २५ लाख ७७ हजार २४० रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला आहे. या प्रकरणी महाराष्ट्र नरबळी व अघोरी प्रथा प्रतिबंधक कायदा तसेच भारतीय न्याय संहितेतील विविध गंभीर कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास खराडी पोलीस करत आहेत. पोलिसांच्या या कारवाईमुळे अंधश्रद्धेच्या आडून सुरू असलेल्या कथित गैरप्रकारांवर मोठा आघात झाल्याची चर्चा परिसरात सुरू आहे.

## ग्राहकांच्या तक्रारींमध्ये स्मार्ट मीटरमुळे मोठी घट

**पुणे** : राज्यात महावितरणतर्फे आतापर्यंत १ कोटी २० लाख स्मार्ट मीटर बसविण्यात आले आहेत. स्मार्ट मीटरमुळे अचूक रिडिंग होते. राज्यात स्मार्ट मीटरचे प्रमाण वाढल्यानंतर ग्राहकांच्या वीजबिलाच्या तक्रारी खूप कमी झाल्या आहेत. स्मार्ट मीटर बसविल्यानंतर संबंधित ग्राहकाला मोबाईल ॲपद्वारे दर तासाला त्याचा वीज वापर मोबाईल फोनवर समजतो. त्यामुळे वीजबिलाबाबत पारदर्शिता राहते. स्मार्ट मीटरमुळे मिळणाऱ्या माहितीच्या आधारे ग्राहकाला त्याच्या वीजवापरावर व वीजबिलावर नियंत्रण ठेवणे शक्य होते. स्मार्ट मीटरच्या ॲपद्वारे ग्राहकाला त्या घरात अथवा कार्यालयात अर्थिंगची समस्या अथवा वीजगळती होत असल्यास समजते. त्या माहितीचाही ग्राहकाला लाभ होतो. ग्राहकाने कोणत्या वेळेला किती वीज वापरली हे स्मार्ट मीटरमुळे समजते. त्या आधारे घरगुती वीज ग्राहकांना सकाळी ९ ते सायंकाळी ५ या वेळेत वापरलेल्या विजेसाठी प्रती युनिट ८५ पैसे सवलत मिळते. याशिवाय मोबाईल ॲपद्वारे बिल भरल्यास डिजिटल पेमेंटची सवलत आणि गो ग्रीनची दरमहा दहा रुपये सवलत मिळते.

# पुरंदर विमानतळ प्रकल्पग्रस्तांसाठी महसुली प्रकरणांचा जागेवर निपटारा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** : प्रस्तावित छत्रपती संभाजी राजे आंतरराष्ट्रीय विमानतळ (पुरंदर) प्रकल्पाच्या अनुषंगाने प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या महसुली, न्यायिक आणि अर्धन्यायिक स्वरूपाच्या प्रलंबित अडचणी सोडविण्यासाठी २२ जून रोजी सकाळी ११ वाजता सासवड प्रांत कार्यालयात जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांच्या अध्यक्षतेखाली विशेष कॅम्प आयोजित करण्यात आला आहे.

या कॅम्पमध्ये प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या विविध प्रलंबित प्रकरणांचा आढावा घेऊन जागेवरच निपटारा करण्याचा प्रयत्न करण्यात येणार आहे. आतापर्यंत सुमारे ७५ टक्के शेतकऱ्यांनी प्रतिज्ञापत्रे (ॲफिडेव्हिट) सादर केली असून जवळपास एक हजार कोटी रुपयांच्या मोबदल्याचे वाटप करण्यात आले आहे. उर्वरित पात्र शेतकऱ्यांपर्यंत मोबदल्याची रक्कम तातडीने पोहोचावी, यासाठी प्रशासनाने विशेष मोहीम हाती घेतली आहे.

जिल्हाधिकारी श्री. डुडी यांनी सांगितले की, अनेक प्रकरणांमध्ये वारस नोंदी, फेरफार मंजुरी, सातबारा उताऱ्यातील त्रुटी, नाव दुरुस्ती, हक्कसोडपत्र, संयुक्त मालकीचे प्रश्न, मयत खातेदारांच्या नोंदी, मालकी हक्क पडताळणी, मूल्यांकनावरील हरकती, न्यायालयीन दावे तसेच विविध अर्धन्यायिक प्रकरणांमुळे मोबदला वितरणात अडथळे निर्माण होत आहेत.

या सर्व प्रकरणांचा निपटारा करण्यासाठी महसूल, भूमी अभिलेख, प्रांत कार्यालय, तहसील कार्यालय आणि इतर संबंधित विभागांचे अधिकारी कॅम्पमध्ये उपस्थित राहणार आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांना विविध कार्यालयांचे फेरे मारण्याची आवश्यकता राहणार नाही.

''अनेक शेतकऱ्यांच्या अडचणी या महसुली किंवा कागदोपत्री स्वरूपाच्या आहेत. त्या वेळेत दूर झाल्यास मोबदला वितरणाची प्रक्रिया तातडीने पूर्ण होऊ शकते. मात्र प्रकरणे न्यायालयात गेल्यास संबंधित रक्कम दीर्घकाळ प्रलंबित राहण्याची शक्यता असते. त्यामुळे शेतकऱ्यांनी आपल्या अडचणी प्रशासनासमोर मांडून विशेष कॅम्पचा लाभ घ्यावा,'' असे जिल्हाधिकारी डुडी यांनी सांगितले.

ते पुढे म्हणाले की, न्यायिक आणि अर्धन्यायिक प्रकरणांमध्ये अनेक स्तरांवरील प्रक्रिया पूर्ण कराव्या लागतात. परिणामी अशा प्रकरणांचा अंतिम निपटारा होईपर्यंत संबंधित लाभार्थ्यांना मोबदला मिळण्यास विलंब होऊ शकतो. शेतकऱ्यांचे आर्थिक नुकसान टाळण्यासाठी आणि त्यांना वेळेत लाभ मिळावा यासाठी प्रशासनाने हा विशेष उपक्रम राबविला आहे.

या विशेष कॅम्पमध्ये जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी स्वतः उपस्थित राहून प्रकरणांचा आढावा घेणार असून आवश्यक त्या प्रकरणांमध्ये तातडीने निर्णय घेण्यासाठी संबंधित अधिकाऱ्यांना निर्देश देणार आहेत. प्रकल्पग्रस्तांनी सातबारा उतारा, आठ–अ, आधार कार्ड, पॅन कार्ड, वारस नोंदी, हक्कसोडपत्र, फेरफार अर्ज, न्यायालयीन कागदपत्रे तसेच इतर आवश्यक दस्तऐवजांसह उपस्थित राहावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांच्या सर्व प्रलंबित समस्या शक्य तितक्या वेगाने निकाली काढून त्यांना त्यांच्या हक्काचा मोबदला मिळवून देण्यासाठी प्रशासन कटिबद्ध असल्याचे जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी स्पष्ट केले.

## करंजे ग्रामपंचायत उपसरपंचपदी महेश पाटोळे यांची निवड

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**सोमेश्वरनगर** - बारामती तालुक्यातील ग्रामपंचायत करंजे उपसरपंच पदाची निवडणूक प्रक्रिया गुरुवार दि १८ जून रोजी ग्रामपंचायत कार्यालय लोकनियुक्त सरपंच भाऊसो हुंबरे यांचे अध्यक्षतेखाली निवडणूक पार पडली लोक अधिकारी म्हणून ग्राम विकास अधिकारी चंद्रकांत काळभोर होते. मावळते उपसरपंच खुर्शिदा मुलानी यांनी राजीनामा दिल्याने पुढील उपसरपंच पदासाठी इच्छुक उमेदवारी असलेल्या सदस्यांनी अर्ज दाखल केल्याने ही निवडणूक लागली. महेश पाटोळे यांना ६ मते मिळाली.त्यांचे प्रतिस्पर्धी अशोक होळकर यांना ३ मते व एक सदस्य अनुपस्थित राहिल्यामूळे महेश पाटोळे ६/३ मतानी विजयी झाले. यात्रसंगी करंजे माजी उपसरपंच जेष्ठ मार्गदर्शक बुवासाहेब हुंबरे, , निरा कृषि उत्पन्न बाजार समिती उपसभापती बाळासाहेब शिंदे,करंजे माजी तंटामुक्ती अध्यक्ष प्रताप गायकवाड,पोलीस पाटील प्रवीण शिंदे,नंदू मोकाशी,माऊली केंजळे, सतीश पवार, राकेश गायकवाड सह ग्रामपंचायत सर्व सदस्य कर्मचारी वृंद व इतर मान्यवर ग्रामस्थ मोठया संख्येने उपस्थित होते.



> गावचा आशीर्वाद आणि पाठबळ आणि विश्वास असले की अशक्य गोष्टी शक्य होता.याचेच फळ मला उपसरपंच पदी निवड करून दिली मी पुढील काळात सर्वांना एकत्र घेत चांगलेच काम करणार असल्याचे पाटोळे यांनी सांगितले.
> नवनिर्वाचित उपसरपंच महेश पाटोळे

# प्रतिकूल परिस्थितीवर मात करत प्रतीक्षा कुरकुटे यशस्वी सीए

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी खुर्द (मापरवाडी)** : राहाता तालुक्यातील लोणी खुर्द (मापरवाडी) येथील कु. प्रतीक्षा उत्तम कुरकुटे यांनी अत्यंत प्रतिकूल परिस्थितीवर मात करत देशातील अत्यंत प्रतिष्ठेची मानली जाणारी चार्टर्ड अकाउंटंट (सीए) परीक्षा उत्तीर्ण करून गावाचे नाव उज्ज्वल केले आहे. त्यांच्या या उल्लेखनीय यशामुळे परिसरात आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून विविध स्तरांतून त्यांच्यावर शुभेच्छांचा वर्षाव होत आहे.



शेतकरी कुटुंबातील प्रतीक्षा यांनी शिक्षण घेत असताना घरातील जबाबदाऱ्या सांभाळण्याबरोबरच शेती आणि पूरक व्यवसायातही सक्रिय सहभाग घेतला. विविध जबाबदाऱ्यांमध्ये समतोल साधत त्यांनी अथक परिश्रम, जिद्द आणि चिकाटीच्या बळावर हे यश संपादन केले. विशेष म्हणजे, आई–वडील शेतकरी असून सीए अभ्यासक्रमाबाबत विशेष माहिती नसतानाही त्यांनी स्वतःच्या मेहनतीच्या जोरावर हा खडतर प्रवास यशस्वीपणे पूर्ण केला.

या यशामागे एकनाथ कुरकुटे यांचे मोलाचे सहकार्य लाभले. प्रत्येक टप्प्यावर त्यांनी प्रतीक्षा यांना प्रोत्साहन, मार्गदर्शन आणि भक्कम पाठबळ दिले. तसेच त्यांना दोन बहिणी असून त्या देखील शिक्षण क्षेत्रात उल्लेखनीय प्रगती करत आहेत. त्यामुळे कुरकुटे कुटुंबाची शिक्षणाबाबतची समृद्ध परंपरा अधोरेखित होत आहे.

प्रतिकूल परिस्थितीतही खचून न जाता सातत्यपूर्ण अभ्यास आणि कठोर परिश्रमाच्या जोरावर मिळविलेल्या या यशामुळे परिसरात त्यांचे सर्वत्र कौतुक होत आहे. त्यांच्या या यशातून ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांना नवी प्रेरणा मिळणार आहे.

यशानिमित्त पुणे येथील शिक्षण क्षेत्रातील व्यक्तिमत्त्व भाऊसाहेब कुरकुटे यांनी सहकुटुंब कु. प्रतीक्षा यांची भेट घेऊन त्यांचे अभिनंदन केले. यावेळी त्यांनी प्रतीक्षा यांच्या जिद्दीचे, चिकाटीचे आणि परिश्रमाचे विशेष कौतुक करत त्यांचे यश ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांसाठी प्रेरणादायी असल्याचे सांगितले.

कु. प्रतीक्षा उत्तम कुरकुटे यांच्या या यशामुळे लोणी खुर्द (मापरवाडी) परिसरात अभिमानाचे वातावरण निर्माण झाले आहे. ''जिद्द, मेहनत आणि चिकाटी असेल तर कोणतीही परिस्थिती यशाच्या आड येऊ शकत नाही,'' हे त्यांनी आपल्या यशातून सिद्ध करून दाखविले आहे.

# लोणी–धामणी परिसरात चारा डेपो सुरू करा

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**लोणी धामणी** : आंबेगाव तालुक्याच्या पूर्व भागातील लोणी, धामणी, पहाडदरा, शिरदाळे, वडगावपीर आणि मांदळेवाडी परिसरात यंदा अत्यल्प पाऊस झाला आहे त्यातच वाढते तापमान आणि पाण्याच्या तीव्र टंचाईमुळे दुष्काळसदृश्य परिस्थिती निर्माण झाली आहे.

परिणामी जनावरांच्या चाऱ्याचा गंभीर प्रश्न निर्माण झाल्याने प्रशासनाने तातडीने चारा डेपो सुरू करावेत, अशी मागणी धामणीचे सरपंच प्रतीक्षा जाधव, पहाडदरा सरपंच मच्छिंद्र वाघ, शिरदाळे माजी उपसरपंच मयुर सरडे, वडगावपीर माजी सरपंच संजय पोखरकर मांदळेवाडी उपसरपंच रवींद्र ढगे पाटील लोणीचे सामाजिक कार्यकर्ते बाळशिराम वाळुंज यांनी केली आहे.

या परिसरात जून महिन्याचा अर्धा कालावधी उलटूनही मान्सूनचे आगमन झालेले नाही. तलाव, नाले, विहिरी तसेच बोअरवेल कोरड्या पडल्याने पिण्याच्या पाण्यासह जनावरांच्या चाऱ्याचाही मोठी समस्या निर्माण झाली आहे. बागायती क्षेत्रातही हिरव्या चाऱ्याची तीव्र टंचाई जाणवत असून पशुपालक हवालदिल झाले आहेत.

लोणी–धामणी परिसरात दुग्ध व्यवसाय मोठ्या प्रमाणावर केला जातो. हजारो कुटुंबांचा उदरनिर्वाह दूध व्यवसायावर अवलंबून आहे. मात्र चारा आणि पाण्याअभावी जनावरांचे संगोपन करणे कठीण झाले असून दूध उत्पादनावरही परिणाम होण्याची भीती व्यक्त केली जात आहे. जनावरे जगली तरच शेतकरी टिकेल आणि शेतकरी टिकला तरच ग्रामीण अर्थव्यवस्था सक्षम राहील, अशी भावना शेतकऱ्यांनी व्यक्त केली आहे.

सध्याची गंभीर परिस्थिती लक्षात घेता प्रशासनाने लोणी, धामणी, पहाडदरा, शिरदाळे, वडगावपीर आणि मांदळेवाडी येथे तातडीने चारा डेपो सुरू करून पशुपालकांना दिलासा द्यावा, अशी मागणी शेतकरी वर्गातून होत आहे. तसेच या भागाची पाहणी करून दुष्काळसदृश्य परिस्थिती जाहीर करण्याचीही मागणी पुढे येत आहे.

# मुख्याधिकारी फराटेंची निष्पक्ष चौकशी पूर्ण होईपर्यंत कार्यभारापासून दूर ठेवा : शालीनीताई सुखदान

**नेवासा** : नेवासा नगरपंचायतीचे मुख्याधिकारी निखिल फराटे यांच्याविरुद्ध प्राप्त गंभीर तक्रारींची निष्पक्ष चौकशी पूर्ण होईपर्यंत त्यांना नेवासा नगरपंचायतीच्या कार्यभारापासून दूर ठेवावे अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन करण्याचा इशारा नेवासा नगरपंचायतच्या उपनगराध्यक्षा शालिनीताई संजय सुखदान यांनी अहिल्यानगर जिल्हयाचे जिल्हाधिकारी यांना पाठविलेल्या निवेदनात दिला आहे.

सदर निवेदनात उपनगराध्यक्षा सौ.शालिनीताई सुखदान यांनी म्हटले आहे की नेवासा नगरपंचायतीचे मुख्याधिकारी निखिल फराटे यांच्या कार्यकाळातील विविध आर्थिक व प्रशासकीय अनियमितता, शासकीय अभिलेखांतील कथित फेरफार व इतर गंभीर बाबींच्या संदर्भात जिल्हाधिकारी, सह आयुक्त नगरपालिका प्रशासन, विभागीय आयुक्त, नगर विकास विभाग, लाचलुचपत प्रतिबंधक विभाग व इतर सक्षम प्राधिकरणांकडे वेळोवेळी लेखी तक्रारी सादर करण्यात आलेल्या आहेत व त्यांचा सातत्याने पाठपुरावा करण्यात आलेला आहे.



मात्र संबंधित तक्रारींची सखोल व निष्पक्ष चौकशी पूर्ण होण्यापूर्वीच मुख्याधिकारी निखिल फराटे हे पुन्हा नेवासा नगरपंचायतीत हजर होणार असल्याची माहिती मिळत आहे. त्यामुळे नगरपंचायतीमधील अभिलेख, कागदपत्रे व पुराव्यांमध्ये हस्तक्षेप अथवा फेरफार होण्याची शक्यता नाकारता येत नाही. नखिल फराटे यांच्याविरुद्ध प्राप्त तक्रारींची उच्चस्तरीय व निष्पक्ष चौकशी करण्यात यावी, चौकशी पूर्ण होईपर्यंत त्यांना नेवासा नगरपंचायतीच्या कार्यभारापासून सक्तीने दूर ठेवण्यात यावे, नगरपंचायती तील सर्व अभिलेख, दस्तऐवज व नोंदी सुरक्षित ठेवून त्यांचे संरक्षण करण्यात यावे,तक्रारींची तातडीने दखल घेऊन चौकशीस गती देण्यात यावी. जर निखिल फराटे हे नेवासा नगरपंचायतीत हजर झाले तर मी उपनगराध्यक्षा म्हणून व आमच्या गटातील अकरा नगरसेवकांसह संविधानिक व लोकशाही मार्गाने काळे झेंडे दाखवून शांततामय निषेध व्यक्त करणार आहोत. त्यानंतरही प्रशासनाने या गंभीर बाबीची दखल घेतली नाही तर आम्ही नेवासा नगरपंचायत कार्यालयाच्या समोर बेमुदत उपोषणास बसण्यास बाध्य राहू याची प्रशासनाने गंभीर दखल घ्यावी असा इशारा दिला आहे. याबाबत मुख्याधिकारी निखिल फराटे यांच्या बाबत प्रशासन काय भूमिका घेते याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे

## मोबाईलच्या अतिवापरामुळे मुलांमधील संयम कमी होतोय : आनंद भंडारी

**झरेकाठी** : ''आजकाल मोबाईलच्या अतिवापरामुळे माणसाचा मोकळा वेळ पूर्णपणे हिरावून घेतला गेला आहे. माणूस अगदी दोन मिनिटेही रिकामा बसू शकत नाही, तो लगेच मोबाईलमध्ये व्यस्त होतो. या सवयीचे सर्वात वाईट परिणाम लहान मुलांवर होत असून, त्यांच्यातील संयम (पेशन्स) कमी होत चालला आहे,'' अशी चिंता अहिल्यानगर जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी यांनी व्यक्त केली. आश्वी खुर्द (ता. संगमनेर) ग्रामपंचायत कार्यालयाला दिलेल्या सदिच्छा भेटीदरम्यान ते उपस्थितांना मार्गदर्शन करत होते. यावेळी त्यांनी बालविकासासाठी वाचन संस्कृतीचे महत्त्व अधोरेखित केले. वाचनामुळे होईल मुलांचा सर्वांगीण विकास मुख्य कार्यकारी अधिकारी भंडारी पुढे म्हणाले की, ''आजकाल मुले ऐकत नाहीत, अशी पालकांची तक्रार असते. यावर उपाय म्हणून मुलांना वाचन, मैदानी खेळ आणि विविध कलांकडे वळवणे गरजेचे आहे. मराठी साहित्यात खूप मोठे आणि दर्जेदार लेखक व कवी आहेत. मुलांनी या साहित्याचे वाचन केल्यास त्यांच्या विचारांना योग्य दिशा मिळेल.'' ग्रामपंचायतीने 'वाचन कट्टा' सुरू करावा मुलांमध्ये वाचनाची गोडी निर्माण करण्यासाठी आश्वी खुर्द ग्रामपंचायत आणि ग्रामस्थांनी पुढाकार घेऊन शाळेमध्ये एक सुंदर वाचनालय किंवा 'वाचन कट्टा' सुरू करावा, अशी सूचना त्यांनी केली. पालकांनी मुलांना केवळ पुस्तके आणून न देता, आठवड्यातून किमान दोन दिवस एक–एक तास त्यांच्याकडून वाचन करून घ्यावे .आणि वाचलेल्या पुस्तकाचा सारांश लिहिण्याची सवय लावावी, असेही त्यांनी आवर्जून सांगितले.

## वैद्यकीय कर्मचाऱ्यांनी वेळेत उपस्थित राहावे - प्रवीण जगदाळे

## भुतोंडेत जगदाळे यांचे उपस्थितीत जन आरोग्य समितीची सभा संपन्न

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**भोर** : ग्रामीण भागातील रुग्णांना शासकीय आरोग्य सुविधा मोफत आणि दर्जेदार मिळाव्यात यासाठी पुणे जिल्हा परिषद सदस्य प्रवीण जगदाळे सरसावले असून प्राथमिक आरोग्य केंद्र भूतोंडे (ता. भोर) येथे पहिली जन आरोग्य समिती सभा संपन्न झाली असून जगदाळे यांनी वैद्यकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांना आरोग्य केंद्रावर वेळेत उपस्थित राहण्याच्या सूचना दिल्या आहेत. यावेळी जगदाळे यांनी आरोग्य केंद्राची पाहणी करत आरोग्य केंद्रामार्फत दिल्या जाणाऱ्या आरोग्य सेवेचा आढावा घेतला.तसेच आरोग्य केंद्राची स्वछता, सुविधा व सेवा या बाबत मार्गदर्शन केले.यावेळी तालुका आरोग्य अधिकारी अभय तिडके, वैद्यकीय अधिकारी प्राथमिक आरोग्य केंद्र भूतोंडे डॉ. अमोल कानोडजे, आरोग्य सेवक अमोल साळुंखे,आरोग्य सहायिका सोनाली कारकूड, आरोग्य सेविका कांचन पवार, आशा सेविका आणि आरोग्य कर्मचारी उपस्थित होते.

**महत्वपूर्ण आरोग्य उपक्रम :**

ग्रामीण भागातील नागरिकांना उत्तम आरोग्य सुविधा मिळाव्यात या उद्देशाने आरोग्य विभाग पंचायत समिती, भोर यांच्या माध्यमातून माझे गाव आरोग्य संपन्न गाव या उपक्रमाअंतर्गत डॉक्टर आपल्या दारी हा महत्वपूर्ण आरोग्य उपक्रम राबविण्यात येत आहे. शिबिराच्या माध्यमातून विविध गावांमध्ये डॉक्टर व आरोग्य कर्मचारी भेट देऊन नागरिकांची आरोग्य तपासणी, आवश्यक मार्गदर्शन व आरोग्य विषयक सेवा उपलब्ध करून देणार आहेत.

> ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या गावातच आरोग्य सुविधा मिळाव्यात, हा या उपक्रमाचा मुख्य उद्देश आहे.सर्व नागरिकांनी या आरोग्य शिबिराचा लाभ घ्यावा.
> **` प्रवीण बाळासाहेब जगदाळे**
> **सदस्य, जिल्हा परिषद पुणे**
> **सदस्य, आरोग्य समिती जिल्हा परिषद पुणे**



# पाणीसाठ्याचे काटेकोरपणे व्यवस्थापन करण्याचे जिल्हाधिकारी यांचे निर्देश

**प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री**

**पुणे** : पुणे शहरासाठी महत्त्वाच्या खडकवासला, पानशेत, वरसगाव, टेमघर धरण समूहात उपलब्ध ४.१३ टीएमसी आणि पवना धरणातील १.६५ टीएमसी पाणीसाठ्याचे अत्यंत काटेकोरपणे व्यवस्थापन करावे, कोणत्याही परिस्थितीत पुणे जिल्ह्यात पिण्याच्या पाण्याची टंचाई निर्माण होणार नाही, यासाठी सर्व विभागांनी समन्वयाने आवश्यक उपाययोजनांची तातडीने अंमलबजावणी करावी, असे निर्देश जिल्हाधिकारी जितेंद्र डुडी यांनी दिले.

पर्जन्यमान विश्लेषण, धरणातील पाणीसाठ्याचा आणि पाणीवापराचा जिल्हाधिकारी तथा जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरणाचे अध्यक्ष श्री. डुडी यांनी जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित बैठकीत आढावा घेतला, त्यावेळी ते बोलत होते. यावेळी पुणे पाटबंधारे मंडळाचे अधीक्षक अभियंता प्रवीण कोल्हे, पाटबंधारे विभागाचे अधीक्षक अभियंता पृथ्वीराज फाळके, उपजिल्हाधिकारी चारुशीला मोहिते, कार्यकारी अभियंता राजेंद्र डुबल, किरण देशमुख यांच्यासह इतर विभागाचे वरिष्ठ अधिकारी उपस्थित होते. जिल्हाधिकारी म्हणाले, खडकवासला, पानशेत, वरसगाव, टेमघर धरण समूहाची जिवंत साठा क्षमता २९.१५ टीएमसी असून ४.१३ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध आहे. तसेच पवना धरणामध्ये १.६५ टीएमसी पाणीसाठा उपलब्ध आहे. पुणे व पिंपरी–चिंचवड महानगर क्षेत्राच्या दिनांक ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंतच्या अंदाजित अनुक्रमे ४ व १.५ टीएमसी पिण्याच्या पाण्याच्या गरजेनुसार योग्य नियोजन करावे, असे ते म्हणाले. पुणे व पिंपरी चिंचवड महानगरपालिका, नगरपरिषदा, ग्रामपंचायती, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ व अन्य पाणी वापर वापरकर्त्यां संस्थांनी उपलब्ध साठा व आगामी गरजा लक्षात घेऊन पाणी वापराचे पुनर्नियोजन करावे. धरणे, कालवे, नद्या व इतर जलस्रोतांमधील अनधिकृत व बेकायदेशीर पाणी उपसा रोखण्यासाठी महसूल, पोलीस व जलसंपदा विभागाच्या संयुक्त पथकांमार्फत विशेष तपासणी मोहीम राबवावी. सर्व संबंधित विभागांनी जलसाठा, पर्जन्यमान, आवक व पाणी वापराचा साप्ताहिक आढावा घेऊन त्याचा अहवाल जिल्हा प्रशासनास सादर करावा, असे श्री. डुडी यांनी सांगितले. ते म्हणाले, परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेता जलसंपदा विभागाने जलाशय प्रचलन– संवर्धन (कंझर्वेशन रिझर्व्हायर ऑपरेशन) धोरण अवलंबून जलाशय संचालन करावे व आवश्यकतेनुसार पुढील प्रतिबंधात्मक उपाययोजना कराव्यात. येत्या कालावधीमध्ये धरणामध्ये पावसाचा येवा आल्यानंतर विसर्ग सुरू करण्यापूर्वी जिल्हा प्रशासनास अवगत करण्यात यावे. शासनाच्या निर्देशानुसार ३१ ऑगस्ट २०२६ पर्यंत पिण्याच्या पाण्याची उपलब्धता सुनिश्चित करणे, पिण्याच्या पाण्यासाठी राखीव ठेवलेला साठा संरक्षित ठेवणे, बेकायदेशीर पाणी उपसा रोखणे व नियमित आढावा घेणे, पुणे जिल्ह्यातील सर्व जलस्रोतांमधील उपलब्ध पाणीसाठ्याचा काटकसरीने वापर करणे, पिण्याच्या पाण्यास सर्वोच्च प्राधान्य देणे आणि राखीव साठा सुरक्षित ठेवणे याबाबत बैठकीत आढावा घेण्यात आला. अनधिकृत मोटारी, पाईपलाईन, पंप व इतर साधनांवर आपत्ती व्यवस्थापन कायद्याच्या तरतुदीनुसार कठोर कारवाई करण्याबाबत महसूल यंत्रणेला सूचना बैठकीत देण्यात आल्या. पुणे विभागात आजचा उपयुक्त जलसाठा ७७ टीएमसी (१४.३०टक्के) असून गतवर्षीच्या १६९.९ टीएमसी (३१.१६ टक्के) च्या तुलनेत सुमारे ९०.९ टीएमसी इतकी तूट आहे, असल्याचे श्री. कोल्हे यांनी सांगितले. प्रारंभी श्री. कोल्हे यांनी भारतीय हवामान विभागाने व्यक्त केलेल्या एल–निनोच्या संभाव्य प्रभावाचा, पुणे विभागातील जलसाठ्याची सद्यस्थिती, गतवर्षीच्या तुलनेतील लक्षणीय तूट, जिल्ह्यातील प्रमुख धरणांमधील जलसाठा स्थिती, पर्जन्यमान विश्लेषण, संभाव्य धोके व आवश्यक उपाययोजनांची सादरीकरणाद्वारे माहिती दिली.


## ग्रामपंचायत वीर, ता.पुरंदर, जि.पुणे

**बी १निविदा सूचना -२ / २०२६ - २०२७**

सरपंच ग्रामपंचायत वीर ता. पुरंदर, जि. पुणे येथे विविध विकास कामे करण्यासाठी बी–१ पद्धतीने जि.प./ सार्वजनिक बांधकाम यांचे कडील योग्य त्या वर्गातील नोंदणीकृत कंत्राटदर यांच्याकडून निविदा बी–१ दोन लिफाफा पद्धतीने सिलबंद लिफाफा मध्ये निविदा मागविण्यात येत आहे. दि. २०/०६/२०२६ सकाळी. १०.०० ते २७/०६/२०२६ दु ५.०० वाजेपर्यंत ग्रामपंचायत कार्यालयात बंद लिफाफा मध्ये कार्यालयीन वेळेत सादर करण्यात याव्यात.

| अ.क्र. | कामाचे नाव | अंदाजपत्रकिय रक्कम जीएसटी सह | कोरी निविदा फी | बयाणा रक्कम | कामाचा कालावधी | ठेकेदाराचा वर्ग |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | शासकीय इमारतीवर रेनवॉटर हार्वेस्टिंग करणे | २३३०००/– | १००/– | १% | ६ महिने | खुला |
| २ | बनकरवाडी येथे शौचालय बांधने | १०००००/– | १००/– | १% | ६ महिने | खुला |
| ३ | सांडपाणी व्यवस्थापनांतर्गत गटार करणे | २८७४५३/– | १००/– | १% | ६ महिने | खुला |
| ४ | अंतर्गत रस्ते करणे / दुरुस्ती करणे | ३०००००/– | १००/– | १% | ६ महिने | खुला |
| ५ | सार्वजनिक चौक सुशोभीकरण करणे | २५००००/– | १००/– | १% | ६ महिने | खुला |
| ६ | स्पर्धा परिक्षा अभ्यास केंद्र तयार करणे | २२४९४४/– | १००/– | १% | ६ महिने | खुला |
| ७ | नळ पाणी पुरवठा दुरुस्ती करणे | ३०००००/– | १००/– | १% | ६ महिने | खुला |
| ८ | गाव अंतर्गत गटार करणे | २८५०००/– | १००/– | १% | ६ महिने | खुला |

**निविदा अटी व शर्ती** १) कोणत्याही निविदा स्वीकारण्याचा अथवा निविदा नाकारण्याचा अधिकार ग्रामपंचायतिकडे राखून ठेवला आहे २) कोऱ्या निविदा नमुन्याची फी (टेंडर फी) रक्कम ग्रामपंचायत वीर या नावाने चेक / कॅश ऑनलाईन भरून निविदा उपलब्ध होतील ३) निविदा मधील अटी व शर्तीनुसार कागदपत्रे तांत्रिक लिफाफा मध्ये सादर करण्यात यावेत ४) इसारा रक्कम ग्रामपंचायत वीर या नावाने चेक / कॅश /ऑनलाईन/डीडी लिफाफा न १ मध्ये जोडणे आवश्यक आहे. त्याशिवाय लिफाफा क्र २ उघडला जाणार नाही.

सरपंच / ग्रामपंचायत अधिकारी
ग्रामपंचयत वीर, ता.पुरंदर, जि.पुणे

द•ख•ल

## भाजपा युवा. मोर्चा जिल्हा उपाध्यक्षपदी पाटेकर, तर कळमकर चिटणीस

**ढोरजळगाव :** अहिल्यानगर जिल्हा भारतीय जनता पार्टी युवा मोर्चाची नुकतीच जिल्हा कार्यकारिणी जाहीर करण्यात आली असून. यामध्ये भाजपा युवा मोर्चा जिल्हा उपाध्यक्षपदी शेवगावच्या पूर्व भागातील ढोरजळगांव येथील महादेव पाटेकर तर चिटणीस पदी आव्हाणे बु येथील सोमनाथ कळमकर यांची नियुक्ती करण्यात आली आहे. भारतीय जनता युवा मोर्चाचे जिल्हाध्यक्ष सचिन वायकर यांनी नुकतीच पक्षाच्या युवा मोर्चाची कार्यकारणी जाहीर केली. निवड जाहीर होताच ढोरजळगाव, मळेगाव, आव्हाने येथे पक्षाच्या कार्यकर्त्यांनी जल्लोष केला. निवड झालेले तिघेही खा. सुजय विखे व आ. मोनिकाताई राजळे यांचे खंदे समर्थक आहेत. यावेळी बोलताना पाटेकर व कळमकर यांनी सांगितले की पक्षाने आमच्यावर जो विश्वास दाखवला आहे त्याला तडा न जाऊ देता पक्ष संघटना वाढीसाठी सर्वोतोपरी प्रयत्नशील असल्याचे बोलताना सांगितले. महादेव पाटेकर, व सोमनाथ कळमकर यांच्या निवडीबद्दल आ. मोनिकाताई राजळे, माजी. खा.सुजय विखे, प्रदेश कार्यकारणी सदस्य बापूसाहेब पाटेकर, युवा मोर्चा जिल्हाध्यक्ष सचिन वायकर, तालुकाध्यक्ष महेश फलके, संजय टाकळकर, गणेश कराड,अनंता ऊर्किडे यांनी अभिनंदन केले आहे.





## १२ विद्यार्थ्यांना ९० टक्केपेक्षा अधिक गुण



**कर्जत :** दादा पाटील महाविद्यालयातील १२ विद्यार्थ्यांनी सीईटीच्या परीक्षेत ९० टक्के पेक्षा अधिक गुण मिळवत यश संपादन केले. या यशस्वी विद्यार्थ्यांचा प्राचार्य डॉ संजय नगरकर यांनी सन्मान करीत शुभेच्छा दिल्या. केंद्रीय एम एच सीईटी अंतर्गत घेतली जाणाऱ्या सीईटी परीक्षेत कर्जतच्या दादा पाटील महाविद्यालयातील १२ विद्यार्थ्यांनी ९० टक्केपेक्षा अधिक पर्सेंटाइल गुण मिळवले. महाविद्यालयाच्या गुणात्मक प्रगतीची ही घोडदौड असून महाविद्यालयात वर्षभर नियमित अध्यापन, क्रॅश कोर्स, सराव परीक्षा, सुनियोजित मार्गदर्शन यामुळे सदर विद्यार्थ्यांनी घवघवीत यश प्राप्त केले असल्याची माहिती विद्यार्थी पालकांनी दिली. परंतु अशा क्लासेसला न जाता दादा पाटील महाविद्यालयात नियमित होणाऱ्या तासांना उपस्थित राहून स्वतः कष्ट करून मिळविलेले हे यश खूप महत्त्वाचे आहे. पालकांनी आपल्या पाल्यावर दाखवलेला विश्वास व विद्यार्थ्यांचे परिश्रम यातून पुढील विद्यार्थ्यांना निश्चितच प्रेरणा मिळणार असल्याचे मत व्यक्त केले. स्नेहल कोरडे, कीर्ती भोसले, हरीओम शिंदे, सुमित शेटे, सिद्धेश्वर उतेकर, पूजा बळे, अविनाश मोरे, प्रज्ञा रोडे, समाधान टिळेकर, हूदा तांबोळी, अनिकेत दळवी, रूपाली दवणे आणि सृष्टी काळे या विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला. प्रा. प्रवीण घालमे यांनी केले. याप्रसंगी ज्युनिअर विभागाचे उपप्राचार्य प्रा. विष्णू म्हस्के, कला शाखाप्रमुख प्रा. भिमराव गवारे आदी उपस्थित होते.

# पिझ्झा-बर्गरच्या जमान्यात रानमेवा गायब

### ग्रामीण चवीचा वारसा विस्मरणात !

### करवंद, जांभूळ, बोरांची गोडी हरवली फास्टफुडच्या गर्दीत नैसर्गिक फळांकडे डोळेझाक

शशिकांत पवार । राष्ट्र सह्याद्री



**नगर तालुका :** ग्रामीण भागात एकेकाळी उन्हाळ्याची सुट्टी म्हणजे रानमेव्याची पर्वणी मानली जायची. शाळा सुटल्या की मुले-मुली डोंगरदऱ्या, माळराने आणि ओढ्यांच्या काठावर करवंद, जांभूळ, बोर, चिंच, कवठ, बेल, रानआवळा, गोंधण, भोकर यांसारख्या रानफळांच्या शोधात फिरताना दिसत असत. मात्र आजच्या पिझ्झा, बर्गर आणि पॅकेज्ड खाद्यपदार्थांच्या जमान्यात नैसर्गिक रानमेवा हळूहळू गायब होत चालला आहे.

गावातील मुलांना करवंदाच्या जाळ्या, जांभळाची झाडे आणि बोराच्या बनांची ठिकाणे अचूक माहिती असत. आज अनेक मुलांना ही फळे प्रत्यक्ष पाहण्याची संधीही मिळत नाही. मोबाईल, इंटरनेट आणि बदलती खाद्यसंस्कृती यामुळे निसर्गाच्या कुशीत मिळणाऱ्या आरोग्यदायी खजिन्याकडे नव्या पिढीचे दुर्लक्ष होत असल्याचे चित्र आहे.

रानमेवा केवळ खाण्याचा पदार्थ नव्हता तर ग्रामीण संस्कृतीचा अविभाज्य भाग होता. मित्रांसोबत रानात भटकणे, झाडावर चढून फळे तोडणे आणि एकमेकांत वाटून खाणे यामधून निसर्गाशी एक वेगळे नाते निर्माण होत असे. आज त्या जागी फास्टफूडची दुकाने आणि स्क्रीनसमोरील जीवनशैली दिसत आहे.आजची तरुण पिढी मोबाईल, सोशल मीडिया आणि ऑनलाइन गेम्समध्ये अधिक रमू लागल्याने ग्रामीण भागातील पारंपरिक खेळ व रानमेवा हळूहळू विस्मृतीत जात आहेत. पूर्वी उन्हाळा व पावसाळ्यात मुले-मुली गोट्या, विटीदांडू, लगोरी, कबड्डी, पोहणे यांसारखे खेळ खेळत असत. तसेच करवंद, जांभूळ, बोरे, आवळा, चिंच यांसारख्या रानमेव्याचा आस्वाद घेत असत.

> रानमेव्याची गोडी आणि गावच्या खेळांची मैफल हरवत चालली आहे.आधुनिकतेच्या शर्यतीत बालपण निसर्गापासून दूर जात आहे. हातात मोबाईल आला पण रानमेव्याची ओळख हरवली. तंत्रज्ञान मिळाले मात्र निसर्गाशी असलेली नाळ तुटत चालली आहे.
>
> **शरद तोडमल, जेऊर**

रानमेव्यात विविध प्रकारची जीवनसत्त्वे, खनिजे आणि पोषक घटक मुबलक प्रमाणात आढळतात. त्यामुळे शरीराची रोगप्रतिकारक शक्ती वाढण्यास मदत होते. मात्र फास्ट फूड आणि मोबाईलच्या वाढत्या आकर्षणामुळे तरुणाईचा निसर्गाशी असलेला संबंध कमी होत चालला आहे.

वाढती वृक्षतोड, कमी होत जाणारे वनक्षेत्र आणि बदलते हवामान यामुळेही रानफळांची संख्या घटत आहे. रानमेव्याचा वारसा जपण्यासाठी स्थानिक पातळीवर वृक्षसंवर्धन आणि जनजागृतीची गरज निर्माण झाली आहे. तसेच पालकांनी मुलांना पारंपरिक खेळ, मैदानी उपक्रम आणि रानमेव्याचे महत्त्व पटवून देण्याची गरज व्यक्त होत आहे. ग्रामीण संस्कृतीचा हा अमूल्य वारसा जपण्यासाठी समाजाने पुढाकार घेणे काळाची गरज बनली आहे.

> मोबाईलच्या स्क्रीनमध्ये अडकलेल्या पिढीला जांभळाच्या झाडाखालील बालपण करवंदांची चव आणि मातीच्या खेळांचा आनंद आता फक्त आठवणीतच उरला आहे. यामुळे बालपणीच मुलांमध्ये विविध आजार जडत असल्याचे चित्र निर्माण झाले आहे.
>
> **देवीदास कासार, वाळकी**

## 'परिक्रमा'च्या विद्यार्थिनींची औषध कंपन्यांत निवड




प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**श्रीगोंदा :** श्रीगोंदा तालुक्यातील काष्टी येथील परिक्रमा शैक्षणिक संकुलातील परिक्रमा फॅकल्टी ऑफ फार्मसी महाविद्यालयाने प्लेसमेंट क्षेत्रात आणखी एक उल्लेखनीय यश संपादन केले आहे. महाविद्यालयातील तब्बल ४९ विद्यार्थिनींची पुण्यातील नामांकित औषधनिर्मिती कंपन्यांमध्ये निवड झाली असून, संस्थेच्या शैक्षणिक गुणवत्तेवर पुन्हा एकदा शिक्कामोर्तब झाले आहे.

महाविद्यालयातील २७ विद्यार्थिनींची एजिओ फार्मा, भोसरी (पुणे) येथे तर २२ विद्यार्थिनींची एमक्योर फार्मास्युटिकल्स, पुणे या आघाडीच्या कंपनीत मुलाखतीद्वारे निवड झाली आहे. या यशामुळे महाविद्यालय, संस्था आणि विद्यार्थिनींमध्ये आनंदाचे वातावरण निर्माण झाले असून, ही कामगिरी संस्थेच्या इतिहासातील महत्त्वाचा टप्पा मानली जात आहे.महाराष्ट्रभरातून विद्यार्थी शिक्षणासाठी परिक्रमा महाविद्यालयाची निवड करतात. विद्यार्थिनींना दिलेले सातत्यपूर्ण मार्गदर्शन, प्रशिक्षण आणि आत्मविश्वास वाढविणाऱ्या उपक्रमांमुळे हे यश शक्य झाल्याचे मानले जात आहे. संस्थेचे मुख्य कार्यकारी अधिकारी ड. प्रतापसिंह पाचपुते यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा यासाठी आधुनिक शैक्षणिक सुविधा उपलब्ध करून देण्यावर भर दिला जात आहे. त्यामुळे विद्यार्थ्यांना रोजगारक्षम बनविण्यात संस्थेला यश मिळत आहे. या यशाबद्दल महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. सुनिल निर्मळ, ट्रेनिंग अँड प्लेसमेंट अधिकारी डॉ. सोनल सोलंकी, शिक्षक व शिक्षकेतर कर्मचाऱ्यांनी निवड झालेल्या विद्यार्थिनींचे अभिनंदन करून त्यांच्या पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या. विद्यार्थिनींच्या या उल्लेखनीय यशामुळे पालकांमध्ये समाधानाचे वातावरण निर्माण झाले असून, परिसरातून महाविद्यालयावर कौतुकाचा वर्षाव होत आहे.

## १९९ रुपयांच्या कार्डासाठी २५० रुपयांची वसुली

### अतिरिक्त रक्कम परत न दिल्यास आंदोलनाचा इशारा

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**सुपा :** सर्वसामान्य प्रवाशांची जीवनवाहिनी म्हणून ओळखल्या जाणाऱ्या राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) डिजिटल कार्ड वितरण प्रक्रियेत गंभीर अनियमितता होत असल्याचा आरोप समोर आला आहे. महिला, ज्येष्ठ नागरिक आणि ७५ वर्षांवरील वयोवृद्ध प्रवाशांसाठी आवश्यक ठरणाऱ्या 'नॅशनल कॉमन मोबिलिटी कार्ड' (एनसीएमसी) अर्थात डिजिटल कार्डासाठी शासनाने निश्चित केलेल्या १९९ रुपयांऐवजी तब्बल २५० रुपये आकारले जात असल्याची धक्कादायक बाब उघड झाली आहे. विशेष म्हणजे या प्रकाराचा सर्वाधिक फटका ग्रामीण भागातील महिला व ज्येष्ठ नागरिकांना बसत असून, संबंधित प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे प्रवाशांमध्ये तीव्र नाराजी पसरली आहे.

> **तक्रारींचा अहवाल वरिष्ठांकडे पाठविला**
>
> सुपे बसस्थानकावर डिजिटल कार्ड काढताना काही कर्मचारी अधिक पैसे घेत असल्याच्या तक्रारी प्राप्त झाल्या आहेत. याबाबत संबंधितांना अनेक वेळा सूचना देण्यात आल्या आहेत. तसेच या संदर्भातील अहवाल वरिष्ठ अधिकाऱ्यांकडे पाठविण्यात आला असून पुढील कारवाई वरिष्ठ स्तरावरून करण्यात येईल.
>
> **प्रशांत काळे, पारनेर**

राज्य परिवहन महामंडळाने महिला, ज्येष्ठ नागरिक आणि वयोवृद्ध प्रवाशांना मिळणाऱ्या प्रवास सवलतींची प्रक्रिया अधिक सुलभ व डिजिटल करण्यासाठी एनसीएमसी कार्ड योजना सुरू केली आहे. यापूर्वी लाभार्थींना आधार कार्ड किंवा इतर ओळखपत्रांच्या आधारे सवलत मिळत होती. मात्र आता सवलतीच्या प्रवासासाठी डिजिटल कार्ड अनिवार्य करण्यात आले आहे. या नव्या नियमामुळे ग्रामीण भागातील हजारो महिला, ज्येष्ठ नागरिक व वयोवृद्ध नागरिक दररोज पारनेर व सुपे बसस्थानकांवर डिजिटल कार्ड काढण्यासाठी गर्दी करत आहेत. मात्र या गर्दीचा गैरफायदा घेत काही ठिकाणी कार्ड वितरणाच्या नावाखाली सर्रास जादा पैसे आकारले जात असल्याचा आरोप होत आहे. कार्डाचे अधिकृत शुल्क १९९ रुपये असताना प्रत्यक्षात २५० रुपये घेतले जात असल्याने प्रत्येक कार्डामागे ५१ रुपयांची अतिरिक्त वसुली होत आहे.

### दिंडी निधी घोटाळा व बी-१ निविदा प्रक्रियेतील संभाव्य गैरव्यवहाराच्या निषेधार्थ

## जि.प.समोर संभाजी ब्रिगेडचे 'आली मरीआई'आंदोलन

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री



**नगर तालुका :** जनतेच्या हक्काच्या पैशावर डल्ला मारणाऱ्या भ्रष्ट प्रवृत्तींच्या विरोधात संभाजी ब्रिगेडने आज जिल्हा परिषद अहिल्यानगर येथे पारंपरिक 'आली मरीआई' आंदोलन करत प्रशासनाला धारेवर धरले. जून २०२५ मध्ये पायी दिंडी वारीसाठी वितरित करण्यात आलेल्या निधीतील कथित आर्थिक घोटाळा आणि जिल्हा परिषद अंतर्गत राबविण्यात येत असलेल्या बी-१ निविदा प्रक्रियेतील संभाव्य गैरव्यवहारांच्या निषेधार्थ हे आंदोलन करण्यात आले.

संभाजी ब्रिगेडचे जिल्हाध्यक्ष राजेश परकाळे यांच्या नेतृत्वाखाली पोतराज, पदाधिकारी व कार्यकर्त्यांनी जिल्हा परिषद कार्यालयापासून मुख्य कार्यकारी अधिकारी यांच्या दालनापर्यंत जोरदार मोर्चा काढला. वाद्यांचा गजर, पोतराजांचा पारंपरिक सहभाग आणि जय जिजाऊ, जय शिवराय, भ्रष्टाचार मुर्दाबाद, घोटाळेबाजांना शिक्षा झालीच पाहिजे अशा घोषणांनी संपूर्ण जिल्हा परिषद परिसर दणाणून गेला.

यावेळी संभाजी ब्रिगेडचे श्रीगोंदा तालुकाध्यक्ष शामभाऊ जरे यांनी मुख्य कार्यकारी अधिकारी भंडारे यांच्यासमोर संघटनेच्या मागण्या मांडल्या. दिंडी निधीच्या नावाखाली जनतेच्या पैशाची झालेली कथित उधळपट्टी, निविदा प्रक्रियेतील संशयास्पद बाबी आणि प्रशासनाच्या निष्क्रिय भूमिकेवर त्यांनी कठोर शब्दांत टीका केली. जनतेच्या पैशावर डल्ला मारणाऱ्या दोषींना तात्काळ निलंबित करून फौजदारी स्वरूपाची कारवाई करण्यात यावी अशी मागणीही यावेळी करण्यात आली.

आंदोलनाची वाढती तीव्रता लक्षात घेऊन मुख्य कार्यकारी अधिकारी भंडारे यांनी तातडीने शिष्टमंडळाला चर्चेसाठी बोलावले. सुमारे तासभर चाललेल्या चर्चेनंतर प्रशासनाने दिंडी निधी प्रकरणाच्या चौकशीसाठी उच्चस्तरीय चौकशी समिती नियुक्त करण्यात आल्याचे जाहीर केले. मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांकडून लेखी आश्वासन मिळाल्यानंतर आंदोलन स्थगित करण्यात आले. मात्र, दिलेल्या आश्वासनांची अंमलबजावणी झाली नाही, दोषींवर कारवाई झाली नाही किंवा चौकशी दडपण्याचा प्रयत्न झाला तर संभाजी ब्रिगेड यापेक्षाही अधिक तीव्र जनआंदोलन उभारेल, असा इशारा जिल्हाध्यक्ष राजेश परकाळे यांनी दिला.

> जनतेच्या हक्काच्या पैशाची लूट खपवून घेतली जाणार नाही. चौकशी पूर्ण होऊन दोषींवर कठोर कारवाई होईपर्यंत संभाजी ब्रिगेडचा लढा सुरूच राहील.
>
> **राजेश परकाळे**
> **जिल्हाध्यक्ष, संभाजी ब्रिगेड**

यावेळी राजेशदादा परकाळे, दिलीप आबा वाळुंज, सुदाम कोरडे, शामभाऊ जरे, सचिन काकडे, महेश दानवे, उत्तम घोगरे, सद्दाम शेख, अक्षय दहातोंडे, दिलीप लबडे, पांडुरंग खोरे, बापू जगताप, रवींद्र महांडुळे, संदीप मांडोळे, प्रदीप दरेकर, संतोष आरडे तसेच भीमराज कोकाटे, संदीप मांढरे, शशिकांत आण्णा पवार, अविनाश मेढे, संतोष कोकाटे यांच्यासह मोठ्या संख्येने कार्यकर्ते उपस्थित होते.

## 'गोसेवक' तयार करणारा तारकेश्वर गड!

अविनाश मंत्री। राष्ट्र सह्याद्री

### राज्यातील एकमेव उपक्रम

**पाथर्डी :** कत्तलीसाठी जाणाऱ्या गाईंचे पालकत्व स्वीकारून संगोपन करताना सेवा कार्याच्या माध्यमातून गोसेवक मोठ्या प्रमाणावर तयार होत आहेत. गावोगावचे भाविक ठरवून दिलेल्या प्रत्येक दिवशी येतात. सुमारे २२५ देशी गाईंची सेवा व गोशाळेची स्वच्छता करतात. भाविकांकडून सेवाभावी पद्धतीने चालू असलेली राज्यातील एकमेव गोशाळा असून गोसेवकांचे चालते बोलते विद्यापीठ म्हणून गडाचे महंत आदिनाथ शास्त्री महाराज यांचेकडे बघितले जाते. गडावर असताना महाराज स्वतः तास-दोन तास गोसेवा कार्यात सहभागी होतात. श्री क्षेत्र तारकेश्वर गड येथील वैशिष्ट्यपूर्ण व आगळीवेगळी गोशाळा राज्यात चर्चेचा विषय ठरली आहे.

केंद्र व राज्य शासनाच्या विशेष प्रयत्नातून देशी गाईंचे व गो वंशाचे संरक्षण, संवर्धन व पूजन व्हावे म्हणून गो हत्या बंदी कायदा संमत झाला. कायद्यातील पळवाटांचा आधार घेत गो हत्या कमी अधिक प्रमाणात सुरू असल्या तरी गेल्या दहा पंधरा वर्षात राज्यात गोशाळांची संख्या वाढल्याने बऱ्यापैकी गाईंचे रक्षण होत आहे. या गाईंचे पालन पोषण कसे करायचे अशी मोठी समस्या गोशाळा चालकांपुढे राहून चारा पाण्यासाठी देणगी देण्याचे गोभक्तांना आवाहन करत गो शाळेतील शेणखत गोमूत्राची विक्री करत मोठी कसरत करून गोवंशाचे संगोपन करण्याचा प्रयत्नही गोशाळा चालकांकडून राज्यात सुरू आहे.

शासनाकडून निकषात बसणाऱ्या गोशाळांना अनुदान काही दिवसांपूर्वी सुरू झाले आहे. धर्मशास्त्र, आरोग्यशास्त्राबरोबरच देशी गाय हा विषय श्रद्धेचा असून गाईमध्ये हिंदू धर्मातील ३३ कोटी देव देवतांचा अंशात्मक अधिवास असतो असे धर्मग्रंथांमध्ये सांगितले आहे. विविध रोगांवर गोमूत्र चिकित्सा अत्यंत लाभदायक ठरली असून गाईच्या दुधात सुवर्ण अंश असल्याने त्याला पूर्ण अन्न म्हणून ओळखले जाते. हिंदुत्ववादी संघटनांचा सामूहिक प्रयत्न, गो सेवकांकडून होणारी सेवा, राज्य सरकारचा आक्रमक पवित्रा यामुळे गोपालनाचे, गोरक्षणाचे कार्य वाढत चालले आहे.

श्री क्षेत्र तारकेश्वर गड भौगोलिक दृष्ट्या आष्टी तालुक्यात असला तरी पाथर्डीपासून अवघे बारा किलोमीटर अंतरावर असल्याने सर्व व्यवहार पाथर्डी येथे चालतात. वैकुंठवासी वेदांताचार्य नारायण महाराज यांनी गडाची स्थापना केली. त्यांचे नंतर आदिनाथ शास्त्री महाराज यांनी मठाधिपती म्हणून कारभार पाहण्यास प्रारंभ केला. कीर्तन प्रवचनातून धर्म जागृती व संघटन कार्य करण्याबरोबरच नव्या पिढीला सेवा कार्याकडे प्रवृत्त करण्यासाठी विशेष प्रयत्न महाराजांनी सुरू केले. राम मंदिर स्थापना सोहळ्यातही त्यांनी सक्रिय सहभाग घेतला. सुमारे पंधरा वर्षांपूर्वी त्यांनी गोशाळा सुरू केली. लोकश्रद्धेचा विषय हाताळत, या कार्यात सर्वांना सहभागी करत गावोगावी गोसेवक कसे वाढतील यावर भर दिला. हिंदुत्ववादी विचारांचा भक्कमपणे जाहीर रित्या पुरस्कार करत धर्म कार्य करणाऱ्या महंतांपैकी आदिनाथ शास्त्री सारखे बोटावर मोजण्या एवढे महंत आता गो सेवेकडे सुद्धा वळाले आहेत. येथील सेवा एवढी निरपेक्ष आहे, त्याचे उदाहरण म्हणजे, गोशाळेतील सर्व दूध संबंधित गाईच्या वासरासाठीच ठेवले जाते. गाईच्या दुधाची विक्री होत नाही. नगर, शेवगाव, राहुरी, पाथर्डी, आष्टी तालुक्यातील विविध गावांच्या भाविकांचा या कार्यात सहभाग आहे.

अहिल्यानगर व बीड जिल्ह्यातील गोसेवक मिळून तारकेश्वर गडाच्या गोशाळेची दैनंदिन देखभाल व सेवा करतात. राहुरी तालुक्यातील शिलेगाव येथून दर रविवारी टेम्पो भरून चारा ग्रामस्थांकडून दिला जातो. गडाकडून कडबा विकत घेऊन त्याची कुट्टी करत गोमातांना दिले जाते. याची सर्वत्र जोरदार चर्चा सुरू आहे.

## गौरी शुगरमध्ये गळीत हंगाम २०२६-२७ च्या तयारीला वेग

**श्रीगोंदा :** गौरी शुगर अँड डिसलरीप्रा लि हिरडगाव येथे गळीत हंगाम २०२६-२७ च्या पूर्वतयारीचा महत्त्वाचा टप्पा असलेल्या मिल रोलर पूजनाचा कार्यक्रम उत्साहात पार पडला. गुरुवारी (१८ जून) आयोजित करण्यात आलेल्या या समारंभात आगामी हंगामासाठी कारखान्याच्या कामांना विधिवत प्रारंभ करण्यात आला. ओंकार शुगर ग्रुपचे चेअरमन बाबुराव बोत्रे यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमात ग्रुपचे संचालक ओमराजे बोत्रे यांच्या हस्ते मिल रोलरचे पूजन करण्यात आले. यावेळी बोलताना ओमराजे बोत्रेपाटील यांनी शेतकरी, कामगार आणि उद्योग यांच्यातील समन्वयामुळे ओंकार शुगर ग्रुपने साखर उद्योगात वेगळी ओळख निर्माण केल्याचे सांगितले. आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, कार्यक्षम व्यवस्थापन आणि शेतकरीहिताला प्राधान्य देत आगामी गळीत हंगाम अधिक यशस्वी करण्याचा निर्धार त्यांनी व्यक्त केला. कारखान्यातील यांत्रिक दुरुस्ती, देखभाल आणि इतर आवश्यक कामे अंतिम टप्प्यात असून आगामी हंगामात अधिक क्षमतेने व कार्यक्षमतेने ऊस गाळप करण्यासाठी कारखाना सज्ज असल्याची माहितीही त्यांनी दिली. या कार्यक्रमास कारखान्याचे जनरल मॅनेजर, विविध विभागांचे प्रमुख, अधिकारी, कर्मचारी, ऊस उत्पादक शेतकरी तसेच तोडणी-वाहतूक ठेकेदार मोठ्या संख्येने उपस्थित होते. उपस्थितांनी नवीन गळीत हंगाम यशस्वी होण्यासाठी शुभेच्छा दिल्या. मिल रोलर पूजनामुळे गळीत हंगाम २०२६-२७ च्या तयारीला औपचारिक सुरुवात झाली असून, शेतकऱ्यांना दर्जेदार सेवा, वेळेत ऊस गाळप आणि उद्योगाच्या सर्वांगीण प्रगतीसाठी कारखाना कटिबद्ध असल्याचा विश्वास व्यवस्थापनाने व्यक्त केला.

# सीना धरणाची पाणी पातळी खालावली.. !

### पाणलोट क्षेत्रात पावसाची हुलकावणी ; धरणात अल्पसा पाणीसाठा, पाणीयोजना संकटात

प्रतिनिधी। राष्ट्र सह्याद्री

**मिरजगाव :** कर्जत तालुक्यासह आष्टी तालुक्याला वरदान ठरणाऱ्या सिना धरणाचे पोट खपाटीला गेले असून धरणात केवळ मृतसाठ्यापेक्षाही कमी पाणीसाठा शिल्लक राहिला आहे.

कर्जत तालुक्यातील निमगाव गांगर्डा व लाभक्षेत्रातील गावांना वरदान ठरलेले सिना धरण गेल्या वर्षी जिल्ह्यात सर्वात प्रथम आणि धरण निर्मितीपासून प्रथमच दि.१४ जुन रोजी पूर्ण क्षमतेने भरले होते. गतवर्षी धरण भरण्याचा मान मिळविलेले हे धरण अद्याप कोरडेठाक असल्याने लाभक्षेत्रातील

**सिना धरणातील सध्याची स्थिती**

| | |
|---|---|
| एकूण क्षमता | -२४०० |
| पाणी पातळी | - ५७८.९९ (मी.) |
| एकूण साठा | - २३.३० (द.ल.घ.मि.) |
| एकूण साठा | - ८२२.८३ (द.ल.घ.फु) |
| उपयुक्त साठा | - २७०.१५(द.ल.घ.फु.) |
| उपयुक्त टक्के | - १४.६२. % |
| एकूण टक्के | - ३४.२७ % |
| आजचा पाऊस | - ०० (मि.मी.) |

शेतकऱ्यांच्या चेहऱ्यावर चिंतेचे ढग जमू लागले आहे...

सिना धरणातील पाण्याने तळ गाठल्याने सीना धरणातील पाणी पातळी खालावली असून धरणावरील पाणीपुरवठा योजना संकटात आहेत. शेती सिंचनासह पिण्याच्या पाण्याचा प्रश्न निर्माण होण्याची शक्यता आहे.

कर्जत तालुक्यातील जिरायत



नदीवर बांधण्यात आलेले हे धरण तालुक्यातील निमगाव गांगर्डा सह मिरजगाव, नागापूर, नागलवाडी, सीतपुर, निंबोडी, तरडगाव, मलठण, निमगाव डाकू, चापडगाव, दिघी सह आष्टी तालुक्यातील मेहेकरी धरण लाभक्षेत्रातील गावातील शेतकऱ्यांना सिंचन आणि पिण्याच्या पाण्यासाठी वरदान आहे.

अगोदर म्हणजे जुन महिन्यातच १४ जून रोजी पूर्ण क्षमतेने भरून सांडव्यातून पाणी ओसंडून वाहत होते. मात्र, या वर्षी लाभक्षेत्रात पाऊस नसल्याने पाण्याची शून्य आवक असल्याने धरणात केवळ मृत साठ्यापेक्षाही कमी पाणीसाठा उरला आहे. यामुळे धरणांतील जलजीव सुद्धा अखेरच्या घटका मोजीत असल्याचे चित्र आहे.

सिना धरण पाणलोट क्षेत्रातील पाण्यावर कर्जत तालुक्यातील सात हजार सहाशे बहात्तर हेक्टर तर बीड जिल्ह्यातील आष्टी तालुक्यातील सातशे त्र्याहत्तर हेक्टर जमीन उजव्या व डाव्या कालव्याद्वारे ओलिताखाली येते.

तत्कालीन माजी मंत्री स्व.आबासाहेब निंबाळकर यांच्या पाठपुराव्यातुन सन.१९७२ साली सिना नदी वरील निमगाव गांगर्डा येथील सिना धरणाच्या कामास सुरुवात झाली. सिना धरण प्रकल्प कालव्याचे काम सन.१९८५ मध्ये पूर्ण होवून प्रत्यक्ष सिंचनास सुरूवात झाली. आतापर्यंत सिना धरण परतीच्या पावसाने ओव्हरफ्लो झाले असून धरण निर्मितीपासून ३९ वर्षात बावीस वेळा सिना धरण पूर्ण क्षमतेने वाहीले असल्याचा इतिहास आहे.

> **शेतकऱ्यांना पावसाची प्रतीक्षा....**
>
> गेल्यावर्षी धुमाकूळ घालीत ओला दुष्काळ परिस्थिती जून महिन्यात करणारा पाऊस आता रुसला की काय, अशी परिस्थिती निर्माण झाली आहे. शेतकऱ्यांनी हमखास पाऊस येईल, या आशेवर पेरणी पूर्व मशागतीची कामे केली आहेत. आमच्यासाठी कामधेनू असणारे सिना धरण अद्याप कोरडेच असल्याने पुढे काय? या प्रश्नांनी भिती निर्माण झाली आहे. त्यामुळे लाभक्षेत्रातील शेतकऱ्यांच्या सध्यातरी पावसाकडे नजरा लागल्या आहेत.

दैनिक राष्ट्र सह्याद्री

## शेअर मार्केट फसवणूक प्रकरणातील मुख्य सूत्रधार ढोरकुलेला जामीन नाकारला

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शेवगाव** : शेवगाव तालुक्यातील बाभुळगाव येवलेवस्ती येथील मोठ्या प्रमाणात चर्चेत असलेल्या शेअर मार्केट गुंतवणूक फसवणूक प्रकरणातील मुख्य आरोपी सखाराम नामदेव ढोरकुले यास औरंगाबाद खंडपीठाच्या उच्च न्यायालयाने नियमित जामीन देण्यास नापसंती दर्शविली. दरम्यान सखाराम ढोरकुले याने त्याचा जामीन अर्ज मागे घेतला आहे. शेवगाव येथील रहिवासी फिर्यादी अवधूत विनायक केदार यांनी सखाराम ढोरकुले याच्याविरुद्ध शेवगाव पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली होती या तक्रारीनुसार आरोपीने स्वतःची 'गुरुकृपा ट्रेडिंग अँड इन्व्हेस्टमेंट' या नावाचे शेअर मार्केट ट्रेडिंग कंपनी असल्याचे भासवून गुंतवणुकीवर १६ टक्के परतावा देण्याचे आमिष दाखवले. या अमिषाला बळी पडून फिर्यादी व इतर गुंतवणूकदारांनी आरोपीकडे एकूण ३३ लाख रुपयांची गुंतवणूक केली. मात्र आरोपीने ना अपेक्षित परतावा दिला, ना गुंतवलेली मूळ रक्कम परत केली. याबाबत १५ डिसेंबर २०२४ रोजी शेवगाव पोलीस ठाण्यात आर्थिक फसवणुकीची तक्रार दाखल करण्यात आली. या प्रकरणात आरोपीविरुद्ध भारतीय दंड संहितेच्या ४२०,४०६,४०९ सह ३४ तसेच एम.पी.आय.डी.कायदा कलम ३ व ४ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. दोषारोपपत्र दाखल झाल्यानंतर आरोपीने नियमित जामिनासाठी अर्ज केला होता. या अर्जाला फिर्यादी अवधूत विनायक केदार यांनी ड. प्रशांत प्रभाकर गिरी यांच्यामार्फत तीव्र विरोध केला. न्यायमूर्ती सिद्धेश्वर ठोंबरे यांच्यासमोर झालेल्या सुनावणीत मा.ना.उच्च न्यायालय खंडपीठ औरंगाबाद यांनी उपलब्ध कागदपत्रे व तपासातील बाबींचा सखोल विचार केला. आरोपीने खोटी आश्वासने देऊन गुंतवणूकदारांची फसवणूक केल्याचे प्रथम दर्शनी दिसून येते.



# आमदार व्हायचे असते तर दोन महिन्यांपूर्वीच झालो असतो; डॉ. सुजय विखे

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**लोणी** : आज काही जण ज्या पदांचा आनंद घेत आहेत, ती पदे आम्ही स्वेच्छेने सोडून दिलेली आहेत. पद मिळाल्यानंतर त्याचा आनंद घ्यावा, परंतु त्यातून माज, अहंकार किंवा मगरुरी निर्माण होता कामा नये. लोकांनी दिलेल्या सन्मानाची जाणीव ठेवून काम करणे आवश्यक आहे. पद हे लोकांची कामे करण्यासाठी असते. समाजाच्या विकासासाठी आणि सर्वसामान्यांच्या प्रश्नांच्या सोडवणुकीसाठी त्याचा उपयोग झाला पाहिजे असे डॉ. सुजय विखे पाटील यांनी ठणकावून सांगितले, लोणी येथे प्रवरा बँकेच्या यूपीआय बँकिंग सेवेच्या शुभारंभप्रसंगी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. पुढे बोलताना डॉ. सुजय विखे पाटील म्हणाले की, काही लोकांना कारखान्याचे चेअरमन व्हायचे असते, काहींना आमदार व्हायचे असते, तर काही जण विविध पदांसाठी धडपड करत असतात. मात्र आम्हाला आमदार व्हायचे असते, तर दोन महिन्यांपूर्वीच झालो असतो. पद मिळवणे हा आमचा उद्देश नाही. लोकांमध्ये जाण्यासाठी, त्यांच्या सुख-दुःखात सहभागी होण्यासाठी आणि समाजकारण करण्यासाठी कोणत्याही पदाची गरज नसते. जनतेचा विश्वास आणि प्रेम हीच आमची सर्वात मोठी ताकद आहे.



राजकारणातील चढ-उतारांचा उल्लेख करताना त्यांनी आपल्या अनुभवांचाही संदर्भ दिला. पद यायला आणि जायला वेळ लागत नाही. मी स्वतः त्याचा जिवंत अनुभव घेतला आहे. त्यामुळे कोणत्याही पदाचा गर्व न करता जमिनीवर राहून काम केले पाहिजे. पद कायमस्वरूपी नसते, मात्र लोकांशी असलेले नाते कायम राहते. म्हणूनच जनतेचा विश्वास जपणे हे कोणत्याही पदापेक्षा अधिक महत्त्वाचे आहे, असे त्यांनी सांगितले. पुढे बोलताना ते म्हणाले विखे पाटील परिवाराच्या सामाजिक आणि राजकीय वाटचालीचा उल्लेख करताना ते म्हणाले की, गेल्या अनेक दशकांपासून जनतेने आमच्या परिवारावर प्रेम केले आहे. आजही आम्ही गावात गेलो की लोक आपुलकीने भेटतात, स्वागत करतात. हे प्रेम आणि विश्वास कोणत्याही पदापेक्षा मोठे आहे. त्यामुळे पद मिळाले म्हणून लोकांपासून दूर जाणे किंवा सत्तेच्या बळावर वागणे योग्य नाही.

राजकीय विरोधकांवर निशाणा साधताना त्यांनी सूचक शब्दांत टोला लगावला. गेल्या सहा महिन्यांत आम्ही आमची ताकद दाखवून दिली आहे. त्यामुळे आता जास्त बोलण्याची गरज नाही. मेंदूचा डॉक्टर काही काळ बाहेर राहिल्यामुळे काही मनोरुग्ण बाहेर पडायला लागले आहेत. आता डॉक्टर परत येणार असून सर्वांवर उपचार करणार आहे, असे सांगत त्यांनी उपस्थितांमध्ये एकच हशा पिकवला. समाजकारण, विकास आणि जनतेच्या प्रश्नांबाबत आपण पूर्वीप्रमाणेच सक्रिय राहणार असल्याचे सांगताना त्यांनी कार्यकर्त्यांनाही जनतेशी सातत्याने संपर्क ठेवण्याचे आवाहन केले. लोकांच्या प्रश्नांसाठी संघर्ष करण्याची आणि विकासाच्या कामांसाठी पाठपुरावा करण्याची परंपरा कायम ठेवणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

अहिल्यानगर जिल्ह्यातील आगामी सहकारी, स्थानिक स्वराज्य संस्था आणि इतर निवडणुकांच्या पार्श्वभूमीवर डॉ. सुजय विखे पाटील यांच्या या परखड आणि आक्रमक वक्तव्याची राजकीय वर्तुळात जोरदार चर्चा सुरू झाली आहे. पदापेक्षा लोकांचा विश्वास मोठा असून जनतेच्या हिताच्या प्रश्नांवर कायम ठाम भूमिका घेत राहू, असा निर्धारही त्यांनी यावेळी व्यक्त केला.

## वादात मध्यस्थी केल्याचा राग; शिक्षकास लाकडी काठीने मारहाण

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : शेतीच्या वाटपाच्या वादात मध्यस्थी केल्याचा राग मनात धरून एका शिक्षकास लाकडी काठीने मारहाण करून जीवे मारण्याची धमकी दिल्याची घटना राहुरी तालुक्यातील मोमीन आखाडा-बोरटेक येथे घडली. या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात एका व्यक्तीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. याबाबत सोमनाथ बबन कोहकडे (वय ५५, व्यवसाय-शिक्षक, रा. मोमीन आखाडा, बोरटेक) यांनी फिर्याद दिली आहे. फिर्यादीनुसार, त्यांच्या मामाच्या मुलाच्या शेती वाटपाच्या वादात सुमारे चार वर्षांपूर्वी त्यांनी मध्यस्थी केली होती. त्याच कारणावरून आरोपी संतोष बाळासाहेब गाडे याच्या मनात त्यांच्याविषयी राग होता. १७ जून रोजी सायंकाळी साडेसहा वाजण्याच्या सुमारास कोहकडे हे राहुरी-ताहाराबाद रस्त्यावर फिरत असताना आरोपीने त्यांना अडवून शिवीगाळ केली. त्यानंतर लाथाबुक्क्यांनी मारहाण करत खाली पाडले व लाकडी काठीने मांडी, पाठ, खांदा, पोट आणि डोक्यावर वार करून जखमी केले. तसेच भविष्यात वादात पडल्यास जीवे मारण्याची धमकी दिल्याचे फिर्यादीत नमूद आहे. आरडाओरड ऐकून पत्नी व मुलगा घटनास्थळी धावून आल्याने आरोपी पसार झाला. उपचारानंतर कोहकडे यांनी तक्रार दाखल केली. या प्रकरणी संतोष गाडे याच्याविरुद्ध भारतीय न्याय संहितेच्या विविध कलमान्वये गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास राहुरी पोलीस करीत आहेत.

## अल्पवयीन विद्यार्थ्यावर लोखंडी रॉडने हल्ला; चौघांविरुद्ध गुन्हा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**राहुरी** : राहुरी रेल्वे स्टेशनजवळील पाटावर पोहण्यासाठी गेलेल्या १६ वर्षीय विद्यार्थ्यावर लोखंडी रॉडने हल्ला करून गंभीर जखमी केल्याची घटना ८ जून रोजी दुपारी घडली. या प्रकरणी राहुरी पोलीस ठाण्यात चार जणांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, कोंढवड येथील समर्थ अमोल म्हसे (वय १६) हा आपल्या मित्रांसह पोहण्यासाठी रेल्वे स्टेशन परिसरातील पाटावर गेला होता. दुपारी सुमारे ३.१५ वाजता पोहून झाल्यानंतर तो झाडाखाली बसला असताना आरोपी ऋषिकेश गणेश गाडे (रा. कोंढवड), शुभम शिवाजी पेरणे (रा. तांदुळवाडी) तसेच त्यांच्या सोबत आलेले दोन अनोळखी युवक लोखंडी रॉड घेऊन तेथे आले. फिर्यादीनुसार, आरोपींनी शिवीगाळ करत समर्थवर लोखंडी रॉडने हल्ला केला. या मारहाणीत त्याच्या डोक्यावर, उजव्या कानाजवळ व पाठीवर गंभीर दुखापत झाली. हल्ल्यावेळी आरोपींनी धमकीही दिल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे. घटनेनंतर मित्रांनी नातेवाईकांना माहिती दिल्यानंतर जखमी विद्यार्थ्याला विविध रुग्णालयांत उपचारासाठी दाखल करण्यात आले. सुमारे सात दिवस उपचार घेतल्यानंतर प्रकृतीत सुधारणा झाल्यावर त्याने वडिलांसह राहुरी पोलीस ठाण्यात तक्रार दाखल केली. या प्रकरणी गुन्हा रजिस्टर क्रमांक ६९७/२०२६ अन्वये आरोपींविरुद्ध भारतीय न्याय संहिता (बीएनएस) कलम ११८(१), ३(५), ३५१(२) व ३५२ अंतर्गत गुन्हा दाखल करण्यात आला असून पुढील तपास राहुरी पोलीस करीत आहेत.

# खा. वाकचौरे यांच्या शिवसेना शिंदे गटाच्या प्रवेशामुळे लोकसभेचे गणित बदलणार

## माजी खा. लोखंडेंकडून खा. वाकचौरे यांचे शिवसेनेत स्वागत

अशोक दुशिंग । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : लोकसभा मतदारसंघाच्या राजकारणात मोठी उलथापालथ झाली असून. शिवसेनेचे उबाठाचे विद्यमान खासदार भाऊसाहेब वाकचौरे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. वाकचौरे यांच्या या निर्णयाचं मा. खा सदाशिव लोखंडे यांनी स्वागत केले आहे. एकनाथ शिंदे यांनी घेतलेल्या निर्णयाचे आम्ही पालन करत असून ठामपणे उभा आहे तसेच वाकचौरे यांचं पक्षात स्वागत केलं असल्याचे लोखंडे म्हणाले.

व शिर्डी लोकसभा मतदारसंघात भाऊसाहेब वाकचौरे आणि सदाशिव लोखंडे यांच्यातील राजकीय संघर्ष गेल्या अनेक वर्षांपासून चर्चेचा विषय राहिला आहे. २००९ च्या लोकसभा निवडणुकीत भाऊसाहेब वाकचौरे यांनी तत्कालीन शिवसेनेच्या धनुष्यबाण चिन्हावर निवडणूक लढवत रिपब्लिकन पक्षाचे नेते रामदास आठवले यांचा पराभव करून लोकसभेत प्रवेश केला होता. त्यानंतर २०१४ च्या लोकसभा निवडणुकीपूर्वी वाकचौरे यांनी शिवसेनेला रामराम ठोकत काँग्रेसमध्ये प्रवेश केला. काँग्रेसचे उमेदवार म्हणून त्यांनी शिर्डीतून निवडणूक लढवली. त्यावेळी शिवसेनेकडून उमेदवारी मिळालेल्या सदाशिव लोखंडे यांनी जोरदार लढत देत वाकचौरे यांचा पराभव केला. त्यानंतर मोठ्या मताधिक्याने लोकसभेत निवडून गेले. २०१९ मध्येही शिर्डी लोकसभा मतदारसंघात राजकीय रंगत कायम राहिली.

भाऊसाहेब वाकचौरे यांनी अपक्ष उमेदवारी केली, तर काँग्रेसकडून माजी आमदार भाऊसाहेब कांबळे मैदानात होते. दुसरीकडं शिवसेनेकडून पुन्हा सदाशिव लोखंडे यांना उमेदवारी देण्यात आली. त्यांनी सलग दुसऱ्यांदा विजय मिळवत आपलं वर्चस्व कायम ठेवलं. २०२२ मध्ये शिवसेनेत झालेल्या फुटीनंतर राज्यात एकनाथ शिंदे आणि उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखाली दोन स्वतंत्र शिवसेना



अस्तित्वात आल्या. त्यानंतर २०२४ च्या लोकसभा निवडणुकीत भाऊसाहेब वाकचौरे यांनी भाजपाची साथ सोडत शिवसेनेत उबाठा प्रवेश करून उमेदवारी मिळवली. त्यांच्या विरोधात महायुतीकडून सदाशिव लोखंडे मैदानात उतरले होते.

या निवडणुकीत दोन्ही नेत्यांमध्ये चुरशीची लढत झाली. प्रचारादरम्यान आरोप-प्रत्यारोपांच्या फैरी झडल्या. मात्र, अखेरीस मतदारांनी भाऊसाहेब वाकचौरे यांच्या बाजूनं कौल देत त्यांना विजयी केले. तर सदाशिव लोखंडे यांना पराभव स्वीकारावा लागला. लोकसभा निवडणुकीनंतर अवघ्या दोन वर्षांतच राजकीय परिस्थिती पूर्णपणे बदलली आहे. खा भाऊसाहेब वाकचौरे यांनी एकनाथ शिंदे यांनी शिंदेच्या शिवसेनेत प्रवेश केला आहे. त्यामुळं अनेक वर्षे एकमेकांचे राजकीय प्रतिस्पर्धी राहिलेले वाकचौरे आणि लोखंडे आता एकाच पक्षात आले आहेत. या पार्श्वभूमीवर सदाशिव लोखंडे यांनी शिर्डीत पत्रकार परिषद घेत वाकचौरे यांचं स्वागत केलं.

यावेळी त्यांनी खासदार असताना मतदारसंघात केलेल्या विकासकामांचा आढावा घेतला. तसेच प्रलंबित विकासकामे पूर्ण करण्यासाठी राज्य आणि केंद्र सरकारच्या माध्यमातून प्रयत्न सुरू ठेवणार असल्याचे त्यांनी सांगितले. शिर्डी मतदारसंघाच्या राजकारणात रामदास आठवले, भाऊसाहेब कांबळे, सदाशिव लोखंडे आणि भाऊसाहेब वाकचौरे हे नेते अनेक वर्षे वेगवेगळ्या राजकीय पक्षांतून एकमेकांविरोधात लढत आले आहेत. मात्र सध्याच्या राजकीय परिस्थितीत हे चित्र बदलताना दिसत आहे. भाऊसाहेब कांबळे यांनीही काँग्रेसला सोडचिठ्ठी देत शिवसेनेत प्रवेश केला. सदाशिव लोखंडे आधीपासूनच शिंदे यांच्या शिवसेनेत आहेत. आता भाऊसाहेब वाकचौरे हेदेखील शिवसेनेत येणार आहेत. दुसरीकडे केंद्रीय मंत्री रामदास आठवले हे महायुतीचा भाग आहेत. त्यामुळं एकेकाळी कट्टर राजकीय विरोधक असलेले हे सर्व नेते भविष्यात एका मंचावर दिसण्याची शक्यता निर्माण झाली आहे.

भाऊसाहेब वाकचौरे यांच्या शिवसेनेतील प्रवेशामुळं शिर्डी लोकसभा मतदारसंघातील राजकीय समीकरणे बदलण्याची चिन्हे दिसत आहेत. अनेक वर्षांपासून राजकीयदृष्ट्या एकमेकांविरोधात उभे ठाकलेले भाऊसाहेब वाकचौरे आणि सदाशिव लोखंडे आता एकाच पक्षात आणि एकाच मंचावर दिसणार याची चर्चा शिर्डी मतदारसंघात रंगू लागली आहे. येत्या काळात शिर्डीच्या राजकारणात कोणती नवी समीकरणे आकार घेतात यावर शिर्डी लोकसभा मतदारसंघाचे पुढील भवितव्य अवलंबून आहे .

# बेलगाव हत्याकांडाचा उलगडा

## राजस्थानच्या मजुराची हत्या करून मृतदेह जाळल्याप्रकरणी दोघे जेरबंद

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**वैजापूर** : बेलगाव-वैजापूर रस्त्यालगत पडीत शेतात आढळलेल्या अधजळलेल्या मृतदेहाच्या गूढाचा छडा लावत वैजापूर पोलीस व स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने अवघ्या दोन दिवसांत खुनाचे रहस्य उलगडले आहे. या प्रकरणी राहुल ऊर्फ कुणाल पप्पू कुंभारकर (वय १८, रा. पोटे गल्ली, वैजापूर) व ऋषिकेश ऊर्फ सोनू अजय त्रिभुवन (वय २३, रा. बेलगाव) यांना ताब्यात घेण्यात आले आहे. १७ जून रोजी बेलगाव शिवारातील पडीत शेतात एका पुरुषाचा जळालेल्या अवस्थेतील मृतदेह आढळून आला होता. घटनास्थळी सापडलेल्या मोबाईल फोनच्या आधारे पोलिसांनी तपास सुरू केला.

चौकशीत मृताची ओळख राजस्थान राज्यातील भिलवाडा जिल्ह्यातील रुपाहेलीकला येथील सिताराम सज्जनलाल बावरी (वय ३०) अशी पटली. सिताराम हा वैजापूर परिसरात मजुरीचे काम करत होता. तपासात समोर आलेल्या माहितीनुसार, १५ जूनच्या मध्यरात्री आरोपींनी पैशांच्या उद्देशाने सितारामला अडवले. पैसे देण्यास नकार देत त्याने शिवीगाळ केल्याने आरोपींनी त्याला जबरदस्तीने दुचाकीवर बसवून बेलगाव



शिवारातील निर्जनस्थळी नेले. तेथे लाथाबुक्क्यांनी तसेच सुबाभळीच्या लाकडाने बेदम मारहाण करण्यात आली. या मारहाणीत त्याचा मृत्यू झाल्यानंतर आरोपींनी त्याची पँट काढून त्यातील ३५० रुपये घेतल्याचा आरोप आहे. मृताची ओळख पटू नये म्हणून चेहऱ्यावर लाथा मारून शरीरावर पँट, दोरी, मक्याचा वाळलेला चारा व काँग्रेस गवत टाकून मृतदेह जाळण्यात आल्याचे तपासात निष्पन्न झाले. पोलीस अधीक्षक प्रकाश जाधव, अपर पोलीस अधीक्षक प्रशांत स्वामी यांच्या मार्गदर्शनाखाली स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक विजयसिंह राजपूत, वैजापूरचे पोलीस निरीक्षक सत्यजित ताईतवाले व पथकाने ही कारवाई केली. पुढील तपास वैजापूर पोलीस करीत आहेत.

# ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखाना संचालक मंडळाची निवडणूक बिनविरोध

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**नेवासा** : लोकनेते मारुतराव घुले पाटील ज्ञानेश्वर सहकारी साखर कारखान्याच्या संचालक मंडळाची निवडणूक बिनविरोध पार पडली असून सर्व २१ जागांवर उमेदवारांची बिनविरोध निवड झाली आहे. माजी आमदार नरेंद्र घुले आणि माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील यांच्या नेतृत्वाखाली ही निवडणूक बिनविरोध झाल्याने घुले समर्थकांमध्ये उत्साहाचे वातावरण निर्माण झाले आहे. शेवगाव, शहरटाकळी, कुकाणा, नेवासा, वडाळा आणि ढोरजळगाव गटांसह अनुसूचित जाती-जमाती, महिला प्रतिनिधी, भटके-विमुक्त, नामाप्रवर्ग तसेच उत्पादक व बिगर उत्पादक-पणन संस्था मतदारसंघातील सर्व जागांवर उमेदवारांची बिनविरोध निवड झाली. बिनविरोध निवडून आलेल्या संचालकांमध्ये नरेंद्र घुले, चंद्रशेखर घुले, सुधाकर नरवडे, पंडित भोसले, रामनाथ राजपूरे, बाळासाहेब खरड, नारायण म्हस्के, हिम्मतसिंह देशमुख, अमोल अभंग, जनार्दन शेळके, दादासाहेब कोकणे, जनार्दन



कदम, प्रसाद पटारे, मच्छिंद्र म्हस्के, गोरक्षनाथ भेंडेकर, विकास नन्नवरे, सुमनबाई काळे, रंजना तानवडे, अशोक मिसाळ, संतोष पावसे आणि बबनराव भुसारी यांचा समावेश आहे. निवडणुकीचा निकाल जाहीर होताच विविध गटांतील समर्थकांनी फटाक्यांची आतषबाजी करत आणि गुलालाची उधळण करून जल्लोष साजरा केला. यावेळी माजी आमदार नरेंद्र घुले पाटील व माजी आमदार चंद्रशेखर घुले पाटील यांच्या नावाचा जयघोष करण्यात आला. कारखान्याच्या निवडणुकीत सर्व जागा बिनविरोध झाल्याने सहकार क्षेत्रात या घडामोडीची विशेष चर्चा होत आहे.

# खा. वाकचौरे यांच्या निवासस्थानी व कार्यालयास वाय प्लस सुरक्षा

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**शिर्डी** : खा.भाऊसाहेब वाकचौरे यांनी शिवसेना ठाकरे पक्ष सोडून उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या नेतृत्वाखालील शिवसेनेत प्रवेश केल्यानंतर शिर्डी लोकसभा मतदारसंघातील राजकीय वातावरण चांगलंच तापले आहे. वाकचौरे यांच्या या निर्णयानंतर ठाकरे शिवसेनेतील कार्यकर्ते आणि शिंदे शिवसैनिकांमध्ये ठिणगी पडली आहे. सरकारने तातडीने त्यांना वाय प्लस सुरक्षा पुरवली आहे.

या पार्श्वभूमीवर कोणताही अनुचित प्रकार घडू नये तसंच कायदा व सुव्यवस्था अबाधित राहावी यासाठी प्रशासनाने विशेष खबरदारी घेतली आहे. खा. वाकचौरे यांच्या शिर्डीतील निवासस्थानासह संपर्क कार्यालयाबाहेर कडेकोट पोलीस बंदोबस्त तैनात करण्यात आला आहे. राज्य राखीव पोलीस दल आणि महाराष्ट्र पोलीस दलाच्या एकूण सुमारे २१ जवानांची नियुक्ती करण्यात आली असून परिसरात सातत्याने गस्त





घालण्यात येत आहे. विशेष म्हणजे, अत्याधुनिक सीसीटीव्ही सर्व्हेलन्स व्हॅनच्या माध्यमातून संपूर्ण परिसरावर चोवीस तास नजर ठेवली जात आहे.

निवासस्थान आणि संपर्क कार्यालय परिसरातील प्रत्येक हालचालीचे बारकाईने निरीक्षण करण्यात येत असून कोणतीही संशयास्पद घटना आढळल्यास तत्काळ कारवाई करण्याच्या सूचना संबंधित यंत्रणांना देण्यात आल्या आहेत. वाकचौरे यांच्या पक्षांतरामुळे शिर्डी मतदारसंघातील राजकीय समीकरणांमध्ये मोठी उलथापालथ होण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे. ठाकरे शिवसेनेकडून या निर्णयाचा निषेध केला जात असताना शिंदे गटाने मात्र वाकचौरे यांच्या प्रवेशाचे स्वागत केले आहे.

त्यामुळे आगामी काळात या राजकीय घडामोडींना आणखी वेग येण्याची शक्यता वर्तवली जात आहे. सध्या तरी प्रशासनाने परिस्थितीवर बारकाईने लक्ष ठेवले असून कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी आवश्यक त्या सर्व उपाययोजना करण्यात येत आहे.

# उक्कलगाव ग्रामपंचायतीला स्वस्त धान्य दुकानाचा परवाना

प्रतिनिधी । राष्ट्र सह्याद्री

**उक्कलगाव** : श्रीरामपूर तालुक्यातील उक्कलगाव ग्रामपंचायतीने एक मोठा महत्त्वाचा टप्पा गाठला असून, तालुक्यातील स्वस्त धान्य दुकान चालविण्याचा परवाना मिळविणारी ही पहिलीच ग्रामपंचायत ठरली आहे. जिल्हा पुरवठा अधिकारी श्रीमती हेमलता बडे यांच्या हस्ते नुकतेच हे प्राधिकार पत्र उक्कलगाव ग्रामपंचायतीकडे सुपूर्त करण्यात आले. उक्कलगाव येथील स्वस्त धान्य दुकानदार श्रीकिसन मोतीलाल मुंदडा यांनी वैयक्तिक कारणास्तव राजीनामा दिल्याने हे दुकान रिक्त झाले होते.

त्यानंतर जिल्हा पुरवठा कार्यालयाने या दुकानासाठी जाहीरनामा प्रसिद्ध केला होता.या संधीचा लाभ घेत, उक्कलगाव ग्रामपंचायतीचे ग्रामसेवक सुभाष पवार यांनी पुढाकार घेऊन सर्व आवश्यक कागदपत्रांची पूर्तता करत तहसील कार्यालयाकडे प्रस्ताव सादर केला होते. प्रस्तावातील कागदपत्रे आणि तांत्रिक बाबींची पडताळणी केल्यानंतर, जिल्हा पुरवठा अधिकारी श्रीमती हेमलता बडे



यांनी ग्रामपंचायतीला धान्य दुकानाचा परवाना मंजूर केला.ग्रामसेवक सुभाष पवार यांनी विहित शुल्क भरल्यानंतर, उपसरपंच नितीन थोरात आणि ग्रामसेवक सुभाष पवार यांच्याकडे अधिकृत परवाना सुपूर्त करण्यात आला. यावेळी बोलताना जिल्हा पुरवठा अधिकारी श्रीमती बडे यांनी उक्कलगाव ग्रामपंचायतीचे कौतुक केले.

त्या म्हणाल्या, श्रीरामपूर तालुक्यातील ही पहिलीच ग्रामपंचायत आहे, जिने स्वस्त धान्य दुकानाची जबाबदारी स्वीकारली आहेत. इतर ग्रामपंचायतींनीही यातून प्रेरणा घेऊन पुढाकार घ्यावा.शासकीय नियमांचे पालन करून धान्य वाटप करावे आणि कार्डधारकांना कोणतीही तक्रार येणार नाही, यांची विशेष दक्षता घ्यावी.

उक्कलगाव ग्रामपंचायतीच्या या निर्णयामुळे गावातील सार्वजनिक वितरण व्यवस्थेत अधिक पारदर्शकता येण्याची आशा व्यक्त केली जात आहे.